वृषाली जोशी





# विश्वकथा- ३

# विश्वकथा ३

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# विश्वकथा ३

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

विश्वकथा ३
लेखक : विविध आंतरराष्ट्रीय
अनुवादिका : वृषाली जोशी
चलभाष : ९९२१७४६२४५
इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २९ जानेवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अनुवादिकेची ओळख



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व अकरा पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके


सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा,


कविता करण्याचा


व शब्दकोडी बनवण्याचा छंद

संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९


चलभाष ९९२१७४६२४५



THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
4 BOOKS IN ONE
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night



सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
short story by W. Somerset Maugham
BEFORE THE PARTY



वृषाली जोशी
विश्वकथा१


The Sherlock Holmes
शेरलॉक होम्स
वृषाली जोशी


SHERLOCK 2 HOLMES
शेरलॉक होम्स-२
वृषाली जोशी


THE ADVENTURES OF
SHERLOCK HOLMES
शेरलॉक होम्स ३
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE


Adventures of
Sherlock Holmes
शेरलॉक होम्स ४
वृषाली जोशी
SIR ARTHUR CONAN DOYLE




# वृषाली जोशी यांच्या ई साहित्यवरील इतर दहा पुस्तकांच्या लिंक्स

- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dorian_gray_oscar_wilde_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saki_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holms_4_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_2_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shakespere_stories_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_h_3_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maughm_vrishali_joshi.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wishwakatha_vrishali_joshi.pdf



विश्वकथा ३ प्रस्तावना

या पुस्तकात निरनिराळ्या सहा देशांमधील कथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

पुलित्झर पारितोषिक विजेती अमेरिकन लेखिका एडना फर्बर हिने, स्वावलंबी असण्याचा टेंभा मिरवणाऱ्या दोन वयस्क महिलांची ‘पूर्णपणे स्वावलंबी’ ही कथा लिहिली आहे. हॉलंडच्या लुई क्युपरसने ‘जुळयांच्या दोन जोड्यां’ची गंमत सांगितली आहे. जर्मनीच्या जेकब वॅसरमनने ‘अॅडम अरबास’ या कथेतून अॅडम अरबास स्वतःच्या अंगावर गुन्हा ओढवून घेण्यास का प्रवृत्त होतो, याचा शोध घेतला आहे. झेकोस्लोवाकीयाच्या कॅरेल कॅपेकने ‘शर्ट’ ही नोकराणीकडून फसविले गेलेल्या वृध्द माणसाची गोष्ट लिहिली आहे. ‘चांगला प्रेमिक’ या कथेत अॅमस्टरडॅमचा लेखक मार्टेन मार्टेन्स प्रेमभुकेल्या चांगल्या मुलीची गोष्ट सांगतो. तर फ्रान्समधील एका कैद्याची तुरुंगातून कशी सुटका होते, याचे वर्णन ‘आशेमुळे छळ’ या कथेत व्हिलीअर्स अॅडम करतो

अनुक्रमणिका


| कथा | लेखक | देश | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ पूर्णपणे स्वावलंबी | Edna Ferber | जपान | 10 |
| २ जुळयांच्या दोन जोड्या | Louis Couperus | हॉलंड | 31 |
| ३ अॅडम अरबास | Jacob Wassermann | जर्मनी | 38 |
| ४ शर्ट | Karel Capek | झेकोस्लोव्हाकीया | 60 |
| ५ चांगला प्रेमिक | Maarten Maartens | हॉलंड | 68 |
| ६ आशेमुळे छळ | Count Villiers L’isle Adam | फ्रान्स | 91 |

Perfectly Independent

By Edna Ferber

जपान

# पूर्णपणे स्वावलंबी,



मिसेस हॅनाऊर आणि मिसेस ग्रिम पूर्णपणे स्वावलंबी होत्या. सतत त्या एकमेकींना मोठ्या अभिमानाने त्याची आठवण करून देत. त्याविषयी त्या मित्रमंडळींमध्ये बढाया मारत. दिखाऊपणा करत मिसेस हॅनाऊर तिच्या मुलीला व जावयाला म्हणाली, ( जसे मिसेस ग्रिम तिच्या मुलाला व सुनेला म्हणाली ) "तुम्ही माझ्याकडे बघायची जरुरी नाही. कुणालाच माझ्यासाठी त्रास घ्यायचे कारण नाही. मी पूर्णपणे स्वावलंबी आहे."

हे अमूल्य स्वावलंबित्व! पण यामुळेच फक्त त्या मैत्रिणींमध्ये बंध निर्माण झाला नव्हता. कंटाळा घालवायचे दोघींचे मार्ग अगदी वेगळे होते. प्रत्येकजण सेन्ट्रल पार्कजवळील महागड्या कौटुंबिक हॉटेलच्या दोन खोल्यांमध्ये ( बाथरुमसकट ) आरामशीर रीत्या एकट्याच रहात. दोघींची साठी उलटून, त्या सत्तरीकडे झुकल्या होत्या. त्या माह–जाँग नावाचा चिनी खेळ व ब्रिज

खेळत. एकमेकींवर अपमानास्पद शेरेबाजी करत, त्या मजा करत. अशा प्रकारच्या व्यावसायिक खेळात भांडणेच झाली असती. प्रत्येकजण दुसरीला स्वतःत साचलेली एकटेपणाची वाफ जिरण्यासाठी वापरत असे. आलटून पालटून मिसेस हॅनाऊर स्वतःच्या मुलीच्या व जावयाच्या आणि मिसेस ग्रिम त्यांच्या मुलाच्या व सुनेच्याबद्दल बढाया मारत व तक्रारीदेखील करत.

विजयाचे काही क्षणः "तुम्हाला वाटेल की ते माझ्याशिवाय काही करू शकत नाहीत. ही आई बर! तुम्हाला काय वाटते? मी त्यांना म्हटले, तुमच्या शेजारी माझ्यासारखी अशी म्हातारी बाई नको. पण ते म्हणाले, "ठीक आहे. जर तू येणार नसलीस, तर आम्हीही जाणार नाही ---- एडने माझ्यासाठी मॅटिनीची दोन तिकिटे पाठवली. मी सहज म्हटले होते की मला तो लिओनार्डोचा सिनेमा बघायचा आहे. असे होते बघा. काही बोलायची म्हणून सोय नाही. पुढच्या मिनिटाला तिकिटे माझ्या हातात असतात ---- अटलांटिक सिटीहून बर्नीसने मला हे रुमाल आणले, बघा. जर मला एक मिळाला, तर शंभर मिळाल्यासारखेच आहेत. मी म्हणाले, जो आणि तू शनिवार रविवारी बाहेर जाता, तेव्हा मला काहीतरी आणायचेच आहे, असा विचार का करता? तर ती काय म्हणाली माहिती आहे? ती म्हणाली, "आई, आम्ही विचार करतो असे नाही, आम्हाला ते करायला आवडते." ते मला बिघडवत आहेत. प्रामाणिकपणे तू विचार कर की मी ---- "

इतर वेळीः मी त्यांना सांगितले. मी नाही तर कोण त्यांना सांगणार? नवपरिणीत जोडपी हल्ली काय विचार करत असतात, हे जाणून घ्यायला मला आवडेल. पण नवरा बायकोत बिब्बा घालायला मला आवडणार नाही. आणि स्टेला असे म्हणू शकतच नाही की एडने तिच्याविरुद्ध जावे, असा एकतरी शब्द मी उच्चारलेला आहे. मला वाटते, मी फारच आधुनिक सासू आहे. पण काल मी एडला म्हटले, "एड, माझे बोलणे लिहून ठेव ---- " अर्थात, ते मुलांना बिघडवत आहेत. पण तुम्ही त्यांना तसे सांगू शकत नाही ---- तसेही, मी त्यांना काहीच बोलत नाही. मी तिच्याशी वादही घालत नाही. मी सरळ पाठ वळवून घराबाहेर चालू पडते. मग मी माझ्या घरात शिरल्याबरोबर, तिचा फोन येतो. ती फोनवर क्षमा मागत होती. ती काळजीत असल्याने, ती ते घाईघाईने बोलत होती. मी तिला म्हटले की ठीक आहे. पण अशा तऱ्हेचे बोलणे मी कुणाकडूनच ऐकून घेणार नाही, मग ती मुलगी असो नाहीतर आणखी कुणी. आणि का म्हणून घ्यावे?

मी पूर्णपणे स्वावलंबी आहे.

खरे पहाता, प्रत्येकीला कुटुंबात जरी काही त्रुटी दिसत असल्या, तरी दुसऱ्याने त्या दाखवून दिल्या, तर ते सहन केले जात नाही. "ओहो, म्हणून तुला बर्नीस खरी कशी आहे, ते माहितीच

नाही. समाजात कोणाचे हसे करणारी ती नाही. पण झोपायच्या खोलीच्या पडद्याच्या कापडावर मी मत द्यावे असे जर तिला वाटत नसेल तर, ती ते कधीही निवडणार नाही."

शिवाय त्यांच्या स्वावलंबी असण्याच्या बाबतची आवडती प्रौढी म्हणजे, त्यांचे कुटुंब त्यांच्यावर अवलंबून असल्याचा दावा! "मुले म्हणतात की हिवाळयात तुझा एकटीने हॉटेलात रहायचा हट्ट ठीक आहे. पण उन्हाळयात ती जिथे कुठे असतील तिथे त्यांच्याबरोबरच मी असले पाहिजे." मिसेस हॅनाऊरने जाहीर केले की तिच्या मुलीचे कुटुंब डोंगरावर रहायला गेले, कारण समुद्रावरची हवा तिला मानवत नाही. त्यांच्या मुलाच्या कुटुंबाबरोबर मिसेस ग्रिम उन्हाळा समुद्रकिनारी घालवतात, कारण त्यांच्या हृदयासाठी डोंगर चांगले नाहीत.

दोन्ही महिलांच्या जागा एकाच हॉटेलात असल्या तरी, मिसेस ग्रिमची जागा मिसेस हॅनाऊरपेक्षा पाच मजले उंच व महाग आहे. मिसेस ग्रिम जास्त श्रीमंत आहे. प्रत्येकीची झोपायची व उठाबसायची खोली, खासगी आवड व काळाची भयानक विविधता दाखवते. काही हॉटेलचे फर्निचर, काही स्वतःच्या घरापासून आणलेले व काही चटपटीत मुलीने किंवा सुनेने आणलेले आहे. विधवा होण्यापूर्वी दोघीही न्यूयॉर्कमधील अरुंद व उंच इमारतीत रहायच्या. त्या दिवसांपासून दोघींनी व्हिक्टोरियन काळातील काही विशिष्ट प्रकारचे फर्निचर जपून ठेवलेले होते. मिसेस हॅनाऊरची मुलगी त्याला अश्मयुगातले जुनाट फर्निचर म्हणे.

तिथे गुबगुबीत हातवाल्या खुर्च्या होत्या. त्या फुलाफुलांच्या पडद्याच्या नवीन कापडांनी नटल्या होत्या व त्यात बसून छान झुलायला होत होते. नव्वदच्या दशकातील अंधारी, कुरूप व जुनाट दिव्यावर उठून दिसणारी रेशमी शेड त्या बाईची मॅडीसन रस्त्याची अभिरुची दाखवत होते. सर्व काही एखाद्या बागेतील टोपी घातलेल्या चेटकिणीसारखा परिणाम साधत होते.

तिथे आकर्षक उशा होत्या. जुन्या कुजकट वास येणाऱ्या फुलदाण्यांबरोबर स्पर्धा करणाऱ्या, पुस्तके नीट उभी ठेवण्याच्या रंगीत वस्तु होत्या, रागीट बाके होती व एकदम बेकार व जुन्या पद्धतीच्या टेबलावर काही वस्तु ठेवलेल्या होत्या. या सगळया वेड्यावाकड्या वस्तूंमधूनही, एक प्रकारची सुसंगती साधली जात होती आणि त्यातून आरामाचा एक नक्षीदार आकार साधला जात होता. ही घरे म्हणता येणार नाहीत अशा हॉटेलमधील सदनिका असूनही, हिरवे पडदे लावलेली, फर्निचरला पॉलिश केलेली छोटी खोली उघडल्यावर, तिथे चिनी मातीच्या व चांदीच्या भपकेदार आश्चर्यकारक वस्तू दिसत. मिसेस हॅनाऊर आणि मिसेस ग्रिम लगेच स्पष्टीकरण द्यायला धावत.

“मी माझ्या खोलीत कधीच स्वयंपाक करत नाही. मी तो त्रास घेत नाही. आठवड्यातील दोन दिवस मी मुलांकडे असते. मी म्हटले तर ते रोज रात्री पण मला बोलावतील. पण मी तसे करत नाही. मला कधी वाटले व तेवढ्यासाठी खाली उतरून जायचे नसेल, तर कपभर चहा करून पिता यावा म्हणून या काही वस्तू मी ठेवल्या आहेत. बाकीचे जेवण वगैरे हॉटेलवाले पाठवतात. माझी सून त्याला उकळलेले गवत म्हणते.”

शेकोटीच्या वरच्या भिंतीवर व झोपायच्या खोलीत, चांदीची फ्रेम केलेले बाळांचे फोटो होते. मिसेस हॅनाऊर आणि मिसेस ग्रिम नेहमी त्याकडे लक्ष वेधत.

“माझी नातवंडे!”

“किती छान! ती किती वर्षांची आहेत?”

“असे बघा. नातू पंधरा वर्षांचा आहे व नातीला बारावे चालू आहे ---- “

“पण मग हे फोटो खूप वर्षांपूर्वी घेतलेले असणार. यात तर ती अगदी छोटी आहेत.”

“हो. हो. ते खूप जुने फोटो आहेत. पण मला नवीन फोटोंपेक्षा तेच आवडतात. मी त्यांचा नेहमी लहान म्हणूनच विचार करते. मी असे म्हणू शकते, की मी पाहिलेल्या लहान मुलांमध्ये ते सर्वात छान आहेत.”

“तुमची मुले जशी दिसत, त्यापेक्षा?”

“एड तर कुरूपच होता. काळाकुट्ट होता आणि दिवसरात्र रडायचा. लग्नापूर्वी व मी नवी नवरी असतांना आम्हाला बाळांबद्दल, काहीच माहिती नव्हते. नर्सेसनादेखील जे माहिती नाही, ते हल्ली सोळा वर्षाच्या मुलीलाही माहिती असते.”

हे वरील बोलणे फक्त मिसेस ग्रिमकडूनच उच्चारले गेले असेल. तिला स्वतःच्या आधुनिकपणाचा गर्व होता. पण ज्याची खूप चर्चा होते अशा तरूण पिढीला मात्र कटू वागणूकीने बोचकारले जावे, असे तिचे मत होते.

या बाबतीत, व इतरही अनेक बाबतीत ती मिसेस हॅनाऊरपेक्षा वेगळी होती. बारीक, काळसर, थोडीशी खट्टू, छोट्याशा बुद्धिमान माकडासारख्या चपळ हालचाली करणारी, अशी ती वाटत असे. तिचे रागावल्यासारखे बोलणे तुम्ही ऐकले असेल. तिच्या काळयाशार डोळयांमधून फेकले जाणारे विष तुम्ही पाहिले असेल. वय झालेले असूनही कानाजवळचे व काही

इकडचे तिकडचे केस सोडता, तिचे केस अजून काळे राहिलेले आहेत. तिच्या भुवयाही दाट व काळया दिसतात. तिची चण एखाद्या मुलासारखी लहानशी असली तरी तिच्या पिवळट चॉकलेटी रंगामुळे ती भीतीदायक दिसते. पटकन रागावणारी व उद्धट अशी ती जेव्हा नापसंती दर्शवते, तेव्हा एखाद्या रानटी कुत्र्यासारखी दिसते.

“त्या मुलीकडे बघ. मी पैजेवर सांगते की तिने तो आखूड घट्ट ड्रेस जेमतेम कसाबसा घातला आहे व थाटात चालली आहे. हे अगदी उबग आणणारे आहे.”

मिसेस हॅनाऊर म्हणणार, “मला तर तो छान वाटतो आहे.”

“मला जाणून घ्यायला आवडेल, की त्यात छान वाटण्यासारखे काय आहे?”

“ओहो, तो चांगला दणकट आहे. थोडासा सुंदरही दिसतो आहे.” नाराजीने.

“सोफी हॅनाऊर, खरे की काय! मला कधीकधी वाटते की तू पुरेशी हुशार नाहीस.”

मिसेस हॅनाऊरने काही लक्ष दिले नाही. तसेही तिचा पुढचा शेरा कदाचित असंबद्ध गणला गेला असता. नक्कीच टोकदार मिसेस ग्रिमला तसे वाटले असणार. मिसेस हॅनाऊर म्हणाली होती, ‘तुझ्यासारखे नव्या पिढीला नावे ठेवणारे म्हातारे असायला, मला आवडत नाही.”

सोफी हॅनाऊर तशी मनमोकळी होती. आनंदी प्राणी होती. ती तिच्या मैत्रिणीपेक्षा वयाने थोडी मोठी होती, पण दहा वर्षांनी लहान दिसे. हे तिचे पांढरे केस सोडल्यास विरोधाभासात्मक दिसे. तरुणपणी तिची कांती सतेज होती आणि अजूनही ती नरम, मऊ व छान होती. ती तिचे पांढरे केस चमकवण्यासाठी काही लावत नसे व त्याचा तिला अभिमान होता. ब्युटी पार्लरमध्ये जाऊन ती जेव्हा तिच्या केसांना शाम्पू लाऊन घेई, तेव्हा ती नीळ घातलेल्या पाण्याने ते धुण्याबद्दल फार आग्रही नव्हती.

तिचा जावई तिला खेळकर म्हणत असे. त्याला त्याच्या मित्रांना एक ठरलेली गोष्ट सांगायला आवडे. एका हिवाळयात, मिसेस हॅनाऊरने सामाजिक ऋण चुकवण्यासाठी म्हणून, ती रहात असलेल्या हॉटेलमध्ये आठजणांना जेवण दिले. पाहुणे म्हणजे तिच्याच वयाच्या महिला होत्या. त्यातील बऱ्याचशा विधवा, छान ड्रेस घातलेल्या व आधुनिकपणाबद्दल अभिमानी होत्या. तिचा आनंदी जावई म्हणाला, “सोफी, मी काय म्हणतो, मी जेवणापूर्वी छानशी पेये मिसळून तुमच्याकडे पाठवतो. तुम्ही गप्पा मारायला लागा.” मिसेस हॅनाऊरला ती कल्पना पसंत पडली.

जो रागावून केकाटली, “ओहो, त्यांना पेये देऊन काही उपयोग नाही कारण त्या सगळयांना हाय ब्लडप्रेशर आहे.”

मग तो तिला खूप आनंद देत नेहमी म्हणे, “सोफी, ऐक. ही तुझी मुलगी तुझ्या निम्म्याने जरी खेळकर असती, तर तू वयस्कपणाकडे न घाबरता पाहिले असतेस.”

मिसेस हॅनाऊर आणि मिसेस ग्रिम या चांगली परिस्थिती असलेल्या अनेकजणींपैकी अशा वयस्क महिला होत्या, ज्या काही काळजी नसलेल्या आरामदायी अशा हॉटेलच्या वातावरणात रहात होत्या. तिथले पॅसेजेस लाल गालीचा घातलेले होते, संगमरवरी चकाचक फरशा होत्या. म्हातारे वेटर्स होते व वेळोवेळी बंद पडणारे उद्वाहक होते. त्या जेवणाबद्दल तक्रारी करून मजा घेत. वर्षभर तिथे रहाण्याचे नूतनीकरण, आता करायचे नसल्याचे त्या सांगत. “मुलांनाच माझी गरज आहे” फार थंडीत किंवा पावसाळयात, मनोरंजनासाठी किंवा सोबतीसाठी बाहेर न जाण्याचे सुख असे. बहुतेक वेळा दुपारी व संध्याकाळी रुंद झगमगते बोळ माह–जाँग खेळाच्या आवाजाने भरून जात. त्या खेळाच्या काव्यपूर्ण अशा विचित्र अटी जिकडे तिकडे ऐकू येत. ‘बम्! पश्चिम वारा! चार फुले!’

ते प्रत्येकाला सहसा आडनावाने हाका मारून फोन करत रहात. “हॅलो, कोण हॅनाऊर का? तू काय करते आहेस?” घाईचे, हवेसे वाटणारे व जागे करणारे असे ते गडबडीचे बोलणे असे.

“ओहो, मी काही दुरुस्ती करते आहे.”

“ते ठेऊन दे. इथे मिसेस रेनर आलेली आहे. मला वाटते तुला तिघींचा काही खेळ खेळायला आवडेल.”

दिवसभर त्यांचे असे काही ना काही, चालू असे. त्या पार्लरमध्ये जाऊन खूप लक्षपूर्वक हातांची, नखांची काळजी घेत. कधी सकाळच्या सिनेमाला, मॅटिनीला जात. पण कधी संध्याकाळीही सिनेमाला जात. कधी संगीत मैफिलींना हजेरी लावत. कधी त्या सभासद असलेल्या क्लबमध्ये सामाजिक वा कायद्याविषयींच्या व्याख्यानांना जात. तिथे इंग्लिश कादंबरीकार, विद्यापीठातील प्राध्यापक किंवा संपादक मोठ्या तावातावाने ऑक्सफर्डच्या उच्चारात बोलत आणि पैशाच्या मागे धावणाऱ्या, सुखलोलुप अमेरिकनांवर ताशेरे झाडत. घाईघाईने व्याखानाची बिदागी घेऊन, शिकॅगोला जाऊन दुसऱ्या एखाद्या क्लबमध्ये उत्सुक चेहऱ्यांसमोर पुढचे व्याख्यान देत. त्या महिला चालू घडामोडींबद्दलची मासिके वाचून त्यावर चर्चा करत. अमेरिकन मध्यमवर्गीय, वयस्क, चौकस व उत्साही, अशी या बायकांची बुद्धिमत्ता होती. तरुणांना लाजवेल

अशा प्रकारची उतू जाणारी बुद्धिमत्ता, फिकट वाळूच्या रंगाच्या रेशमी मोज्यांबद्दल, देखण्या टोप्यांबद्दल, आधुनिक दागदागिन्यांबद्दल व खेळायच्या कपड्यांबद्दल दाखवली जाई. ती प्रतिक्रिया योग्य शब्दात, पण चिडून केलेली असे.

आठवड्यातून दोनदा त्या मुलांबरोबर जेवत. त्या तिथे पाहुण्यासारख्या जात व त्यांच्या खर्चिकपणाबद्दल काही टीका करत नसत. तरीही कधीकधी काहीतरी बोलले जाई.

स्ट्रॉबेरीज? आणि जानेवारीत? अरे बापरे! यासाठी घरखर्चाला खूप पैसे पाहिजेत असे त्यांनी म्हटले, की जो किंवा एड उदारपणा दाखवत म्हणत, “जर या फक्त माझ्यासाठी असत्या तर मी त्यातील अर्ध्या खाल्ल्या असत्या.”

त्या पण मुलांना हॉटेलमध्ये बोलावत, पण ते म्हणत, “ आई, हे किती मूर्खपणाचे आहे. आमचे घर एवढे पसरलेले आहे. त्यामुळे तू इथे येणे जास्त संयुक्तिक आहे.”

“मी इथे आठवड्यातून दोनदा येतेच पण तुम्ही माझ्याबरोबर हॉटेलमध्ये जेवण महिन्याभरात घेतलेले नाही.”

“पण आम्ही चौघे आहोत व तू एकटीच आहेस.”

“कुणाला वाटेल, मी भिकारी आहे. मला ते परवडत नसते, तर मी तुम्हाला या असे म्हटलेच नसते. मी पूर्णपणे स्वावलंबी आहे.”

तर त्या अशा होत्या. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी. शारीरिक दृष्ट्या सक्षम. समाजात रस घेणाऱ्या. स्वतःचे मनोरंजन, मैत्रिणी, घर, कपडेलत्ते, जेवण व स्वतःची आवड जोपासणाऱ्या. मात्र एकाच गोष्टीवर त्या अवलंबून होत्या, ती म्हणजे त्यांची मुले व नातवंडे. त्यांच्याशिवाय त्या जगू शकल्या नसत्या. प्रेम, माणसांचे प्रेम!

एका एकत्र जेवणानंतर मुलांच्या उन्हाळयाच्या नेहमीच्या बेतामध्ये बदल झालेला, मिसेस हॅनाऊर आणि मिसेस ग्रिम या पुरेशा चौकस स्त्रियांच्या लक्षात आला. कदाचित तो एवढा काही विचित्र नव्हता. जरी त्यांना ती अजून बाळे असल्यासारखे वाटत असले तरी, त्यांची नातवंडे म्हणजे उंच, बारीक व खेळाडू असलेली मुले मुली होती. त्या महिलांची मुले मध्यमवयीन झालेली होती. त्यांचे स्वतःचे केस पिकू लागले होते व ते हसल्यावर डोळयांशेजारी सुरकुत्या पडू लागल्या होत्या.

पण त्यांना ती अजूनही उपदेश व सल्ल्याची गरज असलेली मुलेच वाटत होती. मुले खरे पाहता स्वतंत्र होती. पण त्यांना सतत सुनावले जाणारे बढाईखोर शब्द 'पूर्णपणे स्वावलंबी' हे वापरणाऱ्या त्या दोघींना, स्वतःचे वयातीतपण लक्षात येत नसे. शेवटी त्यांच्या हेही लक्षात येत नसे, की त्यांच्या चोखंदळ, धीट आणि दुसऱ्यावर वर्चस्व गाजवण्याच्या स्वभावामुळे, घरात कुरबुरी सुरु होतात.

मग त्या नवराबायकोनी चर्चा करून ठरवले, की मुलांसाठी हे चांगले नाही. शेवटी आपली आई आपल्याइतकी बळकट आहे, असे नाही. मला विचाराल तर माझ्यात दुप्पट ताकद आहे. मागच्या उन्हाळयात ती तिथे पडलेली असल्याने, दुपारी एक ते तीन मुले मस्ती करू शकत नसत. आता खरे तर ती मुले पूर्ण वाढ झालेली आहेत. छोट्या मेजवान्या, संध्याकाळचे त्यांचे मित्रमैत्रिणी, हे आता असणारच. त्यांनाही स्वातंत्र्य हवेच. सर्व हिवाळा आपण त्यांच्यावर लक्ष ठेऊन असतो, यात काही वाद नाही. पण त्यांचाही विचार आपण आधी केला पाहिजे.

पन्नास व साठचा दशकातील पूर्वेकडील सुंदर घरे दुरुस्त करण्यायोग्य झाली होती. युरोपमधील आदर्श संस्कृती आता घरात अमेरिकन डॉलर संस्कृती आणू लागली होती. मोल्नार, शॉ, इब्सेन, वेर्फेल आणि ओनीलसारखी आडनावे सूर्याच्या उन्हात विरघळून जाऊन त्याऐवजी जिवंतपणा नसलेली, कॉम्प्युटरच्या तालावर चालणारे संगीत जलसे होऊ लागले.

मिसेस ग्रिमच्या सुनेने तिच्या नवऱ्याकडे न बघता तिला घाईने म्हटले, "एडला गेल्या वर्षी भयानक ताप आला होता. आणि मुलाची सर्दी तर सबंध ऑगस्टभर टिकली. आणि ती नुसती सर्दी नव्हतीच. तर तापही होता. मला वाटते तो त्याला संसर्गाने आला असावा."

मिसेस ग्रिम स्वतःशी गाणे गुणगुणू लागली.

मिसेस ग्रिमच्या सुनेने ओठ वाकडे केले. मग ते उघडून, ती अजून घाईने म्हणाली, "डॉ बोर्च म्हणाले की त्या दोघांना उंचावरील हवेची जरुरी आहे. खरे तर त्यांनी तसा आग्रहच धरला. त्यामुळे मला वाटते, या वर्षी बहुतेक डोंगरावरच जावे लागेल. तुम्हाला माहिती आहे की तुम्ही आमच्याबरोबर आलात तर आम्हाला आनंदच होईल. पण तुम्हाला ते चालेल का ते तुम्ही सांगा. आम्ही केंडलला बऱ्याच उंचावर जाणार आहोत. तेथील घर लहान असेल, पण तुम्हाला दिवसा एका दुसऱ्या खोलीत पलंग घेता येईल ---- किंवा कदाचित एखाद्या जवळच्या हॉटेलमध्ये खोली ---- जुलैसाठी जोनने तिच्या दोन मैत्रिणींना विचारले आहे ---- "

मिसेस ग्रिम खूप तुटकपणे बोलली, “कुणालाही माझ्यामुळे त्रास नको. आजपर्यंत मी कुणाला त्रास दिला नाही व यापुढेही देणार नाही. कुणाला वाटेल, मी लहान मूल आहे की काय!. मी या उन्हाळ्यात काय करीन, कुणास ठाऊक! मी कदाचित परदेशी जाईन.”

लगेच एड बोलला, “तुला एकटीला मी युरोपला जाऊ देणार नाही.”

“कोण म्हणते मी एकटी चालले आहे? मी कोणाला तरी बरोबर घेऊ शकते. मी पूर्णपणे स्वावलंबी आहे.”

“आई, असे बोलू नका. तुम्हाला माहिती आहे एड आणि मी कसे ---- “

मिसेस ग्रिम बोलली, “हो, माहिती आहे.”

मिसेस हॅनाऊरच्या मुलीचे डोळे दुप्पट काळजी दाखवू लागले. ती म्हणाली, “तुला माहिती आहे, की डोरोथी मागचा सबंध उन्हाळाभर कशी अशक्त व फिकट झाली होती. डॉ बोर्च म्हणाले की तिला समुद्रस्नान व तेथील हवेची जरुरी आहे. ती जागा न्यूयॉर्कपासून फक्त दोन तासावर आहे. ती जागा जोसाठी पण खूप छान असेल. तो तिथे शुक्रवार ते रविवार राहू शकेल. ऑगस्टमध्ये जेव्हा काम कमी असते तेव्हा तो गुरुवार पासूनही येऊ शकेल. मला कल्पना आहे की तुझ्या ब्रॉन्कायटीसला तेथील हवा चालणार नाही. पण असे बघ की मला जो आणि मुलांचाही विचार करावा लागेल. शेवटी एवढी सगळी वर्षे आम्ही शाकाहार घेत आलो.”

मिसेस हॅनाऊर म्हणाली, “कुणीही माझी काळजी करायचे कारण नाही. कुणाला वाटेल मी लहान मूलच आहे.” खुर्चीच्या हातावर तिचे मधले बोट लहानशी वर्तुळे काढत होते.

“असे काय म्हणतेस आई, हे बरे वाटत नाही. दर उन्हाळ्यात तू आमच्याबरोबर असणे, आम्हाला किती आवडते! डोरोथी व तू एका खोलीत राहू शकाल ----“

“या उन्हाळ्यात मी काय करीन, कुणास ठाऊक! मी कदाचित युरोपला जाईन.”

“तू एकटी जाणार, हे काही बरोबर वाटत नाही.”

“पण मी एकटी जाणार असे कुठे म्हटले? मला भरपूर मैत्रिणी आहेत. काहीजणी दरवर्षी जातात व मला येण्याचा आग्रहदेखील करतात. मी कोणालाही बोलावू शकेन. मी पूर्णपणे स्वावलंबी आहे.”

त्या दोघींपैकी कुणीच, खरी परिस्थिती कबूल करायला तयार नव्हते. मिसेस हॅनाऊर मिसेस ग्रिमला खोटेच म्हणाली व मिसेस ग्रिमने पण तसेच केले. मला समुद्रकिनारा मानवत नाही. मला डोंगर चालत नाही. हिवाळाभर आपण शहरातील तेच तेच लोक बघत बसतो. उन्हाळ्यात आपल्याला थोडा हवाबदल होत असे, इतकेच! पण त्याचे काय मोठेसे?

मिसेस हॅनाऊरने विचारले, “पण तू बदल म्हणून, डोंगरावर जाऊन का बघत नाहीस?”

“माझ्या हृदयासाठी! पण ते ऐकत नाहीत. तू सुद्धा एकदा समुद्रकिनारी जाऊन बघ.”

“डॉक्टर परवानगी देत नाहीत. माझा ब्रॉन्कायटीस!

त्या दोघींनी एकमेकींकडे असे पाहिले, की जसे काही त्यांना काही समस्या नाहीच आहे. मग मिसेस ग्रिम साधेपणे पहिल्यांदा म्हणाली, “मी युरोपला जाईन. पण मला एकटीला जायचे नाही आणि माझ्याबरोबर येऊ शकतील अशा थोड्याच व्यक्ती आहेत.”

मिसेस हॅनाऊरने चेष्टेच्या सुरात विचारले, “मी आले तर?”

“तू चेष्टा करते आहेस का?”

मग ठरले. दोघीही पूर्वी तिथे गेलेल्या होत्या. मिसेस हॅनाऊर एकदा तर मिसेस ग्रिम अनेकदा. महाकाय, आल्हादक व सोनेरी केसांची मिसेस ग्रिम तिच्या नवऱ्याबरोबर अनेकदा परदेशी सहलींना गेली होती. पण ते नवऱ्यावरच्या विश्वासापेक्षा संशयामुळे होते. खरे पाहता तो पाच वाजता घरी येऊन म्हणे, की त्याला दुसऱ्या दिवशी सकाळी दहाला बोटीने निघायचे आहे. मग मिसेस ग्रिम त्याच्याकडे विचित्रपणे बघत, घाईने दोघांची बॅग भरत असे. छोट्या एडला योग्य बाईच्या हवाली करून, विजयी मुद्रेने ते निघत, तिच्या दबलेल्या नवऱ्याची रक्षणकर्ती असल्याचा आव आणत, ती जगभर खोडकरपणे फिरत असे. मिसेस ग्रिम तुम्हाला थोडे चिडून सांगेल, “मी त्याच्याबरोबर छत्तीस वेळा गेले असेन त्यामुळे मला पॅरीस किंवा लंडनला असताना मी घरी न्यूयॉर्कला असल्यासारखेच वाटते.”

प्रवासाचा इतका जास्त अनुभव नसलेल्या मिसेस हॅनाऊरला, ती सांभाळून घ्यायचा प्रयत्न करे. आपण कोणीतरी विशेष असल्याचा भाव त्यात असे. तिच्याकडे पैशाला काही तोटा नव्हता. तरीही भविष्याचा विचार करून, ती ते खर्च करायला फारशी तयार नसे. तर मिसेस हॅनाऊर, लालीपॉपने भरलेली पिशवी जवळ असणाऱ्या एखाद्या मुलाच्या थाटात आनंदी व ऐषाराम करणारी असे. तिने हालअपेष्टा काढलेल्या होत्या. तिच्या नवऱ्याने जमिनीत पैसे गुंतवले होते.

पण त्यावर असलेले त्याचे नाव, जणू कमनशिबी असल्यासारखे ठरत असे. त्याने पूर्वेला जमीन घेतली की पश्चिमेकडील जमिनीवर गिऱ्हाईकांच्या उड्या पडत. त्याने उत्तरेला खरेदी केली की दक्षिणेला प्रगती होई.

त्याच्या मृत्यूनंतर अचानक त्याने पूर्वेकडील नदीजवळ ठेवलेल्या मोडकळीस आलेल्या इमारतींना व रिकाम्या सदनिकांना उर्जितावस्था आली. तिथे नव्याण्णव वर्षाच्या कराराने बावीस मजली इमारत तयार झाली आणि मग मिसेस हॅनाऊरची चंगळ झाली. हालअपेष्टा व नैराश्य संपले. उलट तिच्याकडे गोडवा व सहनशीलता आली. ती विचार करे, “तुम्ही एकच आयुष्य जगता, पण कसा काळ बदलतो!” जणू काही तिला सत्य नव्याने कळले.

तिचा जावई ओरडून म्हणे, “किती खेळकर बाई आहे!” त्यांची प्रवासाची तयारी साधी असे. मिसेस हॅनाऊरचा जावई आनंदी, मैत्रीपूर्णतेने म्हणे, “प्रवास करणाऱ्या तुम्ही दोघी म्हणजे जणू सिनेमातील नायिकाच आहात.”

त्यांच्या शिस्तशीर आयुष्यात घाईगर्दीची वा वादळे होण्याची शक्यता नव्हती. मिसेस ग्रिमने अनेक प्रवास केले होते. जाताना ती रिकामी बॅग घेऊन जाई व येतांना ती भरलेली असे. अमेरिकन रेशीम, आरामदायी बूट, स्वतःसाठी कॉफी! मग त्यातल्या अनेक गोष्टी वापरल्यादेखील जात नसत. बोटीवरचे मोठे कोट, काही ठराविक गोड पदार्थ व अमेरिकन पैशांची रेलचेल असे. बोटीवर त्यांना मध्ये बाथरूम असलेली दोन महागडी केबिन मिळत. ती गोळया, फुले, पुस्तके, फळे यांनी लगडलेली असत.

तोंडाने नापसंतीदर्शक उद्गार काढत, मिसेस ग्रिम उद्गारत, “लोक असे का करतात! किती ही उधळपट्टी! मिस्टर ग्रिमच्या भागीदाराची ही पिशवी बघा. तिने मिसेस हॅनाऊरची फुलांनी सजवलेली कमी झकपक खोली पालकत्वाच्या दृष्टीकोनातून बारकाईने पाहिली.

हॅनर की हॅनॉर की ---- “

सोफी मित्रत्वाने व समाधानाने बोलली, “हॅनाऊर. अरे बापरे, त्या पेअरच्या आकाराकडे बघ. एक खाल्ला तर जेवणच होईल.”

“तसले मोठे पेअर सहसा कडक असतात. मला समजत नाही, लोक असले पेअरांचे उत्पादन करतात तरी कशाला? मी मिस्टर ग्रिमना छत्तीस वेळा तरी म्हणाले की लोकांनी नुसत्या तारा, पत्रे पाठवली तर खूप बरे होईल. या नको त्या भेटी कशासाठी?”

मिसेस हॅनाऊर एखाद्या मुलासारख्या उत्तेजित आवाजात बोलली, “मला आवडले. हे छान आहे. मला एकदम लोकप्रिय असल्यासारखे वाटते आहे.”

मिसेस ग्रिमने शेरा मारला, “माझ्यासाठी ही जुनीच गोष्ट आहे.”

खाडीमध्ये त्या जहाजाच्या कठड्याशी उभ्या राहिल्या. बंदरातून त्यांना मुलगी, मुलगा, सून, जावई व नातवंडे हात करत होते. त्या सर्वांचे त्या दोघींकडे पाहणारे चेहरे पांढरे दिसत होते. त्या दोघींसाठी ते किनाऱ्यावरील चेहरे म्हणजे त्यांचे जग होते. त्यांची सौरमालिका होती. आयुष्यातील मिळकतीचे चिन्ह होते. आयुष्याशी असलेला बंध होता.

आता लिहा. जमिनीला लागल्याबरोबर तार करा. विसरू नका. स्वतःची काळजी घ्या. शेवटी त्यांच्यातील अंतर वाढू लागले. अचानक कठड्याजवळील छोटा काळे डोळेवाला चेहरा आणि निळे डोळेवाला गुलाबी जाड चेहरा, हे दोन्ही वैतागलेले वाटू लागले. विनोदी नसलेले व असमंजस वाटू लागले. लांबचे पांढरे चेहरे निळे झाले.

मिसेस हॅनाऊरच्या मुलीने, बर्नीसने तिच्या नवऱ्याचा दंड पकडला. तिने घाबरलेल्या मुलासारखी दुसऱ्या हाताच्या बोटांची मुठ वळून तोंडावर ठेवली. “ओहो, जो, ती रडते आहे. ते बघ. मला वाटते, आपण त्यांना जाऊ द्यायला नको होते. मला कळत नाही -- ती इतकी -- कशीतरी दिसते आहे -- एक प्रकारे -- “

मिसेस हॅनाऊरचा जावई म्हणाला, “बर्नी, आता ती ठीक वाटते आहे. ती चांगली खेळकर आहे. तिचा वेळ ती छान घालवेल. तू तर अशी वागते आहेस, की ती तुझी मुलगी व तू तिची आई आहेस.”

मिसेस ग्रिमचा मुलगा, एडने, कशाबशा भावना आवरलेला त्याचा चेहरा त्याच्या आईच्या चेहऱ्याकडे वळवला. त्याने त्याचे दात घट्ट दाबून ठेवले. त्याच्या जबड्याच्या दोन्ही बाजूला पांढुरका रंग पसरला. त्याच्या हातातील टोपीशी त्याने मूर्खपणाने अस्वस्थ चाळा सुरु केला.

“ते बघ स्टेल, ती रडते आहे. मला माहिती नाही. आपण तिला एकटीला जाऊ द्यायला नको होते का? ती इतकी बिचारी दिसते आहे -- इतकी -- “

“अरे, ती काही एकटी नाही. तुला काय झाले आहे? तुला माहिती आहे जो, मी तुला नेहमी म्हणते, की तू आईवेडा आहेस. अशाने तू तिला बिघडवतोस.”

त्या दोघी कसलेल्या प्रवासी होत्या. दिवसातून तीन जेवणे -- मिसेस हॅनाऊरसाठी चार आणि दुपारी चहा व केक तिला आवडे.

मिसेस ग्रिमने तिच्यात काही विशेष गुण असल्यासारखे जाहीर केले, “मी बोटीवर कधी चहा घेत नाही.”

त्या दोघी जिवलग मैत्रिणी असल्या, तरी प्रवासातील चिडचिड होणारी जवळीक त्यांना माहिती नव्हती. मिसेस हॅनाऊर टूथपेस्टचे झाकण घट्ट बंद करत नसे. त्यामुळे ती ठेवलेल्या बाउलला चिकट पांढऱ्या किड्याची सजावट केल्यासारखे दिसे. मिसेस ग्रिम त्यामुळे चिडत असे. दोघीही सकाळी लवकर उठत व खोलीत न्याहारी करत. त्यानंतर मिसेस हॅनाऊर उठून, आवरून डेकवर जाई तर मिसेस ग्रिम दुपारपर्यंत अंथरुणात लोळत बसे.

ती म्हणे “खूप मोठे दिवस आहेत. शिवाय अशी आळशीपणा करायची संधी कधी मिळणार? अशा सकाळच्या निवांत वेळी कुणीच बोटीवर फिरत बसणार नाही.”

त्यांची न्याहारी म्हणजे आपल्याला चक्रावून टाकणाऱ्या विरोधाभासात्मक गोष्टी असत. एका झगमगत्या लहानशा केबिनमध्ये जाडी व टोमॅटोसारख्या गालांची मिसेस हॅनाऊर छोटे झोपायचे जाकीट घालून, तिच्या उशांवर रेलून आरामशीर बसलेली दिसे. भरलेला ट्रे तिच्या गुडघ्यांवर ठेवलेला असे. कन्सासमधील शेतकरी त्याच्या दिवसाची सुरवात जे खाऊन करतो, ते मसालेदार नसलेले बेचव जेवण ती जेवत असे. त्यामध्ये बोटीवर भेट मिळालेल्या खासगी मालातील उत्तम क्रीम घातलेली निदान दोन कप कॉफी असे. तिचे ऐकून मिसेस ग्रिम आश्चर्यचकित होऊन वेटरकडे त्याची मागणी करे आणि मग नापसंतीदर्शक नाक मुरडे. ती तिची मागणी अशा आवाजात करे, की त्याच्या प्रत्येक छटेत नाराजी असे.

लोण्याचा मोठा तुकडा शेंदरी क्रीमची नक्षी असलेल्या गरम रोलला लाऊन तोंडात कोंबत मिसेस हॅनाऊर तिच्या खोलीतून ओरडली, “अरे बापरे, ग्रिम, हे बघ! तू इतकी बारीक आहेस, त्यात काही आश्चर्य नाही.”

दुधाच्या भांड्यात पडलेल्या माशीसारखी, अंथरुणात लोळणारी छोटीशी, सावळी मिसेस ग्रिम, मिसेस हॅनाऊरच्या तक्रारखोर आवाजाने चिडली. मिसेस हॅनाऊर बाथरूम सिंगर होती. "मिसेस हॅनाऊर, तू कृपया दारे लावून घेशील का? मला रात्रभर झोप नाही. मला संधी मिळाली तर सकाळी थोडा वेळ मी झोप काढीन म्हणते.”

जेव्हा त्या स्वतःला रगमध्ये लपेटून डेकवर शेजारी शेजारी आरामात विचार करत बसल्या, तेव्हा त्यांचे संभाषण मुलामुलींनी आपल्याला कसे दुखवले, याबद्दल सुरु झाले. खूप वेळाच्या शांततेनंतर, जवळजवळ शुद्धीत नसल्यासारखी केलेली, लहानसहान निरर्थक शेरेबाजी, म्हणजे जणू काही त्यांचे अर्धवट वाक्ये असलेले मोठ्याने विचार करणे होतेः खरच, मला वाटते हेच आयुष्य ---- तुम्ही त्यांना वाढवण्यात तुमचे आयुष्य खर्ची घातलेत आणि आता जेव्हा त्यांना आपली गरज उरली नाही तेव्हा ---- कन्या ही आयुष्यभर कन्या असते. पण मुलाचे लग्न होई पर्यंतच तो तुमचा असतो ---- ओहो, मला त्याबद्दल माहिती नाही. कधीकधी मला वाटते माझा जावई, जो, माझ्या मुलीपेक्षा माझ्याबद्दल जास्त आपुलकी असलेला आहे ---- मला नक्की असे वाटते की मला त्यांची जितकी गरज आहे त्यापेक्षा जास्त त्यांना माझी गरज आहे.

या एकमेकींना कणखरपणे व काळजीपूर्वक बघून जोखत होत्या. डेकवर कवायत करणाऱ्या त्यांच्या बरोबरीच्या उतारुंवर, त्या विनोदी शेरेबाजी करत होत्या. बोटीवर व नंतरच्या प्रवासात त्यांच्याबरोबर एक विशिष्ट प्रकारची वयस्क बाई होती. ती त्यांचे मनोरंजन करून लक्ष वेधून घेत होती. ते जुन्या वळणाचे जास्तच नम्रपणा दाखवणारे अमेरिकन कुटुंब होते. किंवा जुन्या पद्धतीची टोपी, महागाईचे काळे कपडे, उंच टाचांचे बूट व झुबकेदार केस कापलेली अशी ती इंग्लिश लेडी होती. त्यांच्याकडे खिन्न व दबलेली दिसणारी एक पोरगेलीशी नोकराणी होती. त्या उन्हात लाजाळूपणे चालत असत. त्याना बघून मिसेस हॅनाऊर आणि मिसेस ग्रिमचा खोडकरपणा जागृत होई.

मिसेस हॅनाऊर जाहीर केले, “पॅरीसला पोचल्यावर, मी केस कापून घेईल. बर्नीस म्हणत होती की तिला माझे केस कापायला झाल्यासारखे वाटत आहेत.”

“मूर्खपणा करू नकोस. त्या बाईकडे बघ, बघशील का? आता जून चालू आहे आणि तिने काळा ड्रेस घातला आहे. काळा ड्रेस मला नेहमी प्रेताची उत्तरक्रिया करणाऱ्या लोकांचा वाटतो. मी पैजेवर सांगते की ते सनातन लोकांचे कुटुंब असणार. मिसेस ग्रिमने स्वतःच्या लहानशा पाऊलात घातलेल्या स्टीलचे बक्कल असलेल्या चामड्याच्या ऐटदार बुटांकडे बघितले. शरीराच्या ठेवणीला शोभेल असे बूट घालण्याबद्दल लोकांना अभिमान असतो. पण तिला अगदी छोटेसे पाऊल असल्याबद्दल अगम्य असा अभिमान होता.

लंडन, पॅरीस, डेउव्हील, फ्रॅन्कफर्ट, ब्रुसेल्स, ल्युसर्न. त्यांच्याकडे उत्साह खूप होता. वेळ इतका भरभर जात होता, इतका भरभर, की त्या मधला वेळ विश्रांती व झोपेने भरून काढत होत्या. त्या भरपूर झोप काढत. गुप्तपणे काही विचार करत आणि मग तो मनातून काढून टाकत.

त्या रात्री वाचत बसत व मध्यरात्रीपूर्वी कधीच झोपत नसत. पुन्हा सकाळी सहाला टक्क जाग्या असत. त्या आपापल्या खोलीत पडून विचार करत रहात. त्यांच्या आयुष्याची साठ वर्षे मागे पडली होती. त्या भूतकाळात रममाण होत. आजचा विचार करत. पण उद्याचा कधीच नाही.

आणि त्या भांडत. फालतू गोष्टींवरून सतत वाद घालत. कदाचित त्यांच्या सहवासातील जवळीकेमुळे, प्रत्येकजण स्वतःचे प्रतिबिंब दुसरीत बघे. एकमेकीला आपण दमलो असल्याचे, झोप येत असल्याचे किंवा उदास होऊन एकटे वाटत असल्याचे, प्रवासाने शीणल्याचे किंवा प्रेक्षणीय स्थळे बघायचा अगदी सहजपणे येणारा कंटाळा आल्याचे, कबूल करत नसत. एकमेकींच्या चुका काढत. हॉटेलच्या पॅसेजमध्ये, गाडीत, बागेत किंवा दुकानात भेटणाऱ्या लोकांकडे एकमेकींबद्दल तक्रार करत.

एखाद्या पक्ष्यासारख्या छोट्या मिसेस ग्रिमसाठी मिसेस हॅनाऊरची प्रचंड भूक हा चीड येण्याचा मुख्य स्त्रोत होता. महाकाय, शांत, मैत्रीपूर्ण मिसेस हॅनाऊरला खायला आवडे. ती झिंगा मासा, गोड पदार्थ, काकड्या आणि आंबट पदार्थ चापत असे व रात्रीच्या जेवणाबरोबर पेलाभर पांढरी, फिकी वाइन घ्यायला तिला आवडत असे. दुपारचे चार/ पाच कोर्सचे, चीज किंवा फळांनी संपणारे युरोपिअन जेवण ती पचवत असे. ती झोपायला गेल्यावर तिच्या खोलीतून नेहमी लपवलेल्या कागदी पिशवीतून काही खाल्ल्याचा कुरकुर असा आवाज येत राही.

मिसेस ग्रिम छोटे कडक ओठ घट्ट मिटून निषेध नोंदवी. “तुला माहिती आहे, तू झिंगा मासा खाऊ शकत नाहीस. तुला तो पचत नाही, तर मग तू तो का मागवतेस? कुणालाच तो पचवणे शक्य नाही. घरी माझी सूनदेखील तो खात नाही. माझे बोलणे लक्षात ठेव. तू आजारी पडशील. मग माझ्याकडे तक्रार करत येऊ नकोस. जर आजारी पडलीस, तर कुणाला त्रास होईल?” नक्कीच, हा महत्वाचा प्रश्न होता.

मिसेस हॅनाऊर तिच्याकडे थोड्या आश्चर्याने बघत रहात म्हणे, “मी खाणार.”

“नाही. तू खायचा नाहीस. मला तुझी काळजी घेत बसावे लागेल.” मिसेस ग्रिम कडकपणे म्हणाली.

“मिसेस ग्रिम, माझी काळजी कुणी करू नये. मी पूर्णपणे स्वावलंबी आहे.”

अमेरिकेत असणाऱ्या मुलांबद्दलच्या आठवणींने त्या इतक्या हळव्या झाल्या व दोघींना एकमेकींची गरज आहे, हे नाकारत राहिल्या.

जणू त्या प्रवासात भेटलेल्या मैत्रिणींसारख्या एकमेकींना त्यांची गुपिते सांगत राहिल्या. मिसेस ग्रिम, न्यूयॉर्कला भेटलेल्या नवीन ओळख झालेल्या मैत्रिणीला म्हणाल्या, “मला वाटते मी सप्टेंबरपर्यंत तग धरू शकेन. पण माझी सहनशक्ती संपत आली आहे. मी तुला सांगते, यातून मला चांगला धडा मिळाला आहे. मला माझा मुलगा व सून त्यांच्याबरोबर डोंगरावर चलण्यासाठी आग्रह करत होते. पण मला वाटले, थोडा बदल मला आवडेल. शेवटी काय, अनुभवानेच गोष्टी कळतात.”

खेळकर मिसेस हॅनाऊरने आश्चर्ययुक्त तक्रार केली. “ती प्रत्येक गोष्टीचा पूर्ण खेळखंडोबा करते. ती हमाल, वेटर्स व नोकराणी सगळ्यांशी भांडते. मी सप्टेंबर मध्ये केव्हा ही सफर संपेल, याकडे डोळे लाऊन बसले आहे. दहा सप्टेंबरला आपण घरी पोचू. माझी इच्छा आहे की तो दिवस उद्याच असावा. माझी मुलगी मला सांगत होती, की मी त्यांच्याबरोबर समुद्रकिनारी जावे. पण मला वाटले की युरोपला येऊन मला चांगला बदल होईल. ती चूक झाली. तुम्ही जोपर्यंत लोकांबरोबर प्रवास करत नाही, तोपर्यंत तुम्हाला लोक कधीच कळत नाहीत. ज्यांनी कोणी प्रवास केला असेल, त्यांना माहिती असेल की ते नुसते पैसे घेतात आणि तुमच्याकडे काही लक्ष देत नाहीत.

“आणि त्यांनी माझी काळजी का घ्यावी? माझा आराम मलाच बघितला पाहिजे. आठवड्याच्या शेवटी थोडे जास्त सेंट्स म्हणजे मला चहाबरोबर गरम पाणी मिळेल, जादा उशी मिळेल व दोन चांगले स्वच्छ टॉवेल मिळतील. माझ्याबद्दल माझ्यामागे आपले सहप्रवासी काय बोलतात, त्याची मला पर्वा करायचे कारण नाही. मला त्यांच्याबरोबर रहायचे नाही.”

“ते फक्त तुम्हाला हसतात. बिचारे! जर ते पंधरा सेंटमध्ये हसायला तयार असले, तर मी ते द्यायला तयार आहे.”

“त्याचा पैशांशी काही संबंध नाही, अशी ती मुख्य गोष्ट आहे.”

कधी तुम्ही त्याना प्रेक्षणीय स्थळे बघून दुपारी परततांना बघता, तेव्हा तुमच्या लक्षात आले असेल की ते एकत्र चालत नाहीत, तर मागेपुढे चालतात. फारसे सहकार्यपूर्वक नव्हे व खट्याळ मुलांसारखे!

मिसेस हॅनाऊरला तिच्या जावयाने दिलेले टोपण नाव ‘खेळकर व आयुष्यात धोके पत्करणारी’ असे होते. ती क्वचितच जिंके पण जिंके तेव्हा तिचा आनंद गगनात मावेनासा होई. फ्रान्समधील पाण्याच्या ठिकाणी रात्री जेवणानंतर ती घाईघाईने कॅसिनोत जाई.

तिचे पैसे टेबलावरील महाकाय प्राण्याच्या जबड्यातील चक्रावर फेकण्यासाठी ती जाई. खेळाच्या टेबलाभोवती, उत्सुकतेच्या चौकस ताणाने हृदय उसळया घेऊ लागे. विचित्र, परदेशी बायका मनगटापासून कोपरापर्यंत महागड्या हिऱ्यांच्या ब्रेसलेटनी मढवलेल्या बघून, ती मैत्रीपूर्ण बने. कधीकधी त्या तिच्याकडून दयनीय रित्या पैसे उसने घेत -- पन्नास फ्रान्सेस -- वीस -- दहासुद्धा. त्यांच्या डोक्यावरील भव्य गोठलेल्या कारंज्यांसारख्या झुंबरांच्या लोलकांमधील लाल, निळा, भगवा व सोनेरी उजेड त्या हिऱ्यांवर पडून त्या हातांनी फेकलेला लाल काळा फासा कधी सातावर तर कधी अकरावर पडे.

मिसेस ग्रिम क्वचितच खेळे. ती कंटाळलेल्या आवाजात म्हणे, “मी माझ्या आयुष्यात हा प्रकार खूप पाहिला आहे. त्यात मला काही दिलचस्पी नाही. मिस्टर ग्रिम एका मिनिटात पाचशे फ्रान्सेस मिळवत असत आणि हरतही असत. त्या वेळेस पाचशे फ्रान्सेस फार किमती होते.” कधी कधी मिसेस हॅनाऊरला या रात्रीच्या मोहिमेत साथ द्यायला ती नकार देई. “काल रात्री कॅसिनोत तू जिच्याशी बोलत होतीस, ती तुझ्या शेजारी बसलेली बाई कोण होती माहिती आहे का? आत्ता हॉटेलच्या पॅसेजमध्ये मला भेटलेल्या बाईने सांगितले की ती मॅडम बे खान होती. किंवा तिचे नाव काय असेल ते असेल, पण तिने टर्की माणसाशी लग्न केले होते व लंडनमधील हॉटेलात त्याचा खून केला होता. पूर्वी त्या बातमीने वर्तमानपत्रे भरलेली असत.”

मिसेस हॅनाऊर कणव येऊन म्हणाली, “ती तरुण असूनही फार दुःखी दिसत होती.”

“असे बघ, कॅसिनोत जाऊन खुनी बायकांशी बोलण्यापेक्षा, काहीतरी बरे असे करायला माझ्याकडे आहे.”

मिसेस हॅनाऊर बेफिकीरीने म्हणाली, “काय?”

मिसेस ग्रिम रागावून बोलली, “काय काय?”

“तू जास्त बरे म्हणजे काय करतेस?”

“ओहो, ठीक आहे. एखादा घोडासुद्धा खाऊ शकणार नाही अशा गोष्टी खाऊन अपचनाने आजारी पडल्यावर, केवळ काही फ्रान्सेस मिळवण्याच्या आशेने तू तुझ्याकडील फ्रान्सेस घालवतेस, तेव्हा तू काय करतेस, हे जाणून घ्यायला मला आवडेल.”

दयनीय रीत्या, मिसेस ग्रिमच पहिल्यांदा आजारी पडली. फ्रॅन्कफर्ट ते ब्रुसेल्सच्या गाडीमध्ये त्यांच्याकडून काही चूक झाली. दहा वाजून सव्वीस मिनिटांनी असलेल्या गाडीत

बसल्यावर, त्यांच्या लक्षात आले की त्यांची गाडी दहा छत्तीसची होती. त्यांच्या बऱ्याचशा बॅगा हलवणे सोपे नव्हते. त्या गाडीने त्या कुठतरी जाऊन पडण्याच्या थोडेसे आधी, गोंधळलेल्या अवस्थेत त्यांच्या ते लक्षात आले.

परदेशातील रेल्वे स्टेशनवर चुकीची दुरुस्ती करतांना, त्यांचा भलताच गोंधळ उडाला. हमाल, उतारू, रेल्वेचे लोक, आरडाओरडा, किंकाळया, हलणारे निरोपाचे हात, मोठ्या सामानाच्या गाड्या ओढणाऱ्यांची लगबग आणि उच्चारलेली शापवाणी! . ती सीमा आहे. तिथे आपल्याला डबा बदलावा लागतो. मग हा कुठला आहे? ती कुठे गेली? आपल्याला उतरायला पाहिजे. चला आपण उतरुया. आपण अमेरिकन नागरिक आहोत. त्या चुकीच्या गाडीतून उतरून, बरोबर गाडीत बसल्या. त्यांचे चेहरे जांभळट लाल झाले होते. त्यांचे कपाळ घामाने डंवरले होते. त्या थरथर कापत होत्या. शेवटी त्यांना पहिल्या वर्गाच्या डब्यातील त्याची आसने मिळाली. मग त्यांनी दमलेल्या डोळयांनी बसकण मारली.

तासाभराने त्या क्षीण आवाजात त्यावर विनोद करू लागल्या. त्यांनी जेवणाच्या डब्यात जाऊन, गरमागरम जेवण घेतले. ओकारी येईल की काय असे वाटणारे दाट सूप, तेलकट बटाटे, उकडलेल्या हिरव्या विचित्र भाज्या, कोशिंबिरी, चीज, फळे एवढे सगळे खाताना मिसेस ग्रिमने काही चूक केली. मागील सबंध तास भीतीत आणि उत्तेजित अवस्थेत घालवल्याने, तिच्या नसा बधीर झाल्या होत्या. रात्री त्यांचा प्रवास संपून त्या हॉटेलवर आल्या. मध्यरात्री तिला अन्नातून विषबाधा झाल्याने, पोटातून कळा येऊ लागल्या.

इथे माझ्या माहितीचा कुणी डॉक्टर नाही. या परदेशात आता मला कुठला चांगला डॉक्टर मिळणार! मागे एकदा व्हिएन्नामध्ये मिस्टर ग्रिमना एका परदेशी डॉक्टरने जवळजवळ ठार केले होते. सगळीकडे असेच असणार.”

“फॅनी, आता मूर्खपणा करू नकोस. तुला काही औषध घ्यावेच लागेल.”

“एरंडेल आणि बिस्मथ. विषबाधेसाठी ते तेवढेच देतात. मी तुला म्हणत होते की मला गाडीतले जेवण नको. पण तू मला आग्रह करकरून जेवायला लावलेस. त्यामुळे मी काहीतरी खाल्ले. ओय्!” अंथरुणावरील तो चेहरा सुरकुतून हिरवा पडला होता.

“या हॉटेलमध्ये कुणीतरी जागे असेल. मी एखाद्या मुलाला औषध आणायला पाठवते. आत्ताशी कुठे साडेबारा झाले आहेत.”

“तुझ्या पायात काही नाही. तशीच तू खोलीभर वावरते आहेस. तुला सर्दी होईल.” तिचा रागाचा पारा चढला.

शेवटी, रात्रीचे कपडे घातलेला, डोळे लाल झालेला एक वेटर दारात आला. नाही. तो जाऊ शकणार नाही. अजून कुणी पाठवण्यासारखे नव्हते. मध्यरात्र झाली होती. अर्थात दुकाने बंद झाली असणार. त्याला माहिती नव्हते. उशीवरचे गडद डोळे दुखण्याने चमकत होते.

मिसेस हॅनाऊर बोलली, “मीच जाते. कुणाला तरी उठवते. देवा, आम्ही युद्धात त्यांना केलेली मदत आठवा. तिच्या रात्रीच्या गाऊनवर स्कर्ट व कोट चढवून, ती बाहेर पडली.

वीस मिनिटाने ती एरंडेल तेल, चमचा, संत्रे व बिस्मथचे पाकीट घेऊन परतली. “एरंडेल तेल गिळताना, तू तुझे नाक बंद कर. आता या रुमालाने तुझे तोंड पूस. संत्र्याची एखादी फोड खा. आत्ता थोडे बिस्मथ घे व थोडे सकाळी घे.” जवळजवळ सबंध रात्र मिसेस हॅनाऊर जागी होती. खोलीत फेऱ्या मारत होती. बारीक झालेल्या, ॠणाईतासारखा बघणाऱ्या मिसेस ग्रिमच्या चेहऱ्याकडे, ती भीतीदायक डोळ्यांनी बघत होती. “हो, तुला कदाचित थोडासा ताप आल्यासारखे वाटते आहे. पण सकाळपर्यंत तू ठीक होशील.”

मिसेस ग्रिम रागावून ओरडली, “तुझे बूट घाल आणि झोपायला जा.’

पण रात्रीतून वीस वेळा मिसेस हॅनाऊरचे पाय जमिनीवर वाजत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी, मिसेस ग्रिम अशक्त वाटत होती. पण तिचे दुखणे बरेच कमी झाले होते. दुपारी ती कोमट दूध पिऊ शकली. तिचे डोळे खोल गेलेले असले, तरी कळा येतांना चेहऱ्यावर उमटणाऱ्या काळसर खोल रेषा नाहीशा झाल्या होत्या. संध्याकाळपासून मिसेस हॅनाऊरला सर्दी झाली होती. दुसऱ्या दिवशी मिसेस ग्रिम मंद गतीने चालून तिला गरम पाणी व ॲस्पिरीन देत होती. खोकणाऱ्या व खाख्ररणाऱ्या तिला गरम सरबत देत होती.

अजून एक आठवडा थोडे आनंदी व थोडे बरे नसणे, असे चालू होते. त्या वेळी त्यांनी एकमेकींची, हळूवारपणे व निःस्वार्थीपणे काळजी घेतली.

“फॅनी, आता तू माझ्यासाठी काही करायची गरज नाही. मी बरी झाले आहे.”

“सोफी, कधीकधी प्रामाणिकपणे मला वाटते की तू तडफदार नाहीस. तुझी सर्दी न्युमोनियावर गेली असती, तर कोणाला त्रास झाला असता?”

अनपेक्षितपणे मिसेस हॅनाऊर म्हणाली, “तुला!” आणि जोरात घसा खवखवत हसली.

आता त्या चेरबोर्गपासून बोटीने निघाल्या होत्या. इतक्या स्वावलंबीपणे व निष्काळजीपणे आनंदात निघालेली ती जोडी पॅरीसला पोचेपर्यंत, ठळकपणे बदलली होती. तरीही, खरे तर आहे तशीच होती. कारण जरी त्या शारीरिक व अध्यात्मिक आधारासाठी एकमेकींवर अवलंबून होत्या तरी त्या ते सतत नाकबूल करत होत्या.

“तू एकटी दुकानात जाऊन खरेदी करायला तितकी बरी नाही आहेस. काल काय झाले ते आठव. जर मी तुला मागे खेचले नसते, तर पुढच्या मिनिटाला टॅक्सी तुझ्या अंगावरून गेली असती.”

“एखाद्याला तुझे बोलणे ऐकून वाटेल, की मी अडाणी शेतकरी आहे. मला वाटते, मी न्यूयॉर्कमध्ये एकटी फिरू शकत असेन तर, मी पॅरीसलाही फिरू शकते. तू पॅरीसबद्दल कधी काही ऐकण्यापूर्वीपासून मला पॅरीस माहिती आहे.”

ते शहर घाबरवणारे आहे. रस्ते वळणावळणाचे असून भीतीदायक आहेत. घाबरट सशाला जागोजागी अडखळायला लावणारे आहेत. आणि तसेही मी दुकानातील खरेदीला कंटाळले आहे. मी बर्नीससाठी ड्रेस घेतला आहे आणि जोसाठी रुमाल घेतले आहेत. नातीसाठी ब्रेसलेट व नातवासाठी गॉगल घेतला आहे. मला वाटते, एवढे त्यांच्यासाठी पुरेसे आहे.

कंटाळलेल्या पण हरलेल्या नव्हेत, डोके तापलेल्या पण माना खाली घातलेल्या नव्हेत, अशा त्या शेवटी प्रवासाच्या शेवटाकडे येऊन पोचल्या.

त्यांना भेटायला मुले बंदरावर आली होती. मुलगा आणि सून, मुलगी आणि जावई. त्यांनी नेहमीप्रमाणे मिठी मारून आनंदाने त्यांचे स्वागत केले.

इन्स्पेक्टर वस्तू तपासतो, तसे माझ्याभोवती कृपया गोळा होऊ नका. त्यामुळे मी उदास होते. नाही. एड, त्यांना सिगरेट देऊ नकोस. मग मला संशय येऊ लागतो. मी तुला सांगते, मी जे काही आणले, ते सर्व त्यांना सांगितले आहे. पण तरीही मला ताण येतो. मिसेस ग्रिम तिच्या सुनेला म्हणाली, “मी बरी दिसत नाही, म्हणजे तुला काय म्हणायचे आहे? मला अन्नातून विषबाधा झाली होती. पण ती युरोपमध्ये प्रत्येकाला होते.”

तिचा मुलगा बळकटपणे बोलला, “तेच ते, पुढच्या उन्हाळयात तू आमच्याबरोबर रहा. मी तुला एकटीला युरोपला जाऊ देणार नाही. मला ते आवडणार नाही.”

तिला गप्प बसवणे शक्य नसलेली मिसेस ग्रिम म्हणाली, “मला जाणून घ्यायला आवडेल की का नाही? माझ्यासाठी कोणी काळजी करायचे कारण नाही. मी पूर्णपणे स्वावलंबी आहे.”

मिसेस हॅनाऊरची मुलगी, बर्नीस ओरडली “आई! तू रोडावली आहेस. तुझे वजन कमी झाले आहे. तू आजारी होतीस का?”

“माझा नेहमीचा खोकल्याचा थोडाफार त्रास! तसेही मी जरा जाडच झाले होते.”

“पुढच्या वेळी तुझा ब्रॉन्कायटीस आमच्याबरोबर, घरी! मला तू युरोपभर एकटीने फिरत बसलेले आवडत नाही.”

मिसेस हॅनाऊर तिच्या मुलीकडे कडकपणे बघत गाणे गुणगुणू लागली व नंतर म्हणाली, “ती इतकी दयनीय टोपी तू का घातली आहेस? कडा गोलाकार झालेली टोपी कुणीच घालत नाही. यावर्षी पॅरीसमध्ये सर्व काही स्वस्त आहे. हे बघ मी कायकाय आणले आहे.”

**Two Pairs of Twins**

**By Louis Couperus**

**हॉलंड**

# जुळयांच्या दोन जोड्या





मला ते चौघेही माहिती आहेत. त्यांची नावे होती, जॅन आणि हेंड्रिक रुयसडाँक्स व मार्जोरी आणि लिझी लेलिकँप. दोन मुलगे ॲमस्टरडॅमचे होते आणि दोन मुली अमेरीका, न्यूयॉर्कच्या होत्या. त्यांना बघणे मनोरंजक होते. शनिवारी जेव्हा चौघे सिनेमाला किंवा हॉटेलमध्ये जात, तेव्हा सगळे त्यांच्याकडे बघत रहात. प्रोटेस्टंट डच रुयसडाँक्स या राष्ट्रभक्त कुटुंबातील ही दोघे वय सव्वीस असलेली, दणकट, गुणवान व सभ्य मुले होती. बाहेर असलेल्या वडिलांच्या प्रभावामुळे, मुलांना जबरदस्त असे काही मिळालेले होते. मोटारी, सिगरेट केसेस, कपडे, हे सगळे त्यांच्याकडे विपुल प्रमाणात, महागाईचे, टिकाऊ, आधुनिक व चांगली रुची दाखवणारे असले, तरीही ते साधे होते. जॅन आणि हेंड्रिक रुयसडाँक्स ही चांगली मुले होती. ते पाण्याचा दोन थेंबांइतके सारखे होते. मी त्याना वेगळे ओळखू शकत नसे. त्यांचे केसही एकाच तऱ्हेने कापलेले असत. त्यांचे चकाचक चेहरे सशक्त, उत्फुल्ल व देखणे दिसत. ते सारख्या बोटात सारखी अंगठी घालत. दोघांचे कपडे एकाच शिंप्याने शिवलेले असत. खरच तुम्ही जॅनला बघा किंवा हेंड्रिकला

बघा, ते सारखेच दिसत, फक्त -- जुळयांमधला मोठा, जॅन इंचाच्या काही अंशांनी हेंड्रिकपेक्षा उंच होता. जेव्हा ते एकत्र चालत, तेव्हा त्यांच्यातील साम्य लोकांना गोंधळवून टाकत असे.

वडील रुयसडॉक्स हा शहाणा माणूस असून ॲमस्टरडॅम बँकेमध्ये ऑफिसर होता. जॅन आणि हेंड्रिक यांनी घरातील श्रीमंतीचे सुखासीन आयुष्य जगावे, हे त्यांना पटत नसे. मुलांना परदेशी राहून काही शिकता यावे, म्हणून वडिलांनी त्यांना अमेरिकेला पाठवले होते. जॅन न्यूयॉर्कला गेला होता आणि हेंड्रिक बाल्टिमोरला. न्यूयॉर्कमधील समाजात जॅनला भेटलेल्या लिझी लेलिकँपच्या तो प्रेमात पडला होता. लिझी एक सुंदर व आनंदी मुलगी होती. अमेरिकन चालीरीतींप्रमाणे, सहज मोकळेपणे वागणारी होती. पण जॅनच्या सामाजिक स्थानाला धक्का बसेल, इतकी देखील तशी नव्हती. त्याशिवाय ती पण घरची श्रीमंत होती. कारण तिचे लेलिकँप वडील राजा होते.

जॅन व लिझी यांनी लग्न केले. न करायचे काही कारण नव्हते. थोडे वर्षांसाठी ते हॉलंडला जाणार होते, पण त्यांचे न्यूयॉर्कमधील घर त्यांनी तसेच ठेवले होते. जेव्हा पैशांचा काही प्रश्न नसतो, तेव्हा असे करणे फार सोयीस्कर असते. लीझीला दर तीन महिन्यांनी तिच्या आवडत्या युरोपला जायचे होते. पॅरीसमधील रु डे ला पैक्सपासून बैरुतमधील वॅगनर सिनेमागृहापर्यंतच्या तिच्या आवडत्या भागात तिला फिरायचे असल्याचे, तिने आधीच ठरवले होते. तिकडे बाल्टिमोरला हेंड्रिक, लीझीची जुळी बहीण मार्जोरी लेलिकँपच्या प्रेमात पडणे साहजिकच होते. ती सुंदर, शहाणी, आनंदी व रीतीभातीची मुलगी होती. त्यांनीदेखील जॅन व लिझीप्रमाणे लग्न केले. त्यांच्या लग्नालाही कुणाची हरकत असण्याचे काही कारण नव्हते. फक्त ते चौघे एकत्र उभे राहिले, तर कोण कुठली जोडी ते समजणे अवघड होते. कारण जॅन आणि हेंड्रिक पाण्याचा दोन थेंबांइतके सारखे होते तर लिझी व मार्जोरी दंवाच्या दोन थेंबांइतक्या सारख्या होत्या.

काही कारण नसताना असे झाले की मला वाटते, लीझीला सर्दी झाली आणि हेंड्रिक सायकलीवरून पडला. किंवा असेच काही बिन महत्वाचे घडल्यामुळे, -- कोणीच कोणाच्या लग्नाला हजर राहू शकले नाही आणि हा देखील एक उल्लेखनीय सारखेपणा ठरला होता. त्यामुळे खूपशी मजा करायची राहून गेली. जेव्हा त्याना एकमेकांच्या लग्नाबद्दल कळले, तेव्हा त्यां चौघांनी त्यांच्या आवडत्या युरोपला एक छानशी सहल आयोजित केली. मात्र पहिल्या भेटीनंतर जॅन व हेंड्रिक थोडे अशक्त दिसू लागले. आणि त्यांचे गंभीर चेहरे, फार मान देण्यासारखे व एकदम शांत दिसू लागले. दोघी बहिणी वेड्यासारख्या कुजबुजत बसल्या. त्या एकमेकींच्या अंगठीची वाखाणणी करत असल्यासारखे वाटत होते.

जॅन शांतपणे त्याचे खूप प्रेम असलेल्या त्याच्या जुळया भावाला म्हणाला, “हेंड्रिक, मला कसला त्रास होतो आहे, ते मला तुला सांगायचे आहे?”

इंचाच्या काही अंशांनी बुटका असलेला, पण मनाच्या उमदेपणात अजिबात कमी नसलेला, धाकटा हेंड्रिक म्हणाला, “जॅन, ते काय आहे?

“हेंड्रिक, तुझी बायको खरच अगदी उल्लेखनीय रित्या माझ्या बायकोसारखी आहे.”

“तशी ती आहेच. पण जॅन, एक फरक आहे. मार्जोरी लीझीपेक्षा थोडी बुटकी आहे. जेव्हा त्या एकमेकींच्या शेजारी उभ्या राहतील, तेव्हाच तुला ते कळेल. ते आपल्यासारखेच आहे.”

जॅन काळजीत पडून म्हणाला, “अरे, ते खरे आहे. पण हा जो तंतोतंत सारखेपणा आहे, त्यामुळे मला असे वाटते ---- जाऊ दे. मला असे वाटते, आपण एकमेकांना वचन देऊ की, आता आपण युरोप ओलांडून परत अमेरिकेला चाललो आहोत तर, यापुढे आपण खूपच काळजी घेऊ.”

थोडासा आतून हललेला, चांगला, प्रामाणिक व उत्तम स्वभावाचा जॅन, त्याच्या भावाबरोबर हातमिळवणी करता झाला. अधिक काळजी पूर्वक न वागणारा हेंड्रिक मनापासून हसला. त्याने भावाशी उलट हातमिळवणी करत, तो त्याच्यापेक्षा थोडासा बुटका असल्याचे दाखवून दिले, किंवा दिले नाही.

खात्रीपूर्वक, थोडासा बुटका असलेला हेंड्रिक, जॅनपेक्षा थोडा कमी काळजीपूर्वक वागणारा होता. पण तो जॅनसारखाच, गंभीर व स्थिर बुद्धीचा होता. ते दोघेही तसेच होते. ते कधी शालेय वयातही, आधीच गोंधळात पडलेल्या लोकांना विनोद सांगून, अजून गोंधळवत नसत. जेव्हा एखादी मावशी किंवा काका त्याना ओळखण्यात चूक करून, जॅनला म्हणत, “शुभ सकाळ, हेंड्रिक” तेव्हा त्याना नेहमी योग्य उत्तर मिळे, “तुमची चूक झाली आहे. मी जॅन आहे.” आणि त्याच्या उलट! तरीही माझा विश्वास होता, की लेलिकँप मुलींच्या बाबतीत असे नसेल. त्या दोन गोंडस मुलींना सतत सारखेपणा दाखवायची हौस होती. प्रत्येकजण दुसरीसारखे करायला बघे. अमेरिकन जुळया बहिणी, डच जुळया भावांपेक्षा जास्त खेळकर होत्या. या दचकवणारा सारखेपणा असणाऱ्या व शरीरात आणि मनात अगदी थोडे फरक असणाऱ्या जोड्यांनी, समुद्राच्या शेजारील हॉटेलमध्ये खोल्यांचे आरक्षण केले.

समुद्रसफर रम्य होती व ती लढाईपूर्वीची होती. दोघा रुयसडॉक्स भावांनी त्याच्या बायकाना ॲमस्टरडॅमच्या नातेवाईकांची ओळख करून दिली. थोडे दिवस ते पॅरीसला राहिले व

नंतर रु डे ला पैक्सला भेट दिली. तरुण अमेरिकन बायकांना पर्शियन दुकाने आवडली. तिथे त्यांना नवलपूर्ण कपडे मिळाले दर्जेदार लिननसाठी व सुंदर दागिन्यांसाठी . ड्युकेट प्रसिध्द होते. तिथे फरची, चामड्याची अनेक दुकाने होती. भरलेल्या पाकीटांना काहीही घेणे अशक्य नव्हते. तरुण बायका तिथे रंगून गेल्या. जॅन आणि हेंड्रिक यांनी विचार केला, “जरी त्यांच्या अमेरिकन बायका, त्यांच्या इतर अमेरिकन बहीणींपेक्षा वेगळया होत्या, तरी त्या खूप छान मुली होत्या, त्यांच्या रुयसडाँक्स नातेवाईकांना त्या अति लक्षवेधी, म्हणजे अमेरिकन पद्धतीच्या खर्चिक व चैनी, वाटणार नाहीत, अशी ते दोघे आशा करत होते. दोन्ही लग्ने, खरोखर खूप सुखी झाली.

नंतर ब्रुसेल्सला धावती भेट झाली आणि ओहो! आणि त्यानंतर ते भयंकर युध्द सुरु झाले. तिथे अजून खरेदी झाली. मग नाटक व मग हॉटेल! हॉटेलात व सगळीकडेच फार गर्दी होती. रात्रीचे जेवण छान होते. हेंड्रिकने काही वेळ हॉटेलच्या पत्र लिहायच्या खोलीत थांबून, एक पत्र लिहिले आणि नंतर त्याच्या खोलीत गेला. मार्जोरी आधीच तिथे गेलेली असल्याने, त्याने त्याच्या नेहमीच्या पद्धतीने दारावर टकटक केले. पण काही हालचाल झाली नाही. त्याने परत टकटक केले.

रागाच्या आवाजात शब्द आले, “काय झाले काय?” त्याच्या लग्नाच्या बायकोच्या दारासमोर उभा राहिलेल्या हेंड्रिकला, कधी आयुष्यात बसला नसेल एवढा धक्का बसला. नक्की तो आवाज त्याचा प्रिय भाऊ जॅन याचा होता. ती हेंड्रिक व मार्जोरीची खोली होती, आणि तरीही जॅन तो बरोबर असल्यासारखा व त्याचा त्या खोलीवर हक्क असल्यासारखा ओरडत होता. कोणीही आता त्रास देऊ नये अशी त्याच्या आवाजावरून, त्याची इच्छा दिसत होती. ज्यांना पत्र लिहायची घाई नव्हती -- ते लोक व हॉटेलचे नोकरचाकरही आपापल्या खोलीत जाऊन विसावले होते. कुडकुडणाऱ्या हेंड्रिकभोवती रात्रीची शांतता व पूर्ण नीरवता भरून राहिली होती. एका सेकंदात त्याच्या मेंदूत शोभादर्शकासारखे अनेक विचार तरळून गेले. जॅन -- हो -- जॅनचाच आवाज -- त्याचा आवडता भाऊ –- खोलीचा नंबर -- जेवतांना घेतलेली शँपेन -- लिझी व मार्जोरी -- अमेरिकन बहिणी -- हॉटेलच्या पत्र लिहायच्या खोलीत त्याला पत्र लिहायला लागलेला वेळ --सामसूम खोलीत रात्री दीड ते अडीच -- हे सर्व वादळ त्याच्या डोक्यात घोंघावू लागले. हेंड्रिक! खरच तो एक तास पत्र लिहित बसला नसता, तर त्याने धीर दाखवला असता. पण आता त्याचा धीर सुटला. त्याच्या थोड्याशा निष्काळजी स्वभावाने, त्याच्या भावाच्या, जॅनच्या, काळजीने थरथर कापत, आता काहीतरी वाईट होणार, असे वाटून तो रडायला आला -- गंभीरपणे एकमेकांना आता काळजीपूर्वक रहाण्याचे वचन दिलेले असतांना! हॉटेलच्या त्या मोठ्या मोठ्या

पॅसेजेस चा धिक्कार असो -- प्रत्येकाला नेहमीच आठवेल असे नाही, की आपल्या खोलीचा नंबर एकशे एकतीस आहे की नुसता एकतीस आहे -- बिचारा जॅन!

हेंड्रिक प्रामाणिक मुलगा होता. तो गुणी होता आणि भावाला लहानसेही दुःख द्यायला किंवा कशाबद्दलही नाराजी दाखवायला तयार नव्हता. गरीब बिचाऱ्या प्रामाणिक हेंड्रिकच्या डोक्यात चाललेले वादळाचे थैमान -- ते त्याने शांतपणे दूर सारले. वरच्या मजल्यावरील खोलीचा नंबर, जो त्याच्या खोलीपेक्षा फक्त शंभरच्या फरकाने, एकशे एकतीस होता, तिथे जाऊन त्याने टकटक केले. “आत या.” असा आवाज आला. “इतका वेळ तू काय करत होतास? तू लगेच यायला पाहिजे होतेस. मी तासभर तुझी वाट बघते आहे”

प्रामाणिक हेंड्रिक म्हणाला, “लिझी, मलासुद्धा जॅनसारखी पत्रे लिहायची होती.”

त्याला त्याच्या आवाजात स्मशानवैराग्य आढळले. काही विशिष्ट प्रसंगी, प्रतिष्ठीत व माननीय डच मुलांचे आवाज असे येतात. हा असा प्रसंग होता की जेव्हा चोराला, किंवा चोरी करायचा उद्देश नसलेल्या माणसालाही, सर्वात मूल्यवान वस्तू वाचवण्यासाठी, चोरी करावी लागते, ती म्हणजे लाडक्या जुळया भावाची सच्ची सद्सदविवेकबुद्धी! असा भाऊ, की जो काही वाईट तर घडणार नाही ना, म्हणून काळजीत आहे व त्याने यापुढे काळजीपूर्वक वागण्याचे वचन दिलेले आहे. प्रसंग बाका व परिस्थिती नाजूक होती. आर्थिक वाटोळे व्हायची पाळी आल्यावर घेतली जाईल तशी, खूप खबरदारी घेणे आवश्यक होते. प्रामाणिक हेंड्रिक काळजी घेत होता. तसे करणे आवश्यक होते. त्याला माहिती होते की त्याचा जुळा भाऊ, त्याच्या बायकोने उठवल्याशिवाय, सहाला काही उठणार नाही. त्या दिवशी तो स्वतः सकाळी सहाला उठला. नशिबाने त्याला एक जिना उतरल्यावर सकाळी सकाळी जॅन शांतपणे एकतीस नंबरची खोली सोडून, सकाळची कामे आवरण्यासाठी बाथरुममध्ये जाताना दिसला. त्या मोठ्या हॉटेलच्या जिना आणि पॅसेजच्या मिणमिणत्या उजेडात, पायजमा घातलेल्या दोघा रुयसडॉक्स भावांच्या पुसट आकृती दृषायमान होत होत्या. एकजण जिन्याच्या भिंतीआडून डोकावत होता, तर दुसरा खात्रीपूर्वक आत्मविश्वास असलेला असा होता. काचेचे धुरकट दार लावत, हेंड्रिकने ते आतून नीट बंद करून घेतले. नंतर लगेचच जेव्हा जॅन त्याच्या खोलीत शिरू लागला, तेव्हा त्याला ते आतून बंद आढळले. आतून त्याच्या भावाने, हेंड्रिकने, रागाचे ढोंग करून त्याला म्हटले.

“काय झाले?”

जॅन बोलला, “अरे बापरे, ही माझी खोली नाही का?”

हेंड्रिक उदारपणे दारात उभा राहिला.

त्याने सभ्यतेने आश्चर्य दाखवत विचारले, “जॅन, तू आहेस का? तुला सकाळी सहा वाजता काय हवे आहे?”

जॅन बोलला, “पण हेंड्रिक, मला वाटले -- “

“काय?”

“की ही माझी खोली आहे. आमची, लिझी आणि माझी ---- “

झोपाळूपणे आळस व जांभई देत व ठरवून स्वतःची हुशारी लपवत हेंड्रिक म्हणाला, “अरे, तू चुकतो आहेस. ही आमची खोली आहे एकतीस नंबरची. मार्जोरीची व माझी. मजल्यात तुझा गोंधळ झाला आहे.”

जॅन गोंधळून ओरडला, “पण मी जिना उतरून आलो नाही.

“अर्थातच तू आलास. तू झोपेत असशील. आता वर जा. एकशे एकतीस नंबरची खोली तुझी आहे. तुझी आणि लीझीची. तू बघतो आहेस, त्याप्रमाणे ही खोली माझी व मार्जोरीची आहे.”

जॅन बोलला,”अच्छा!” आणि वर गेला, तेव्हा त्याला खरोखर लिझी पलंगावर गाढ झोपलेली सापडली.

याव्यतिरिक्त काही घडले नाही. फक्त त्या दिवसापासून हेंड्रिकने ते गुपित स्वतःजवळ राखून ठेवले. आपपल्या नवऱ्यांच्या सारखेपणाबद्दल गालातल्या गालात हसणाऱ्या त्या दोघी किंवा जॅन यापैकी कुणालाच ते माहिती नव्हते. ब्रुसेल्सच्या त्या गोंधळाच्या रात्री, त्या चांगल्या छोट्याशा बायकांपैकी कोण कुठली ते इतरांना कधीच कळले नाही. नगण्य इंचाचा फरक म्हणजे काहीच नाही. फक्त मनातील गुपितासकट, त्याच्या योग्य व जमवून घेण्याच्या तत्वज्ञानामुळे, त्याने स्वतःला व त्याच्या प्रिय भावाला बदनाम होण्यापासून वाचवले. अलीकडे त्याने गोष्टी अशा काही जमवून आणल्या आहेत, की कधीही ते एकत्र प्रवास करत नाहीत किंवा एकाच हॉटेलात मुक्काम करत नाहीत. पण मी जेव्हा एकदा त्या चौघांबरोबर कॉफी प्यायला रेस्टॉरंट, किंवा सिनेमागृहात गेलो होतो तेव्हा, सगळयांचे डोळे त्या दोन दोन जुळयांच्या जोडीकडे लागलेले होते.


ही खरी गोष्ट मला कशी माहिती, असे तुम्ही विचाराल. वाचकहो, मी तुम्हाला सांगतो, मी फक्त तर्क करू शकतो कारण हेंड्रिक नेहमी एकत्र प्रवास करायला किंवा एकाच हॉटेलात रहायला विरोध करतो. आणि हेंड्रिकवर अनेक नाजूक मानसशास्त्रीय प्रयोग करून, माझी आता त्याबद्दल खात्री झालेली आहे. जेव्हा माझी खात्री पटली, तेव्हा मी नेहमी जसे करतो, तसे त्याचे छोटेसे शब्दरूपी चित्र काढले.

## Adam Urbas

## By Jacob Wassermann

### जर्मनी

# ॲडम अरबास



थोर ॲनस्लेम फ्युरबाकसारखाच असलेला, नुकताच वारलेला मुख्य न्यायाधीश, डायस्टरवेग हा बुद्धिमान व धूर्त गुन्हेगारशास्त्रज्ञ होता. त्याच्यामागे त्याने ठेवलेल्या कागदपत्रात मला खालील गोष्ट सापडलीः

ऑक्टोबरमधील एका संध्याकाळी उशीरा ॲडम अरबास नावाचा फ्रँकोनिअन शेतकरी गुंझेनहॉसेन येथील पोलीसचौकीत आला. त्याच दिवशी त्याने अहा या गावी त्याचा अठरा वर्षांचा मुलगा सायमन याचा गळा चिरल्याचे सांगितले. घरी त्याच्या खोलीत तो मुलगा मरून पडला होता. त्याने ज्या सुऱ्याने खून केला तो रक्ताने माखलेला सुरा त्याने बरोबर आणला होता व तो पोलीसांना दिला.

कमीत कमी शब्द वापरून या गुन्ह्याची कबुली दिली गेली आणि पोलिसांनी त्याची नोंद घेतली. पोलीस कमिशनरने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यायला व आणखी काही सांगायला अरबासने नकार दिला. त्याच रात्री गुन्ह्याच्या जागेची तपासणी केली गेली आणि अरबासने सांगितलेली गोष्ट खरी असल्याचे आढळून आले. दुःखाने व भीतीने अर्धी वेडी झालेली त्याची

बायको घरी होती. तिच्याभोवती तिच्या घाबरलेल्या शेतकरी मैत्रिणींचा व डेअरीमधील बायकांचा वेढा पडला होता.

ॲडम अरबासला ॲन्सबॅक तुरुंगात बंदीस्त करण्यात आले.

माझ्या कायद्याच्या करियरला मी नुकतीच सुरवात केली होती आणि काही आठड्यांपूर्वीच जिल्हा पातळीवर न्यायाधीश म्हणून नेमला गेलो होतो. या केसमध्ये काम करायची मी तयारी दर्शवली.

सुरवातीला केस अगदी साधी सोपी वाटली. त्याच्या जातीतील लोकांच्या अज्ञानामुळे व मूर्खपणामुळे, एक शेतकरी बौद्धिक दृष्ट्या खचला आणि त्याने त्याच्या लाज आणणाऱ्या व दुःख देणाऱ्या मुलापासून स्वतःची सुटका करून घेतली होती. अशा तऱ्हेने त्या मुलाला ठार मारून त्याने पुढील संकटांची मालिका टाळली होती.

सायमन हा पूर्णपणे बेकार, वाया गेलेला मुलगा होता, हे साक्षीदारांनी एकमताने मान्य केले होते. तो थापाड्या असून कामाला जात नसे. गावाकडच्या त्याच्या आळशी, बेशिस्त आयुष्यक्रमासाठी भरपूर पैसे लागत असत. जेव्हा धमक्या देऊन घाबरगुंडी उडवलेल्या आईकडून पैसे मिळत नसत, ( ती तिच्याकडे असून देत नसे किंवा तिच्याकडे नसत. ) तेव्हा तो दुसरे मार्ग शोधून काढे. उदाहरणार्थ, ऑगस्टमध्ये तो वैसेनबर्गच्या धान्य व्यापाऱ्याकडे गेला व त्याच्या वडिलांनी दिलेल्या बार्लीचे आठशे मार्क्स वसूल केले आणि ते उडवून टाकले. नॉर्डलिन्जेन नावाच्या वेश्येने त्याला जाळयात पकडले होते आणि तिला त्याच्यापासून दिवस गेल्याचे ती सांगत होती. एक दिवस तो तिला ओसाड जागी घेऊन गेला व तिचा गळा दाबायचा प्रयत्न केला. येणाऱ्या जाणाऱ्यांनी त्या बाईच्या किंकाळया ऐकून, तिला वाचवले. या प्रकरणाचा तपास चालू असतानाच ॲडम अरबासने त्याला संपवून न्याय दिला.

सायमनच्या तरुणपणातील सवयी व कृत्ये अत्यंत वाईट पद्धतीने तपासात बाहेर आली. त्याचे बालपण त्रासदायक व पापी अहंमन्यपणाने भरलेले होते व त्यातून कधीच काही चांगले निष्पन्न होत नसे. दुसरे उदाहरणः एक दिवस घरातील नोकराणी शहरातून सहा नवीन प्रकारचे बायकांचे आतले कपडे घेऊन परतली व मोठ्या कौतुकाने ती ते शेतकऱ्याच्या बायकोला दाखवत होती. तेवढ्यात चर्चमधील प्रार्थनेची वेळ झाल्याने, ती ते पांढरे शुभ्र कपडे टेबलावर तसेच टाकून चर्चमध्ये गेली. ती परतली, तेव्हा सगळे कपडे वंगणाने माखलेले होते व वापरायच्या लायकीचे राहिलेले नव्हते. हे सायमनने केल्याचा कुणालाही संशय आला नाही. पण घरोघरी माल

पोचवणाऱ्या सॅचार्फच्या बाबतीतल्या प्रमाणेच त्याबद्दलचा पुरावा कधीच मिळाला नाही. सॅचार्फने खानावळीसमोर त्याची पिठाची पोती भरलेली गाडी उभी केली होती. जेव्हा तो परत येऊन गाडी सुरु करू लागला, तेव्हा रस्त्यावर पिठाची रांगोळी उमटत गेली. कारण दहा की बारा पोत्यांना धारदार चाकू मारण्यात आला होता. सगळयांना माहिती होते, की हे नक्की सायमन अरबासनेच हे केले असणार. पण पुरावा काही नव्हता.

त्याचा चिक्कूपणा, डल्ला मारणे, याबरोबर उद्धटपणा व क्रूरपणाही वाढत गेला. ठीक आहे. विचारी माणसांनी विचार केला की विषारी गवत इतके उंच वाढते आहे, की त्याच्या टोकापर्यंत मोठी कात्री पोचत नाही. ते जमिनीत घट्ट मुळे रुजवून आहे,

त्यामुळे ते उपटून टाकण्याइतकी शक्तिमान कुदळदेखील नाही. मला त्याची इतकी भरपूर दुष्कीर्ती ऐकायला मिळाली की मला सर्व गोष्टी स्पष्ट झाल्या व त्या संशयातीतपणे सायमनच्या वर्तणूकीकडे निर्देश करत होत्या. तेव्हा मृत मुलाबद्दल बोलायचे झाल्यास काही समस्या नव्हती. काही गुंतागुंत नव्हती. काही गूढही नव्हते. सर्व गोष्टी अगदी स्पष्ट, साध्या होत्या आणि सायमनच्या दोषांकडेच बोट दाखवत होत्या.

गावातील या शोकांतिकेचा शेवटचा अंक एका रविवारी गुंझेनहॉसेन येथे गावजत्रेच्या दिवशी सुरु झाला. विंडबाकचे दोन शेतकरी आह येथील खानावळीत बसले होते. सायमन अरबासच्या अटकेविषयी वॉरंट निघाल्याचे ते आपापसात बोलत होते.

ॲडम अरबास त्यांच्या शेजारील टेबलावर बसल्याचे त्यांनी पाहिले नव्हते. तेथील सर्वजण, मालक व पाहुणे मंडळी अस्वस्थपणे ॲडम अरबासकडे बघत होते. ॲडमने ज्या पद्धतीने चष्मा खाली ठेवला व उठून उभा राहिला, त्या क्षणापर्यंत त्यांनी नॉर्डलिन्जेन घटनेबद्दल काही ऐकले नव्हते. खरे पहाता सायमनची कृष्णकृत्ये शक्य तेवढी त्याच्या वडिलांपासून दूर ठेवली जात होती. त्यांची असामान्य, शांत वागणूक, त्याचा प्रतिष्ठीतपणा, त्यांच्या समाजाकडून व एकंदरीत सर्व राज्यातून त्याना मिळत असलेले प्रेम, यामुळे सायमनभोवती जणू प्रेमळ संरक्षणात्मक भिंत उभी राहिलेली होती. शिवाय एवढी वर्षे त्यांच्या बायकोने सायमनची एकही वाईट गोष्ट त्यांच्यापर्यंत पोचू नये, अशी काळजी घेतलेली होती. लोक अशी कल्पना करत होते व तो त्यांचा गैरसमज होता, की जे चालले होते त्याकडे वडील डोळे बंद करून बसले होते. ते अर्धसत्य होते. वडिलांना माहिती होते, की त्यांनी काय पाहिले, त्यांच्या डोक्यात काय चालले आहे आणि याबद्दल लोकांना कसे संभ्रमात ठेवायचे.

शेतकऱ्याची बायको ताक घुसळत असतांना एका बडबड्या नोकराणीने, सायमनच्या एकंदर त्रासाविषयी सांगितले. जेव्हा वडील अरबास घरी पोचला, तेव्हा तो खिडकीशी लपला, जेणेकरून त्याला बायकोचा चेहरा बघायला लागू नये. संध्याकाळ आधीच झाली होती. फ्रांझ नावाचा गवंडी आला. त्याने अरबासच्या बायकोला हाक मारली व सांगितले की गुंझेनहॉसेन येथील खानावळीत सायमन पुरुष व बायकांना दारू प्यायला लावतो आहे व वाट्टेल तसे पैसे फेकतो आहे. नंतर मोठ्याने हसून तो म्हणालाः “पण थोड्याच वेळात ते तुझ्या लाडक्याची टिंगलटवाळी सुरु करतील. पोलीस तिथे यायला निघाले आहेत.” मग असे कळले की हे खरे नव्हते. सायमनविरुध्द वॉरंट निघाले असल्याची देखील फक्त अफवा होती.

सर्व नोकर मंडळी जत्रेला गेली होती. शेतकऱ्याची बायकोने भिंतीशेजारील बाकावर बसकण मारली. अरबास जड ह्रदयाने खोलीत फेऱ्या मारू लागला. थोड्याच वेळात त्यांना रस्त्यावरून विचित्र पदरव ऐकू आला. दाराची घंटी वाजवत व दारावर थापा मारत, लाकडी पायऱ्यांवरून शिव्याशाप देत लोक आत घुसले. ती बाई उडी मारून उभी राहिली व बाहेर जाऊ लागली. पण उंबरठ्याशी थांबली. अरबासने बोट उंचावले व निर्देश करू लागला. अजून काही नाही. आता खिडकीतून सायमनचा दारूने पांढरा पडलेला चेहरा दिसू लागला. त्याच्या डोळयात पापी चमक होती. त्याची आई रडून त्याला बाहेर हाकलू लागली. तो नाहीसा झाला. थोडा वेळ शांतता पसरली. मग पलीकडील खोलीतून गडबड ऐकू येऊ लागली. शेतातील दाराने सायमन घरात आला होता. अंधार होता आणि तो सामानाच्या खोलीतील भांड्यांवर आदळला. काहीतरी फुटले. त्याच्या आईने दार ढकलले आणि दिव्याच्या उजेडात त्या प्यायलेल्या मुलाला जमिनीपासून स्वतःला उंच केलेले पाहिले. त्याने त्याचे हात आईवडिलांकडे पसरले होते आणि त्याच्या तोंडातून शिवराळ भाषा निघत होती. कदाचित ॲडम अरबासच्या आयुष्यातील हा फसवा क्षण होता. त्यावेळी त्याच्या बायकोने त्याला डोक्यापासून पायापर्यंत थरथरतांना पाहिले.

मध्यंतरीच्या काळात, सायमनने त्याच्या खोलीत पळ काढला. मोठ्याने ओरडत त्याने दाणकन दार आपटले. परत शांतता प्रस्थापित झाली. अरबास उंबरठ्याशी जाऊ लागला. त्याच्यामागे त्याची बायको पदरात तोंड लपवून उभी होती. ते पाच मिनिटे तसेच उभे राहिले. नंतर अरबास झोपायच्या खोलीवरून गेला. मग शेतकऱ्याच्या बायकोच्या लक्षात आले, की आता काय होणार आहे. पण तिचे हात गोठून गेले व शक्तिपात झाल्याने, ती मध्ये पडू शकली नाही. सायमन इतका प्यायलेला होता की पलंगावर पडल्या पडल्या झोपून गेला. त्या बापलेकात काही संभाषण झाले का, हे काही समजले नाही. ती म्हणाली की एकदा सर्व शांत होते व नंतर बराच वेळ ते काही बोलत होते. पण दोन्ही दारे बंद होती. तिने सांगितल्या प्रमाणे ती धुराड्याच्या

कोपऱ्यात बसून होती. नंतर अनेक वेळा पडताळून बघितले गेलेल्या पुराव्याप्रमाणे, आतील आवाज तिला ऐकू येत नव्हते. ॲडम अरबासने त्याच्या मुलाच्या खोलीत व्यतीत केलेल्या वेळाबद्दल अनिश्चितता होती. एकदा ती म्हणाली तो वेळ पंधरा मिनिटांपेक्षा जास्त नसावा. तर दुसऱ्या वेळी ती तासभर म्हणाली. जो सुरा वापरला गेला तो अरबासचा नव्हता तर सायमनचा होता. तो त्याच्या खासगी मालकीचा होता, की खोलीत पडलेला होता, हे सुद्धा संदीग्धच होते. या मुद्द्यावर अरबास हट्टीपणे शांत होता. या महत्वाच्या परिस्थितीवर उजेड पाडला गेला नाही. मला हे सांगितले पाहिजे की सुरवातीला त्याची टोकाची चारित्र्यहिनता सोडली तरी, या घटना मला फार रुचीपूर्ण वाटल्या नाहीत. या घटना असल्या गुन्ह्यात अपरिहार्यपणे येतातच. ठामपणे हट्टी असलेले शेतकरी वडील, त्यांच्या  मानमरातबाला लागलेला धक्का, त्याच्या स्वतःच्या न्यायापेक्षा काहीही श्रेष्ठ नसल्याची त्याची अरेरावी, एखादा माणूस टोकाची नापसंती दाखवेल असे, त्या हलकट मुलाला आलेले रक्तरंजित मरण आणि दोघांच्या मध्ये लोंबकळत असलेली आई! हे नेहमी घडून येणारे अटळ असे भवितव्य होते.

तरीही हळूहळू भूतकाळाची व अरबासच्या चारित्र्याची काळजीपूर्वक चौकशी करून माझी रुची आणखी जास्त वाढली. जर जगातील कुठल्याही भिंतीसारख्या असणाऱ्या बांधकामाच्या कडेने तुम्ही चाललेले आहात आणि अचानक तुम्हाला भिंतीवरची पुसट खूण दिसली व ती हळूहळू ठळक होत गेली तर मग त्याचा अर्थ जाणून घ्यायची इच्छा बळावते. तुम्ही एकेक सत्य उलगडत जाता आणि लखकन क्षणार्धात तुम्हाला त्या खुणेचा उलगडा होत जातो. असेच काही माझ्या बाबतीत घडत होते.

तेरा वर्षे अरबास व त्याची बायको, यांना मूलबाळ नव्हते. तिने नशिबाचा अटळ भाग म्हणून हे स्वीकारले होते. तर अरबास या निसर्गाविरुध्ध दोन हात करू इच्छित होता. चौदाव्या शतकाच्या सुरवातीला फ्रँन्कोनिअन घराण्यातील अरबास हे नाव जुन्या विचारांच्या शेतकऱ्यांमधील शेवटचे होते. आपण वारसाशिवाय असणे हे त्याला कमीपणाचे वाटत होते. काम करून पैसे मिळवणे व ते वाचवणे हे निरुद्देश असल्यासारखे होते, नाही का? भरलेले घर, गाईगुरे, कोठारातील धान्य, शेते, कुरणे, गिरणी, नदी व झाडांच्या राईचे काय मोठेसे महत्व होते?

पण अरबासने कधीच कुणाकडे, त्याच्या बायकोकडेही, तक्रार केली नाही. संभाषणात हा विषय निघाला, तरी त्याची चर्या कधी बदलली नाही. अरेरावीचे प्रश्न किंवा शिव्याशाप कधीच त्याच्या तोंडून आले नाहीत.

पण महिन्यातून एकदा तो बायकोकडे रोखून बघत असे व तेव्हा त्याच्या इच्छेविरुद्ध काही उद्देशाशिवाय, त्याच्या डोळयातून एक प्रकारची शक्ती बाहेर पडे. कधीकधी शेतात काम करतानाही असे होई. मग तो धान्याच्या पेंढ्या बांधायचे थांबवे व बायकोकडे बघत बसे. किंवा कधी मध्यरात्री उठून कोपरे टेकून तो बायकोकडे बघत असलेला सापडे. किंवा चर्चच्या अलीकडील चौकात ती कुणा बायकांशी बोलत उभी असे व तो तिच्याकडे बघत राही. अचानक ती मग मूक होई

कारण तिच्यापासून तीन पाऊलांवर तो तिला निरखत उभा असे. कधी राग नाही, कधी धमकी नाही, कधी काही आक्रस्ताळेपणा नाही. फक्त शोधक नजरेने, त्याच्या दाट, केसाळ भुवयांखालून खूप वेळ शांतपणे तिला निरखत रहाणारा माणूस!

प्रत्येक महिन्याला ते होण्याची आशा व खात्री असे. सुरवातीला ती बाई आता तरी आपल्यात काही बदल होईल, अशी अपेक्षा करत बसे व काळजी करत नसे. ती काही आनंदी बोलून वेळ मारून नेत असे. नंतर ती त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून, ती मनातून घालवून देण्याचा प्रयत्न करू लागली. पण नंतर असे तास आणि सबंध दिवसच्या दिवस आले, की ती आश्चर्य व काळजी करू लागली. ती शेतकऱ्याला तोंडावर काही विचारू शकत नव्हती. ती त्याच्या भावनामय सावलीला विचारी.

ती त्याबद्दल विचार करकरून उदास होई. माणसांना एकमेकांशी बोलता येत नाही का? त्याच्या डोक्यात काही बोलायचे नव्हते का? त्याला मन नव्हते का? तिने सरळ आत्मविश्वासाने त्याला विचारायचे ठरवले. पण प्रत्यक्ष वेळ आली तेव्हा ती गळाठली. तिच्यात एक न्यूनत्वाची भावना आली. शब्द अडखळू लागले आणि मग बोलणे झालेच नाही. तिला वाटले, की तिचा काय दोष आहे. पण काहीतरी दोष होता आणि तो तिच्यातच होता. ॠतुमागून ॠतु चालले होते. नवनवीन कामांनी दिवस पुढेपुढे जात होते. परंतु काही केल्या समाधान लाभत नव्हते. शेतकऱ्याची उत्सुक/निराश नजर तिचे विचार खच्ची करत होती व तिचे रक्त उसळवून तिच्यात खोलवर अपराधीपण जागवत होती. नोव्हेंबर ते फेब्रुवारी घराच्या भिंती व छप्पर जास्त जास्त असह्य होऊ लागले. आतील हवा जड झाली. खिडकीच्या काचांवर आभाळ उतरून आले. संध्याकाळी तिचे शरीर ओल्या पोत्याप्रमाणे भरून आले तक्तपोशीवरचे पातळ कापड वाळू लागले. गाई गुलाबी झऱ्यात बसू लागल्या. बर्फाच्या भिंतींपासून गोठयापर्यंतचा रस्ता दिवस गेलेल्या गवळणीच्या हातात झुलणाऱ्या कंदीलावर पडणाऱ्या इंद्रधनुष्याच्या रंगांनी उजळून निघाला.

ती फक्त दोनच गोष्टींची काळजी करत होती. तिचे शरीर व तिची भीती. अठ्ठावीस दिवस व रात्री काही त्रास न होता गेल्या. ओठात पाईप धरून, अरबास चुलीजवळ बसे, खानावळीत जाई, परत चुलीशी बसे आणि वर्तमानपत्र वाचे. कोबी व शिजवलेले अन्न वाढून घेई. देवाचे नाव घेई. दुसऱ्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेई. त्याच्या हावभावात काही गुप्त नसे. असूया वा द्वेष नसे. फक्त शांतता.

आणि मग तो क्षण आला. आधीच त्या बाईला स्वतःच्या शरीरात त्याची चाहूल लागली. ती अगदी मुळापासून थरारून गेली. दार उघडून तो आत आला. सकाळी, रात्री उशिरा, सलूनमध्ये, धान्य पाखडण्याच्या ठिकाणी, सगळीकडे तो अगम्य असे भाव चेहऱ्यावर घेऊन उभा राहू लागला. घसा खाखरणे नाही, काही हावभाव नाहीत, काही शब्द नाहीत. फक्त असे विचारणारी नजर, की का नाही? इतर सगळ्यांना, मग फक्त तुलाच का नाही? तुझे शेत उजाड का?

अशा तऱ्हेने बारा वर्षे गेली. आणि मग त्या बाईला विरोध करण्याची शक्ती आली. ती रागीट व दुष्ट स्वभावाची बनली. तिच्या रात्री झोपेविना तळमळत जाऊ लागल्या. शेतकऱ्याचे डोळे रात्री जळजळू लागले. तो रात्री झोपला असला तरी तिला वाटे, की तो आपल्यावर डोळे रोखून आहे. दिवसा त्याच्या आवाज आला, की ती धान्याच्या कोठाराच्या कोपऱ्यात थरथरत बसे. तिला सर्व बाजूंनी आवाज आल्यासारखे वाटत राही. ती घरकामात स्वतःला बुडवून टाके. नोकर शांत बसून रहात.

ती त्याला नकार देई. त्याच्या मिठीत अस्वस्थ होई. तिच्या अंधारी भावनांना असे वाटे, की त्याला नकार दिला तर मग, तो मनुष्य काही मागणी करणार नाही. त्याने स्पर्श केल्यास, ती थंड पडे आणि तिचे रक्त गार पडे. ती पूर्ण बर्फासारखी होई. मग नवीन प्रकारे अरबास तिला छळू लागला. पण अशा तिला दुःखाची सवय नव्हती. तिचा तो शाब्दिक छळ करत नसे तर तिला भीती घालत असे. त्याच्या छळण्यात काळजी व उदासी असे. जर तिने स्वतःला लपवून ठेवले व त्याला तिला शोधायची पाळी आली तर त्याला शोधूनही ती सापडत नसे. त्याचा एखाद्या पशूसारखा छळ होई. एका वर्षाहून अधिक काळ असे चालले. हळूहळू त्या बाईची भीती गेली. तिला कळून चुकले की त्याच्या नजरेत आता ती, एक गांजलेली प्राणी राहिली. तिला खायला द्यावे. ती मर्जीप्रमाणे वागल्यास कुरवाळावे नाहीतर मारझोड करावी. पण मग यथावकाश, तिने तिचे वागणे बदलल्यामुळे, तो तिला मान देऊ लागला. ती पुन्हा त्याच्याकडे वळली. नंतर एका महिन्यात तिला दिवस गेले.

जेव्हा याची खात्री झाली, तेव्हा तिच्यात बदल घडून येऊ लागला. ती डौलात पाऊले टाकत घरात हिंडू लागली. कामात तिची प्रगती होऊ लागली. ती प्रत्येक गोष्टीत रस घेऊ लागली. ती आनंदी व बोलघेवडी होऊन उमलू लागली. सगळेजण आश्चर्यचकित झाले. अरबासलादेखील नवल वाटले. तिला तिच्या अगदी जवळ काय आहे, हे त्याला सांगायची इच्छा होत नसे. तिला तो उत्सवी प्रसंग वाटे. जणू ती त्याला काही मूल्यवान भेट देते आहे. इस्टर पूर्वीच्या गुरुवारी, तिने तिचा सुट्टीचा ड्रेस घातला. त्याच्या काळया टोपीला चंदेरी बंद होते. नंतर तिने अरबासला वरच्या मजल्यावरच्या खोलीत बोलावले. तिथे अनेक शतकापासूनची चांदी व चिनी मातीची परंपरागत मूर्ती होती. ती गंभीरपणे हात जोडून एका आरामखुर्चीत बसली. तिने त्याला थोडक्यात व साधेपणे काय सांगायचे ते सांगितले.

अरबासच्या शक्तिमान शरीरातून जणू वीजप्रवाह वहात गेला. जेव्हा एकोणीस वर्षांनंतर तिने अरबासला धक्का देत एक चित्र रंगवले, तेव्हा हे स्पष्ट दिसत होते की त्या क्षणाची आगळी अनुभूती ती पुन्हा जगत होती. अरबासचा मातकट चेहरा लाल झाला. तो जोरजोरात हसू लागला. नंतर त्याच्या डोळयातून अश्रू येऊ लागले. त्याने तिच्याजवळ जाऊन इतक्या धसमुसळेपणे तिचे खांदे घुसळले की ती ओरडू लागली.

तिने ते प्रेमाने न घेतलेले बघून तो चमकला व मग त्याने तिच्या पाठीवर आश्वासक पद्धतीने हळूवारपणे थोपटले. तेव्हा त्याच्या घशातून ऑर्गनच्या मधुर सुरावटीसारखा आवाज निघाला.

त्याने अधिकारवाणीने तिला स्वतःची काळजी घेण्यास सांगितले. तो गुप्तपणे डॉक्टरकडे सल्ल्यासाठी गेला. त्याच्या बायकोची घरातील कामांपासून सुटका व्हावी, म्हणून अजून एक नोकराणी ठेवण्यात आली. तो तिच्यावर लक्ष ठेऊ लागला. ती चालतांना तिच्या वाटेत काही पडलेले असल्यास, बाजूला करू लागला. बाळाचे कपडे शिवले गेले, तेव्हा तिथे बसून मोठ्या डोळयांनी डोके हलवत, ते बघू लागला. नेहमीप्रमाणे दिवस जात होते आणि मग बाळाच्या जन्माची वेळ येऊन ठेपली. अरबासने बराच वेळ बाळाला हातात धरून ठेवले. मोठ्या आनंदाने व कुतुहलाने तो त्या छोट्या, अशक्त, कशातरी दिसणाऱ्या मासाच्या गोळयाकडे बघत राहीला.

शेतकऱ्यांची मुले वाढतात तसाच सायमन वाढला. त्याच्यासाठी काहीही सोपे केले गेले नाही. कितीही काळ तो अधीरतेने थांबला, तरी त्याला शिकवले गेले नाही. त्याची काय लायकी होती ते लोकांमधील त्याच्या वागण्याने व उद्योगाने सिध्द होणार होते. काहीही विधायक गोष्टी त्याच्या लहानसहान खेळांमधून व स्वभावातून दिसेनात. काही चांगले निष्पन्न होईना. तू लायक

आहेस की नालायक? या प्रश्नाचे उत्तर मिळवतांना अरबासमधील सखोल निरीक्षक संशयाने अस्वस्थ होई. त्या मुलाच्या नाडीचे ठोके जणू तो ऐके. सतत मुलाकडे लक्ष देऊन त्याला ताण येई. त्याने त्याच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडत. तरीही सायमनचे शब्द व हालचाली तो फार बघत नसे. तसे बघणे काही उपयोगाचे नाही हे त्याला कळे. भोवताली घडणारी प्रत्येक गोष्ट तो किती नेमकेपणाने बघतो, हे कळत नसे. हळूहळू मला कधीही विसरता येणार नाही, किंवा खरे तर शब्दात मांडता येणार नाही, अशा पद्धतीने सत्य कळत गेले. माझ्या बाजूने तेच फक्त शक्य होते.

अरबासच्या आत्मभानातून त्याचे व मुलाचे अगदी उच्च प्रकारचे असे आदर्श संबंध जोडले गेले होते. अरबास शेतकरी होता. पण कुणावर अवलंबून नसल्याने बहुधा तो स्वतःला राजा समजत असे. जमीन त्याची होती. ती कसणारे हात त्याचे होते. त्याच्यासाठी, त्याच्या शेतासाठी, हंगाम बनवले गेले होते. तो शेताचा देव होता. पुरातन काळापासून त्याच्या शेताच्या सीमेवर असलेल्या दगडावर त्याची नजर होती. गवताचे पातेही त्याच्या परवानगीशिवाय उगवत नसे. सर्व मिळकत त्याच्यासाठी पवित्र होती. तो त्या मिळकतीचा मालक तिचे, धान्याच्या शेवटच्या कणापर्यंत व संपत्तीच्या शेवटच्या पेनीपर्यंत डोळयात तेल घालून रक्षण करत असे. हे सर्व मुलाकडे वारसा हक्काने आले. वडिलांनीही आनंदाने दिले. वर्षानुवर्षे असेच चालत आलेले होते. असे न होणे अशक्य होते.

मी माझ्या गोष्टीत पुढे जातो आहे व संदर्भ सुटत चालला आहे.

कामाचा एक अटळ भाग म्हणून, अरबासची तपासणी केली गेली. पण त्यात विशेष काही निघाले नाही. त्याचे उत्तर कधीच बदलले नाही. त्याच्या पुनरावृत्तीने तो कंटाळून, दमून गेला. मी सायमनला मारले, एवढ्यावरच तो अडून बसला. तो काहीच स्पष्टीकरण देईना. त्याच्या वकीलाचेही तो काही ऐकेना. स्वतःचा बचाव करेना. काहीही सूचना वा उपदेश ऐकून घेईना. मी त्याच्या निदर्शनास आणले की त्याने खुनाचा हेतू स्पष्ट केला, तर त्याची शिक्षा खूप कमी होऊ शकेल. पण तो अगदी त्रोटक वाक्यात उत्तर देई, “हे मुद्द्याला सोडून आहे.” असे म्हणे. मी निरर्थक प्रश्न विचारायचे थांबवले. कोर्टाला सुपूर्द केलेले साक्षीदारांचे निवेदन, आणि मला अरबासबद्दल व सायमनबद्दल जे काही समजले होते ते, या सर्वावरून मला असे वाटत होते की यामागे उद्देशांची एक सलग साखळी आहे.

परंतु दोन बाबी अशा होत्या, की ज्यावर प्रकाश पडला नव्हता. पहीली म्हणजे प्रेतावर कपड्यांवर, हातांवर, चेहऱ्यावर, कुठेही मारहाणीच्या खुणा नव्हत्या. जर शेतकऱ्याने स्वतः सांगितले नसते, तर त्याने खून केला हे कळणे अवघड होते. दुसरा वादाचा मुद्दा असा होता की

सुरा सायमनचा होता. अरबास सांगत होता की तो सायमनच्या कंबरेला लटकवलेला होता आणि त्याने फक्त तो बाहेर काढला. हे देखील त्याने त्याच्यावर फार दबाव आणला गेल्यावर सांगितले. असे घडले नसल्याची शक्यता वाटत होती. दुसऱ्या दिवशी असे सांगितले गेले, की त्या दिवशी सकाळी सायमनने त्या सुरीने पाव कापला होता व ती टेबलावर पडलेली होती. अशा महत्वाच्या गोष्टीबद्दल अरबासची अनिश्चितता पाहून मला नवल वाटले होते. त्याने शरमेने मान खाली घातली होती. फक्त त्यावेळी मला तो गोंधळलेला वाटला.

त्या मूक जिभेला बोलते करण्याची उर्मी माझ्या मनात दाटून आली. मी त्याच्याबद्दल खूप विचार केला. या केसची लपलेली स्पष्टता आणि मला तो गुंता सोडवण्याचा लागलेला ध्यास, यामुळे अस्वस्थ होऊन मी चिडलो. वारंवार माझा आतील आवाज मला सांगत होता. “हा मनुष्य खुनी नाही. एखाद्या कोंबडीला ज्या सहजतेने मारावे, तसा सहजपणे मनुष्याचा गळा चिरणारा हा माणूस नाही. तो स्वतःला त्याच्या मुलाचा क्रूर खुनी म्हणवतो आहे. त्याने गुन्हा कबूल केला आहे, पण खरे काय झाले असेल? खोलीत त्याने जितका वेळ घालवला, तेवढा वेळ तो नक्कीच शांत राहिलेला आहे, फार तर त्याने संशय असल्यासारखे खांदे उडवले आहेत. अगदी शेवटच्या सुनावणीच्या वेळी त्याने कसेबसे कबूल केले, की तो खोलीत कदाचित फक्त अर्धा तासच होता. अर्ध्या तासात असे काय घडले? त्याला माझा अंदाज आला व त्याची भुवई चढली.

माझ्या लक्षात आले, की माझा अस्वस्थपणा घालवण्याचा एकच उपाय आहे आणि तो म्हणजे, माझा व्यावसायिक दृष्टीकोन बदलून माणुसकीने हे प्रकरण हाताळणे. मला असे वाटले, की मी काही प्रमाणात त्याचा विश्वास संपादित केला आहे. वेळोवेळी उद्भवणाऱ्या विवाद्य मुद्द्यांवर, मी इतक्या नाजूकपणे चर्चा सुरु केली आणि तेव्हा मला त्याची ऋणाईतासारखी असलेली भावना समजली. जन्मतः असलेल्या त्याच्या संशयी स्वभावाला घाबरून, तो अचानक मला अनोळखी कोशात ढकलून झिडकारून टाकेल की काय, असे वाटत होते. आमचे वेगळे स्वभाव एका सामाईक पातळीवर कसे काय येतील, याचीही मला काळजी होती. पण त्याच्याबद्दल माझ्या मनात असलेल्या कणवेने, हे सारे संशय पळवून लावले. ॲडम अरबास काही सामान्य शेतकरी नव्हता. तो शेतकरी असला तरी उमराव होता. त्याची बुद्धीमत्ता व चारित्र्य त्याच्या व्यक्तिमत्वातून दृगोचर होत होते. त्यामुळे माझी कारवाई वाया जाणार नाही, अशी मला आशा होती. मी आता अजिबात वेळ न घालवायचे ठरवले. डिसेंबरमधील एका संध्याकाळी मी तुरुंगातील त्याच्या खोलीत जाऊन त्याला भेटलो.

तुरुंगात तो आरामशीर असेल, असे मी पाहिले. तशी ती बरी जागा होती व्यवस्थित फर्निचर होते. बेसिन, पलंग व आरसा होता तापमान नीट राखलेले होते. तो एका दिव्याच्या उजेडात बायबल उघडून त्यासमोर बसला होता. मी त्याला अभिवादन केले. माझा कोट काढून खुंटीला अडकवला. टेबलाशेजारी त्याच्यासमोर बसलो.

दर वेळी मी त्याला बघायचो, तेव्हा मला नव्याने धक्का बसायचा. आत्ताही तसेच झाले. तो एखाद्या बैलाइतका तगडा होता. त्याचे डोके, खऱ्या देशी फ़्रॅन्कोनिअन सारखे मोठे व वाटोळे होते. पण कवटी जुन्या पिढीसारखी हाडे बारीक असलेली होती. कातडी नितळ, निळया पिवळसर रंगाची होती. त्याचे तोंड रुंद व ओठ पातळ असून, तो नाकेला होता. त्याचा व्यवस्थित दाढी केलेला चेहरा एखाद्या जुन्या नटासारखा दिसत होता. त्याचे हात राक्षसासारखे होते. त्याचे दाट पापण्या असलेले डोळे फार उघडत नसत. पण जेव्हा पूर्ण उघडत, तेव्हा रोखून बघत व त्यांचा सामना करणे मला कठीण जाई.

विषयाला तोंड फोडायच्या दृष्टीने मी त्याला म्हणालो, की खूप दिवस माझ्या मनात त्याला भेटायचे होते. पण कामामुळे यायचे राहिले. पण तरीही –- त्याची हरकत नसेल तर -- एखादा मित्र भेटायला यावा, तसा मी आलो आहे. तसे पाहिले तर तो माझ्या छत्रछायेखाली होता व त्याचे कुशल बघण्यासाठी मी जबाबदार व्यक्ती होतो.

तो बराच वेळ माझ्याकडे शांतपणे बघत राहिला व शेवटी म्हणाला, “हे तुम्ही चांगले केले.”

मी सावधपणे हालचाल केली व बोललो, “तू माझे असे स्वागत करावेस असे मला वाटत नाही. मला अशी आशा आहे, की आता तू माझ्यावर अविश्वास दाखवणार नाहीस. न्यायाधीशाबद्दल संशयी असणे स्वाभाविक आहे. पण तू मला समजून घे. मी आज तुझ्याकडे माझ्या व्यावसायिक कामासाठी आलेलो नाही, तर उत्सुकता म्हणून आलो आहे. आता आपण सुनावणीसाठी तयार आहोत. मला चौकस असण्याचे काही कारण आहे. मला वाटते जेवढे माहिती करून घ्यायला हवे, तेवढे मी करून घेतले आहे. खरे तर मी का आलो आहे हे मलादेखील नीटसे माहिती नाही. मला यावेच लागले. ते माझे कर्तव्य होते.”

परत खूप वेळ अरबास शांत होता. मग तो बोलला, “माझा तुमच्यावर विश्वास आहे.”

मी तो धागा पकडून ठेवला व म्हणालो, जर तू माझ्यावर विश्वास ठेवतोस, तर मग आपण दोन ओळखीच्या माणसांसारखे सावकाशीने, काय घडले त्यावर बोलू.”

अरबास चमकला व बोलला, “काहीही म्हटले तरी त्याचा काय उपयोग आहे? हे दुर्दैव होते की ती घटना घडली.”

मी ओरडलो, “तोच तर प्रश्न आहे. ते घडायलाच हवे होते का? अगदी हवेच होते का?”

त्याने मान उचलली. पण त्याची नजर खालीच राहिली. तो बोलला, “त्याबद्दल संशय घेणे म्हणजे मूर्खासारखा धीटपणा आहे.”

मी चालू ठेवले, “इथे केवळ संशयालाच जागा नसून, समाज तुमचे कृत्य नाकारतो आहे व त्याचा धिक्कार करतो आहे. जर प्रत्येक माणसाला त्याच्या समजुतीप्रमाणे न्याय द्यायला सांगितला, तर संकटे संपणारच नाहीत व आणि आपण रानटी श्वापदांनी वेढलेले राहू. तुझी सद्सदविवेकबुद्धी तुझ्या कृत्याचे कसे समर्थन करते हे मला कळत नाही. पण तू समाजाला उत्तर देऊ शकतोस.”

अरबासने डोके हलवले. लागते नसल्यासारखा तो पुटपुटला, “आता बोलून काय होणार? व्हायचे ते झाले आहे.”

मी म्हणालो, “तू व समाज यामधील पाटी नीट पुसली गेली पाहिजे. जोपर्यंत तू मोकळेपणे बोलण्याबाबतची तुझी नकारघंटा चालू ठेवशील, तोपर्यंत भीती आणि गोंधळ आहे तसाच राहील.”

“पण माणसाकडे स्पष्टीकरणासाठी शब्द नसतील तर?”

“ते त्याच्याकडे नाहीत, की त्यांनी ते हट्टीपणे व तोऱ्याने ते अडवून ठेवले आहेत? जरा स्वतःमध्ये डोकावून बघ.” मी करवादलो.

तो म्हणाला, “माझी जीभ चाचरते आहे. मला बोलायची सवय नाही.” त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. मला जाणवले की मी त्याला अजून प्रवृत्त करू शकत नाही. मी थांबलो. त्याने शेवटी त्याच्या छातीत दम भरला व नजर झुकवत सांगितले, “मी त्याला ते करायला लावले. म्हणजे मीच ते केल्यासारखे नाही का?” तो विचित्र, तिरकसपणे बोलला. “तुम्ही सगळे याला कितीही आव्हान द्या. पण ज्या माणसाने त्या मुलाला ते पाप करायला लावले, त्याचाही त्यात वाटा होताच. मीच त्यासाठी जबाबदार आहे. मीच माझ्या बायकोला त्याला, तिच्या पोटातून काढायला लावले. इतर बायका त्यांच्या मुलाचे ओझे नऊ महिने वागवतात. पण त्याच्या आईने त्याचे ओझे, खरे तर तेरा वर्षे वागवले आहे. मीच तिला त्याला जन्म द्यायला लावला. मीच

देवाकडे त्याची मागणी केली. तो जन्मण्यापूर्वी मीच सर्व काही ठरवले. तो असा असला तर माझ्यामुळेच आहे आणि हेच मी मला सतत सांगत आलो आहे. जमिनीतून मातीचा गोळा काढून त्याला तुम्ही पाहिजे तसा आकार द्यावा, त्याला तुमच्या आवडीप्रमाणे वाढवावे. आणि अचानक तुमच्या लक्षात यावे की तो तर अजून केवळ मातीचा गोळाच राहिलेला आहे. मग तुम्ही तो जिथून आला त्या पृथ्वीवर, मातीत त्याला परत फेकून देता."

तो तिरकस भाव खोलवर गेला. त्याने अर्धमिटल्या डोळयांनी माझ्याकडे आरपार पाहिले. मी सुचवले, "तुम्हाला हे हळूहळू कळत जाते, की तो पापी बनण्यासाठीच जन्माला आलेला होता."

त्याने माझ्याकडे उद्धट व शिरजोरपणा दाखवणारा कटाक्ष टाकला. "सुरवातीपासूनच तो वाईट होता. ते वाईट रक्त मी माझ्या नाकाने हुंगलेले आहे. अत्यंत वाईट पूर्वसंचित! फारसे लक्ष न देता वाढलेला व त्यामुळे तसाच निपजलेला. ते सुरवातीला वाकडे असतात पण काळ त्यांना सरळ करु शकतो. पण त्याच्या बाबतीत तो वाकडेपणा वाढतच गेला. मग मी जाणले, की हे पुढे असेच वाढत जाणार आहे. आणि तसेच झाले. रोज कणभर, असे करता करता शेवटी त्याचा पर्वत झाला. मग मी मलाच विचारले, "ह्याचा शेवट कसा होईल? जेव्हा तुम्ही एका बाबतीत त्याला समजावून सांगता किंवा ते नकोसे झाड उपटून टाकता, तेव्हा ते दुप्पट जोराने दुसऱ्या ठिकाणी वाढते. जेव्हा तुम्ही ते प्रकरण स्वतःच्या हातात घेऊ बघता, तेव्हा ते तुमच्या हातातून निसटून जाते. याला काही इलाज नसतो."

मी विचारले, "पण उत्तम मशागतीने दोष असलेल्या बियांमधून चांगले पीक काढता येत नाही का? तुम्ही त्याची सद्सदविवेकबुद्धी जागृत करायचा प्रयत्न केलात का? तुम्ही गंभीरपणे त्याला शिकवायचा प्रयत्न केलात का?"

प्रथमच अरबासने त्याचे डोळे उचलून वर पाहिले. तो उत्तर देण्याची असमर्थता दाखवत घाईने म्हणाला, "सर, कुणी माणसामधील गुणसूत्रे बदलू शकत नाही. मी मनाशी विचार केला, जर डोळे बघू शकत नसतील तर त्याला आपण काय करू शकतो? जर उदाहरण पुरेसे होऊ शकत नसेल तर छडीही पुरेशी होऊ शकत नाही. बोलण्याबद्दल म्हणाल तर माझ्या बायकोने तिचे कर्तव्य केले. या गोष्टी बायकांना जास्त चांगल्या समजतात. जर माझ्या बायकोमधील माझा आवाज त्याला ऐकू जात नसेल तर मग काय करणार? जर काही न बोलता मी संस्कारातून त्याला काही देऊ केले, तरी ते घ्यायची त्याची तयारी तरी हवी की नको? हे मी मलाच समजावले. मी त्याला मार्गदर्शन केले, तेव्हा तो तसे वागू शकला नाही. मी त्याच्या मागे गेलो, तेव्हा त्याने पलटी मारली. त्याने मला कधी पाहिले नाही, कधी ऐकले नाही. एखाद्याला पकडून त्याच्या कानात

ओरडणे, हे माझ्या तत्वात बसत नाही. “अरे माणसा, नीट वाग.” असे आपण म्हटले, तरी जर नीटनेटकेपणा त्याच्या स्वभावातच नसेल, तर काय करणार? सगळी माणसे प्रार्थना करत असतांना, एखादा मख्ख चेहऱ्याने उभा राहिला, तर तो वाया गेलेला प्राणी आहे. मुळाला आधीच कीडीने ग्रासले असेल, तर औषध फवारणीचा काय उपयोग?’

मी विचारले, “या सर्वाची तुला खरच खात्री होती का?” कारण त्याचा आवाज व शब्द यावरून त्याला, काही वाईट घडणार असल्याची खात्री आहे असे वाटत होते. मी थोड्या नम्रपणे विचारले, “हे सर्व असेच होणार याबद्दल तू अगदी ठाम होतास?”

त्याने टेबलावर त्याचे हात पसरले. जड श्वास घेत तो म्हणाला, “जर माझे रक्त व मास उसळत असेल, तर त्याविरुध्द एखाद्या लबाड व्यापाऱ्यासारखा मी कसा काय भांडू शकतो? जर मी लावलेल्या वृक्षातून विषारी वाफा येत असतील तर, मी शाळामास्तरासारखा छडीचा उपयोग करणे अपरिहार्यच ठरते की नाही? मला जाणवले की त्याच्यात काही भावना नाहीत, व शरमही नाही. तुम्ही ज्याच्यावर तुमचा सर्व भार घालू इच्छिता, तो जर पापी असेल, फक्त पापी, तर तुम्ही घसरून पडणार, हे नक्की! तुम्ही त्याची हाडे काढून, परत तर जुळवू शकत नाही. किंवा त्याचा मेंदू किंवा हृदय तर बदलू शकत नाही.”

त्याचा शक्तिमान चेहरा थरथरून चमकू लागला. हा मनुष्य, जो इतका काळ --आयुष्यभर -- कुणाशी काही तक्रारवजा बोलला नाही -- तो माझ्यासमोर शब्द जुळवून -- मला थक्क करून टाकणारे काही बोलून त्याचे मन मोकळे करत होता.

अचानक माझे असे मत झाले की तो माझ्याशी, माझ्याकडे वळून बोलत होता, असे मला नुसते वाटत होते. खरे तर तो, न केलेला खून, बाजूला टाकायचा प्रयत्न करत होता. त्याबद्दलचे प्रश्न तो काही आज पहिल्यांदा ऐकत नव्हता. तो मला जे सांगत होता, ते बराच काळ त्याच्या आत खदखदत होते. आता ते फक्त उसळून बाहेर पडत होते. त्याचे रोखून धरलेले शब्द व भावना आता तो थोपवू शकत नव्हता. त्याच्या स्वतःच्या आवाजातील दुःख नाईलाजाने ऐकत तो उभा होता.

झुकलेल्या मानेने व आ वासलेल्या तोंडाने त्याने पुढे चालू ठेवले. त्याचा आवाज जास्त शांत झाला होता, “तुम्ही विचाराल, तुला हे पहिल्यांदा केव्हा लक्षात आले? केव्हा तुझ्या आशेवर पाणी फिरले? महारोग्याला विचारा केव्हा त्याची जखम भळभळू लागली? अर्थात त्याला ते पहिल्या दिवसापासून माहिती असते पण तो त्यावर तेव्हाच विश्वास ठेवतो, जेव्हा ते दुखणे त्याला

अंथरुणावर आडवे पडायला लावते. रात्रीमागून रात्री मी माझ्याविषयी व त्याच्याविषयी विचार करण्यात घालवल्या आहेत. महारोग वाढत जाताना पाहिला आहे. या पापाशी कसा सामना करायचा, याचे मनाशी नवल करत माझ्या जाणीवेचा छळ करून घेतला आहे. शिस्त? शिस्त नेहमी एक पायरी मागे असते आणि गैरकृत्य एक पायरी पुढे! ज्या काठीने मी त्याला मारले असेल, ती काठी तुटून माझ्या हातात आली असेल आणि त्याच्या पाठीवरचे वळ फक्त निगरगट्ट झाले असतील. मी नियम तोडायला हवे होते का? कसले नियम? चुका होणार नाहीत, असे नियम आहेत का? कुत्र्यासारखे मी त्याला साखळीने बांधून ठेवायला हवे होते का? मी त्याच्या दुर्गुणांवर घातलेली बंधने, माझ्यावरच घातली नव्हती का? मी झाड, तो फांदी, मी वात तो ज्योत, मी पृथ्वी तो वसंत ऋतु. झाड फांदीशी कसे भांडणार? दोघांमधून एकच जीवनेच्छा वहाते. आणि ज्योतीला जीवन पुरवणारी वात? आणि पृथ्वीतूनच फुलणारा वसंत? हे सर्व खरे आहे. पण मग हे पाप आले कुठून? ते वणव्यासारखे पसरू लागले होते. पण ते आले तरी कुठून? किती दुष्टपणे ते पसरते आहे. पहिल्यांदा लहानसे खोटे. मग गंभीर. पहिल्यांदा चोरलेली एक पेनी. मग पौंड. पहिल्यांदा जनावरांना त्रास देणे. मग माणसांना. पहिल्यांदा खिसा कापणे. मग इभ्रत घालवणे. पहिल्यांदा लबाड मनुष्य. मग भडवा. मान नाही. विश्वास नाही. सचोटी नाही. प्रेम नाही. हे सर्व आले कुठून? माझ्याकडून? तसेच असणार. मी मलाच विचारले. अरबास, तुझ्या शरीर व आत्म्यातून हे असे जहर, तू या जगात आणलेस तरी कसे आणि केव्हा? मनुष्य फक्त घृणा आणि भावनांचा खेळ असू शकतो?

धापा टाकणाऱ्या श्वापदासारखे, शांत नजरेने त्याने माझ्याकडे पाहिले. परत शांतता पसरली. त्याने कोटाच्या बाहीने घाम पुसला. त्याच्या निराशेने मला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटली. मी ती वाटून घेतली. पण त्याच्या अतिरेकीपणाला मी शिव्या दिल्या. मी अरबासला म्हणालो, “एखाद्या माणसाला जितकी जबाबदारी घेण्याचा हक्क असतो, त्यापेक्षा जास्त जबाबदारी तू घेतो आहेस. जेव्हा तू तुझे कर्तव्य ताणतोस, तेव्हा तुझा कर्तव्य करायचा हक्कदेखील तू ताणतोस. तू एक मनुष्य म्हणून व वडील म्हणून फक्त तुझा विचार करतोस. पण जिचा मुलावर तुझ्याइतकाच, किंबहुना जास्तच अधिकार आहे, त्या तुझ्या बायकोचा तू विचारच करत नाहीस. ती तुझ्या तर्कटाला कधीच मान्यता देणार नाही. कुटुंबाचे पाश उध्वस्त करणाऱा तुझा, खून न करता खून केल्याचा स्वतःवरचा आरोप, ती कधीच मान्य करणार नाही.”

अरबास थंडपणे म्हणाला, “त्याची आपण चर्चा करू शकत नाही. आपण तर्काच्या पलीकडे गेलो आहोत. ती माझे विचार मान्य करेल का, हे मला माहिती नाही. तिचे दुःख मोठे आहे. पण माझा मी शिक्षेला पात्र असल्याचा कबुलीजबाब, त्याहून जास्त मोठा आहे. तिच्या आयुष्यात

काही शिल्लक राहिले नाही. पण माझे आयुष्य अनेक वर्षे विषमय झालेले आहे. नक्कीच तिची अवस्था माझ्यापेक्षा दयनीय आहे. तिच्या शरीराने नाखुशीनेच हे फळ दिले आहे, माझ्या अहंकाराचा व मूर्खपणाचा सूड घेतला गेला आहे. माणसाने निसर्ग समजून घेतला पाहिजे. त्याऐवजी आपण त्याची व्याख्या करायचा अट्टाहास करतो. त्याच्या बंद दारावर टक्कर मारून त्याला सुधारायचा प्रयत्न करतो.. स्त्रीला एकच मूल असू नये. मग त्याच्यावर फार अवलंबून रहायची पाळी येते. मला नऊ भावंडे होती. पण त्यातील सात मेली. माझ्या आजीला सोळा होती. त्यातील आठ लवकरच मेली. असल्या मृत्यूहून वाईट काही नाही. शेतात पेरलेल्या प्रत्येक बीला फळ येतेच असे नाही. कुणालाही एकुलते एक अपत्य असू नये. मग धोका खूप असतो. हे शेवटी नशीब आहे. नाही, त्याचे विश्लेषण करणे बरोबर नाही. कारण आपण इथे धगधगत्या ज्वाळेशी पंगा घेत असतो, ज्यामुळे आपल्याला भाजले जाण्याचा धोका असतो. आईचे एकुलते एक मूल जर देवाकडून व माणसाकडून धिक्कारले गेले, तर मग त्या आईच्या दुःखाला पारावार रहात नाही. ते मूल म्हणजे तिचे अमरत्व असते. तो तिच्यावर कुऱ्हाड उगारून आला तरीही त्याचे आयुष्य तिच्या दृष्टीने तिच्या आयुष्यापेक्षा अनमोल असते. तिच्यासाठी चांगले वाईट अर्थहीन असते. त्यांच्यापेक्षा रक्त जास्त मोठ्या आवाजात बोलते.

ते ‘बाबा’ म्हणू ओरडते. मला आश्चर्य वाटते, ‘बाबा’ या शब्दाचा अर्थ काय? मी एखाद्या नोकराणीबरोबर झोपलो तरी तिच्यापासून मला झालेले मूलही मला बाबाच म्हणेल. पण ते सारखेच असेल का? नाही. ते मूल कदाचित, कदाचित मला हवे तसे असेल. मग त्याला का वाढवू नये? त्याला का धिक्कारावे? कायदा तसे म्हणतो म्हणून? पुरुष माणसाच्या इच्छा स्त्रीपेक्षा जास्त आक्रमक व खोल असतात. त्यामुळे वडिलांचे अपराधीपण आईपेक्षा जास्त असते. त्यामुळे देवाच्या दरबारात आईपेक्षा त्यालाच जाब विचारण्यात येतो. तोच मागील व पुढील पिढीचा दुवा असतो. त्याच्या मुलाच्या रूपाने पुढील सर्व पिढ्या त्याच्याकडे बघत असतात.”

तो खुर्चीतून उठला व आकाशाकडे हात पसरून बोलला, “मी माझा विश्वास गमावला आहे.” मग तो परत खाली बसला.

आपल्याला या परिस्थितीतून पुढे कसे जाता येईल, याचा विचार मी करत होतो. अरबासचे विचारात हरवले जाणे मोडायचा प्रयत्न, मी केला नाही. माझे आत्तापर्यंतचे निष्कर्ष माझ्या गृहीतकांवर व परिस्थितीजन्य पुराव्यांवर आधारलेले होते. माझ्या मनातील एक चित्र भविष्याचा वेध घेत, दुसऱ्या चित्राशी तंतोतंत जुळत होते. माझी दूरदृष्टी व भीती दोन्हीला त्या माणसाचा व्यक्तिगत करिष्मा भारी पडत होता. वकील व न्यायाधीश अशी कामे अनेक वर्षे

करूनही -- किंवा -- त्यामुळेच मला असामान्य मानसिक संवादांची सवय होती. त्या माणसात काही परिणामकारक असे होते. त्याचे गुपित त्याला बोलायला लावणे, हे मला त्याचा अपमान केल्यासारखे वाटले. मी थरथरलो. माझा काही निर्णय होईना. शेवटी शांततेचा भंग करत मी विचारले, “तू त्या खोलीत सोक्षमोक्ष लावून टाकण्यासाठीच गेलास का?”

त्याने काही उत्तर दिले नाही. घट्ट मिटलेले ओठ उघडायला तयार नव्हते. पण माझ्या नजरेला त्याचा हट्टी चेहरा दिसत होता, तो मी एखाद्या उघड्या पुस्तकासारखा तो वाचू शकलो. मी धाडस करून किंवा न करून म्हणालो, “तू त्या खोलीत दोनदा गेलास. दोनदा. जेव्हा तू पहिल्यांदा तिथून बाहेर पडलास, तेव्हा सायमन जिवंत होता. पण जेव्हा दुसऱ्यांदा तू आत गेलास, तेव्हा पलंगावर त्या मुलाचे प्रेत पडलेले होते.”

त्या शेतकऱ्याचा चेहरा इतका पांढरा फटक पडेल, अशी अपेक्षा मी केली नव्हती.

जणू त्याच्या चेहऱ्यावरील रंध्रांमधून ओल्या खडूची भुकटी बाहेर पडत होती. तो सताड उघड्या डोळ्यांनी माझ्याकडे बघत होता. त्याचे गाल थरथरत होते. त्याने दोन्ही हातांनी स्वतःचा गळा आवळला. माझी शंका फिटली. मी शांतपणे बोलण्यासाठी मला तयार केले, “तू काही पैसे त्याला देण्यासाठी खोलीत गेलास. त्या रविवारी घरी तुझ्याजवळ काहीच पैसे नव्हते. जेवणानंतर तू स्टीफन नावाच्या तुझ्या शेजाऱ्याकडून दोन हजार मार्क्स उसने आणलेस. खरे ना? तुला ते सायमनला देऊन स्वतःची सुटका करून घ्यायची होती. त्याच संध्याकाळी तो अमेरिकेला जाणाऱ्या जहाजात चढणार होता. बरोबर? तू त्याला पैसे दिलेस. तू तुझा बेत त्याला सांगितलास. आणि त्याने कांकू न करता तो अंमलात आणावा असे सुचवलेस. त्याने त्या बेताला मान्यता दिली नाहीच, पण पैसे घ्यायचेही नाकारले. तू त्याला प्रश्न विचारलेस, मग तो बोलू लागला. पहिल्या प्रथम तो गोंधळलेला वाटत होता व अस्पष्ट बोलत होता. कारण तो प्यायलेला होता. नंतर त्याचे शब्द स्पष्ट झाले, खूपच स्पष्ट झाले. तू त्याच्यासमोर मूकपणे उभा होतास. तरी तो अंथरुणावर झोपून हवेत शब्द उच्चारत होता, तरी तू हरकत घेतली नाहीस. कारण तुझ्याशी नजर भिडवायची त्याची छाती नव्हती. काही बोलण्याइतके धैर्य त्याच्यापाशी नव्हते. तू ऐकत राहीलास. ऐकत राहीलास. त्या ऐकण्यातून नंतरचे सर्व रामायण घडले. असेच झाले, बरोबर ना?” अरबास माझ्याकडे डोळे विस्फारून बघतच राहिला व आश्चर्याने ठासून म्हणाला, “तुम्ही भुतासारखे त्या वेळी घरात हजर असणार.”

मी बोललो, “नाही. अनेक गोष्टींवरून काढलेला हा साधा निष्कर्ष आहे. अगदी बिनमहत्वाच्या गोष्टी नेहमी मागे महत्वाचे पुरावे सोडतात. यात काही जादू वगैरे नाही.

माणसाच्या कृत्यांच्या साखळीवरुन नेहमी सहजपणे सत्य उलगडत जाते. जसे काही तू तळयात दगड फेकला आहेस असे धरले, तर तरंग उमटून विरून जातात पण त्याचे परिणाम नंतरदेखील जाणवतात. माणसाच्या कर्माची प्रत्येक पायरी, स्पर्श केलेली प्रत्येक वस्तू, बाहेर टाकलेला प्रत्येक श्वास, हा मोजला जातो. परिस्थितीच्या जाळयातून कोणाची सुटका नसते. माझ्याकडे एक पुरावा होता. पहिल्यांदा मला तो नगण्य वाटला. परंतु जसजसा काळ जाऊ लागला तसतसे त्याचे महत्व माझ्या लक्षात आले. अचानक मला सर्व काही स्पष्टपणे समजले. इचस्टॅंडटमध्ये एक किसलिंग नावाचा चित्रकार रहातो. तो सायमनचा चांगला मित्र होता. तो जरा असातसाच आहे. पण अगदीच प्रामाणिक नाही, असे नाही. त्याने मला बऱ्याच गोष्टी सांगितल्या. उदाहरणार्थ, तुला आठवत असेल, की मागील हिवाळयात तुझे सुंदर तऱ्हेने रंगवलेले जुने किमती डेरे नाहीसे झाले. तुला आणि तुझ्या बायकोला वाटले की ते सायमनने ढापले व शहरातील दलालाला विकले. तुझ्या बायकोने किसलिंगने त्यासाठी मध्यस्थी केली असल्याचा संशय व्यक्त केला. खरे पाहता सायमनने ते घेतले. किसलिंगचा त्यात हात होता, हेदेखील खरे होते व त्यात त्याचा वाटाही होता. पण आता तो हे नाकबूल करतो. पण गोष्टी एवढ्या वरच थांबल्या नाहीत. सायमनने त्याच्या मित्रासमोर ते फोडले. ते प्लेईनफेल्ड रस्त्यावरील लहानशा दुकानात होते. किसलिंगने ते हातात धरले होते व तो त्याचे निष्णात व्यक्तीसारखे निरीक्षण करुन त्याची वाखाणणी करत होता. एकदम सायमनने खूप जोरात धक्का मारून ते खाली पाडले व मग ते फुटून त्याचे शंभर तुकडे झाले. किसलिंगने रागावून नाराजी दर्शवली. सायमन रुसून रागावून ओरडला, "मला त्याला काही करून दुखवायचे आहे. अगदी खोलपर्यंत त्याला जखमी करेल असे काहीतरी मला करायचे आहे." किसलिंगला प्रथम तो कुणाबद्दल बोलतो आहे, ते कळले नाही. तेव्हा सायमनशी त्याची ओळख नव्याने झाली होती. नंतर त्याला ते समजले. तो म्हणाला वडिलांबद्दल एवढ्या द्वेष असलेला मुलगा तोपर्यंत त्याने पाहिला नव्हता. त्यानंतरही सायमनचे असले बोलणे, त्याने बरेच वेळा ऐकले. सायमनमध्ये ही दबलेली कटुता व बापाला नाहीसे करायची इच्छा सतत दिसून येई. त्याच्यावर वाईट प्रवृत्तीचे दुःखाचे सावट पडलेले असे व त्यामुळे तो वडिलांना त्रास होईल असे वागत असे. बहुधा ती द्वेष किंवा भीती नव्हती पण त्याहून अथांग असे काही! अनेक लोकांनी त्याला वेळोवेळी असे म्हणतांना ऐकले होते, "मला त्यांच्या तोंडावर एकदाचे सगळे सांगून टाकायचे आहे, मग मला बरे वाटेल." म्हणजे त्याला नेमके काय सांगायचे होते? फक्त किसलिंगच त्याच्या बाजूने बोलणारा नव्हता, तर इतर बरेचजण म्हणत असत, की तो मनापासून खरे तर दुष्ट नव्हता. असे ते कुठल्या कारणाने बोलत असत, माहिती नाही. तो सहज भरकटत जाणारा, दुबळया इच्छेचा, अस्थिर व काही बोलण्यापेक्षा अदृष्य होणे पसंत करणारा असा होता. पछाडलेल्या माणसासारखा कामाची टाळाटाळ करणारा, सदैव हवेत असणारा, मनाच्या

कमजोरीमुळे दुष्ट भासणारा होता. पण मुळातून वाईट नव्हता. मला तरी तो असा वाटे. पण कुणामुळे तो पछाडलेल्या असल्यासारखे वाटे, कुणास ठाऊक! सरळसरळ तो कुणाला विरोध करत होता? त्याच्यामध्ये तो काय दाबून ठेवायचा प्रयत्न करत होता? मला वाटते अरबास, तुला आणि मला उत्तर माहिती आहे. सारे जग विचार करत बसले, तरी आपल्या दोघांना सत्य माहिती आहे. पण तुला त्या संध्याकाळी त्याच्या खोलीत जाईपर्यंत, ते माहिती नव्हते. तेव्हा तुला ते समजले."

अरबासने सुटकेचा एक निःश्वास टाकला. आतून कुणी त्याला मारत असल्यासारखा त्याचा चेहरा बदलला. तो त्याच्या तोडून बाहेर न पडणाऱ्या शब्दांची जुळवाजुळव करत होता. पण त्याच्या चेहऱ्यावरील झरझर बदलणारे भावनामय, हळवे हावभाव, पुरेसे बोलके होते. कधीच कुणाला कळणार नाही असे त्याचे गुपित उघडे झाल्याने, त्याच्या आत दडवून ठेवलेले पुसटपणे दाखवलेले आश्चर्य व बरीचशी खोटी भीती नाहीशी झाली. आता त्याला त्याचे गुपित राखायची गरज न उरल्याने, त्याच्या ह्रदयावरचा भार कमी झाला. म्हणून त्याने सुटकेचा निःश्वास टाकला.

त्याच्या उरलेल्या शेवटच्या अडचणी सोडवणे माझे कर्तव्य असल्याने, मी त्यासाठी पुढे सरसावलो. "जर तुम्ही याकडे योग्य रीतीने बघितले तर याबाबतीत मनुष्य जनावरांपेक्षा जास्त वाईट आहे. जनावरे एकमेकांबद्दल गैरसमज करून घेत नाहीत. विचारांमध्ये व कृत्यांमध्ये माणसे सतत गैरसमज करून घेत असतात. भाऊ, मित्र, वडील व मुले या सर्वांच्या बाबतीत हे खरे आहे. प्रत्येक माणूस त्याच्या गैरसमजाच्या काळया गुहेच्या मध्यावर उभा असतो. त्याची गुहा त्याला पूर्णपणे उजळलेली भासत असते. अतिशय चुकीचे असे दुसऱ्याबद्दलचे खोटे मत बनवून स्वतःलाच त्रास करून घेत असतो. देवाने आपल्याला पृथ्वीवर त्याचा आवाज देऊन पाठवले आहे, अशी कल्पना करणाऱ्या माणसाला लवकरच शोध लागतो की माणूस हे सैतानाच्या हातातील खेळणे आहे. तेरा वर्षे तुझ्या मनात फक्त हाच विचार होता की मुलगा पाहिजे. आणि तो जन्माला आल्यावर अठरा वर्षांनी तुला असा शोध लागला, की तो वाया गेलेला मुलगा आहे. पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. माणसाचा शहाणपणा ही फार उदास करणारी गोष्ट नाही का? नाहीतर तू न केलेल्या खुनाची जबाबदारी का घेतली असतीस? ज्याने स्वतःचा अयोग्य मार्ग निवडला होता, त्याचा खुनी आपण स्वतःला का समजावे? न्यायसंस्थेला का फसवावे? का? अरे माणसा, का?"

अरबास म्हणाला, "मी तुम्हाला कारण सांगतो. आता माझे गुपित पूर्णपणे उघडे पडले आहे. पण धीर धरा, हे कठीण आहे." तो स्वतःचा शोध घेत होता. नेमके व विश्वासार्ह स्पष्टीकरण थोडक्यात कसे द्यावे, असा विचार तो करत होता. तो चाचरत म्हणाला, "मी त्याला पैसे द्यायला

गेलो होतो, हे खरे आहे. पण मी अमेरिकेचा विचार केला नव्हता. त्याच्यापासून जितक्या लवकर व जितके लांब जाता येईल तेवढे जा, असे मी स्वतःला म्हटले. म्हणजे निदान घरात तरी पोलीस दिसायला नकोत. मी अंधारात खोलीत शिरलो व मेणबत्ती लावली. तिथे पलंगावर लोळून तो माझ्याकडे बघत होता. त्याने पैसे घेतले नाही, हे खरे आहे. त्याने भिंतीकडे तोंड वळवले व दात उचकटून म्हणाला की पैशाने त्याचे प्रश्न सुटणार नाहीत. मी त्याच्याजवळ उभा राहून बोललो, "वडिलांसमोर उठून उभा रहा.' तेव्हा तो म्हणाला, "मला ज्यांनी ढकलून दिले आहे, त्यांच्यासमोर मी का म्हणून उभा राहू?" माझ्या मुठी वळल्या गेल्या व मी उद्गारलो, "तुला काय म्हणायचे आहे? मूर्खा, मी तुला कसे काय ढकलून दिले आहे?" त्याच्या तोंडून फक्त एकच शब्द आला, "हो. तूच." एवढाच. "तू." मी त्याच्याकडे पाहिले. त्यानेही माझ्याकडे रोखून पाहिले. आणि थोडे थांबून तो म्हणाला, "हो. तूच." त्या एका शब्दात विखार, राग व चिडवण्याचा भाव भरलेला होता. त्या पूर्णपणे धमकीवजा शब्दांनी माझ्या तोंडात कडू लाळ निर्माण झाली. मी ओरडलो, "तू" चा अर्थ काय? तुला काय म्हणायचे आहे? तो पुन्हा दात विचकून बोलला, "ओहो, तू -- " मी जन्मल्यापासून तुमच्या वजनाने माझी छाती दडपते आहे. तिथे तसेच उभे रहा व माझ्याकडे मोठे डोळे करून बघत रहा. तुमच्या या माझ्याकडे रोखून बघण्याला काही अंतच नाही का? माझ्या जन्मापासून हे असेच आहे. तुम्ही माझ्याकडे नुसते बघत, मला निरखत राहता, एक शब्ददेखील बोलत नाही. माझ्याबद्दल सगळे माहिती असतांना, टेबलापाशी मुकाट्याने, न बोलता बसून राहता. तुमचे रोखून बघणे सहन करतच, मी लहानाचा मोठा झालो. तुम्ही मला कधीच नावाने हाक का मारली नाहीत? कधीच का माझ्याशी बोलला नाहीत? माझ्याशी एखादातरी शब्द बोलावा, असे तुम्हाला का वाटले नाही? त्यासाठी मी कुत्र्यांकडे गेलो. मी चार मित्र जमवून त्यांच्याबरोबर दारू पिऊ लागलो. ते निदान माझ्याशी हसून खेळून बोलत. निदान घोड्यासारखे चुचकारत. पण तुम्ही! तुमच्या दृष्टीने मी कोण होतो, हे मला कधीच कळले नाही. मी माझ्याशी बोलायचोः ते तिथे आहेत. थोडा धीर धर. ते आले. आता ते तुला ओरडणार. मी जेव्हा लहानसा मुलगा होतो, तेव्हा तुम्ही माझ्यासमोर येऊन थांबलात, की की मी खात असलेला घास माझ्या घशात अडके. मला शंभर वेळा असे वाटले, की तुमच्याबरोबर जावे. पण मी तुमच्या दिशेने एकही पाऊल टाकायला घाबरायचो. मी असे काय वाईट केले आहे, हे मला समजत नसे आणि मग मी काही चुकीचे वागलो, की मला आनंद होऊ लागला की हे निदान तुम्हाला माहिती आहे. मग मी जोपर्यंत काही खोड्या करून लोकांचा रोष ओढवून घेत नाही, तोपर्यंत मला चैन पडायचे नाही. हो, मी वाईट आहे. पण मी जन्मापासून असा नक्कीच नव्हतो. हो. मी मवाली आहे. पण ते तुम्ही देवाला माझ्याशी खेळायला लावायचे कारण होऊ शकत नाही. तुम्ही नक्कीच काळजीत असाल, की माझ्या बाबतीत तुम्ही तुमच्या कर्तव्याला कसे चुकलात. बायबलमध्ये म्हटल्याप्रमाणे मी

तुम्हाला मान दिला असता. बुलबुल पक्ष्यासारखे तुम्ही मला पाळू शकला असता. मी हे केले असते. ते माझ्यात होते. पण तुम्ही ते घालवून लावले. मी मवाली झालो. मला या आयुष्याचा कंटाळा आला आहे. मला दारुड्या मित्रांचा व माणूसपणाचा देखील कंटाळा आला आहे. मला आता कशातच आनंद वाटत नाही. तो असेच काहीबाही बोलत राहिला. त्यातले बरेचसे मी विसरलो. तो पलंगावर लोळत राहिला. भीती, रागाने व दुःखाने हसू लागला. परत भिंतीकडे वळून गप्प झाला. मी माझ्याशीच बोललो, "अरबास, या मुलाची ही शेवटची तडफड चालू आहे. त्याचा आत्मा बहुधा शरीर सोडू बघतो आहे. पण तुझेही तेच होणार आहे. मी एकही शब्द बोलू शकलो नाही. माझी जीभ टाळयाला चिकटून बसली होती. मला बनवणाऱ्या देवाला दोष देऊन काय होणार होते? मी काहीही बोलू शकलो नाही. मी बाहेर पडलो. मी शेताच्या कुंपणापर्यंत गेलो. वसंत ऋतूतील रात्रीप्रमाणे सर्व काही भिजले होते. मी वर चांदण्यांकडे बघितले. तिथूनही काही मदतीची आशा नव्हती. मी तबेला उघडला व गरम कुबट हवेचा वास घेतला. एका बैलाने मान वर केली व मग तो निमूटपणे कडबा खाऊ लागला. अचानक माझी भीतीने गाळण उडाली. मी विचार केला, "मला ताबडतोब परत सायमनच्या खोलीत जायला हवे. "जरी तुझ्या तोंडून शब्द आले नाहीत, तरी काहीतरी केले पाहिजे." मी परत फिरलो. मी जेव्हा खोलीत शिरलो, तो रक्ताच्या थारोळयात पडलेला होता. मी बराच वेळ खिळल्यासारखा तिथे उभा राहिलो. मग स्वतःशीच बोललो, "जर त्याने असे कृत्य केले आहे, तर तू त्याचा खुनी आहेस. हा तू केलेला गुन्हा असेल, तर त्याची किंमत तुला चुकती करायला हवी ---- आता मी तुम्हाला सर्व काही सांगितले आहे."

त्याने त्याचे हात दुमडून बायबलवर ठेवले. पडलेल्या आवाजात माझ्याकडे एक चौकस नजर टाकून पुढे बोलला, "हे होण्यापूर्वीच्या रात्री मला स्वप्न पडले, त्याबद्दल मला सांगायचे आहे. शेतकाम करणारा एक हात खोलीत आला व म्हणाला, "अरे शेतकऱ्या, घोडे जोडले आहेत. चल. आपण निघू. मी बाहेर पडून बर्फात उभ्या असलेल्या घोड्यांकडे गेलो. आणि घोडागाडी हाकू लागलो. लगेच आम्ही रस्त्यावर गेलो व घोडे वेगाने बर्फातून दौडू लागले. अचानक मी वळलो. माझ्यामागे शेत जळत होते. बर्फावर लाल उजेड पडला होता. घोडे धावू लागले. मला ते ओढत नेत होते. माझ्या हाताला जखमा झाल्या. आम्ही रेल्वेच्या जुन्या पुलापाशी आलो. तिथे पाण्याचा फुगवटा होता. नदी गोठली होती व तिची चमक आकाशभर पोचली होती. घोडागाडीचे वजन बर्फ घेऊ शकेल का याची मला शंका होती. पण बर्फ घट्ट होता. ते घोडे सुसाट निघाले. बर्फाने ते झेलून घेतले. पलीकडील तीरावर सायमन उभा होता. घोडे चौखूर उधळल्यासारखे धावत होते. मी ओरडलो, "सायमन मदत कर." तो म्हणाला, "मला घरी जायचे आहे. घर जळते आहे. तबेला

जळतो आहे." मी उडी मारून घोडागाडीतून उतरू शकलो नाही. घोडे मला पुढेपुढे नेत राहिले. मी अतिशय दुःखाने ओरडलो, "सायमन, तू येऊन घोड्यांना थांबव." तो उत्तरला, "ते तुम्हालाच करावे लागेल. आपल्या दोघांचे वजन बर्फ घेणार नाही. मग मी परत त्याला ओरडून म्हणालो, "मी तुला सर्व काही देईन. घोडे गाडी, सर्व काही. पण कृपया, मदत कर." तो माझ्याकडे वळला. आणि तो वळल्याबरोबर घोडे थांबले. पण त्याच्या पहिल्याच पाऊलाला बर्फात मोठी भेग पडली व त्यात आम्ही दोघे घोडागाडीसकट गाडले गेलो. मी पाण्यात पडलो व जागा झालो."

तो मूक झाला. माझ्याकडून काही बोलण्याची अपेक्षा तो करत नव्हता. मलाही बोलायचे नव्हते. काही मिनिटांच्या अवधीत तो एकदम म्हातारा दिसू लागल्याचे बघून, मी आश्चर्यचकित झालो. त्याची हनुवटी टोकदार झाली, डोळे मलूल झाले, मान रोडावली. त्याचे हात थुलथुलीत झाले. तो अशक्त वयस्क माणूस दिसू लागला. आक्रमक, शक्तिमान व तल्लख बुद्धीचा माणूस सुरकूतून कोरडा पडला. मी त्याची रजा घेतली, तेव्हा त्याने वर बघितले नाही. त्याला बहुधा माझे जाणे जाणवलेही नाही. ज्या शांततेत त्याचे आधीचे आयुष्य गुंडाळले गेले, ते परत त्याच्यावर चाल करून आले. त्यात शिरण्यास अवघड असे, त्याला मरणाकडे खेचणारे! दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा त्याला कोर्टात बोलावले जाणार होते, तेव्हा जेलरला तो फासावर लटकलेला सापडला.



# The Shirts

## By Karel Capek

### झेकोस्लोव्हाकीया

## शर्ट

इतर खूप महत्वाच्या विषयांवर त्याला विचार करायचा होता. पण काही झाले तरी, आनंददायक नसलेले विचार त्याच्या मनात घोळत रहात. त्याच्या घराची नोकराणी त्याला लुटत होती. ती त्याच्या घरात कित्येक वर्षे रहात होती आणि स्वतःच्या खासगी गोष्टींबद्दल जागरुक रहाणे, त्याने कधीच सोडले होते. त्याचे कपाट होते. सकाळी ते उघडून त्यातून तो एक स्वच्छ शर्ट काढे. वेळोवेळी, ठराविक काळानी, मिसेस जोहांका येई व त्याच्यासमोर फाटका शर्ट उलगडून दाखवे व म्हणे की ते सर्व असेच झाले आहेत व नवीन आणायची जरुरी आहे. फार छान! मग मालक बाहेर जाऊन त्याला लागणाऱ्या पहिल्या दुकानातून अर्धा डझन शर्ट घेऊन येई. परंतु काही दिवसांपूर्वीच त्याने ही गोष्ट केली होती, हे तो विसरून जाई. कॉलर्स, टाय, कपडे, बूट, साबण व इतरही अनेक बाबतीत, ज्या गोष्टी एका विधुरालाही लागतात, त्या बाबतीत असेच चाले. सारख्या नव्यानव्या वस्तू आणाव्या लागत. म्हाताऱ्या माणसाकडून गोष्टी कशा माहिती नाही,

पण लवकर खराब होत. किंवा काय होई, ते देवालाच माहीत! तो सतत नवीन वस्तू आणत राही. तो कपड्यांचे कपाट उघडे तेव्हा त्याला विरलेले, रंग उडालेले कपडेच दिसत. हे असे केव्हा व कसे झाले, ते तो सांगू शकत नसे. मिसेस जोहांका सर्व काही बघत असे.

खूप वर्षांनी आता पहील्यांदाच समजले, की तो पद्धतशीरपणे लुटला जात होता. त्याचे असे झालेः त्याला त्या सकाळी कुठल्यातरी समाजाकडून मेजवानीचे आमंत्रण आले. बरेच वर्षात तो कुठे गेला नव्हता. त्याचे मित्रमंडळ इतके लहानसे होते की अचानक आलेल्या आमंत्रणाने तो घाबरूनच गेला. पण त्यापेक्षा जास्त तो खूप आनंदित झाला. पहिल्यांदा तो बघू लागला की त्याच्याकडे एखादा छानसा शर्ट आहे की नाही. त्याने सगळे शर्ट कपाटाबाहेर काढले. पण त्यापैकी एकही असा नव्हता की जो कॉलरच्या इथे किंवा हाताला झिजलेला नव्हता. त्याने जोहांकाला बोलावले व त्याच्याकडे या सर्वाहून बरा एखादा शर्ट आहे का विचारले.

मिसेस जोहांकाने आवंढा गिळला, थोडा वेळ गप्प राहिली व कडकपणे जाहीर केले की मालकाने नक्की नवीन शर्ट विकत आणला पाहिजे. जुने शर्ट दुरुस्त करत बसून काही उपयोग नव्हता. ते दुरुस्तीच्या पलीकडे गेले होते. पण त्याला तर असे वाटत होते, की त्याने काही दिवसांपूर्वीच नवीन शर्ट आणले होते. पण त्याला खात्री नसल्याने, तो गप्प राहिला. आणि कोट घालून दुकानात जायला तयार झाला. पण त्याने कपडे नीट लावायला सुरवात केली, तेव्हा त्याला त्याच्या खिशातून काही जुने कागद सापडले. त्यात पाहून त्याला कळले की ते फेकून द्यावेत की ठेवावेत. त्यात सात आठवड्यांपूर्वी आणलेल्या शर्टांचे अमुक तारखेचे बिल होते. हा असा शोध त्याला लागला.

तो मग नवीन शर्ट आणायला गेला नाही तर खोलीत फिरून एकाग्रपणे ध्यान करू लागला. त्याने अनेक वर्षांचे एकटेपण आठवून पाहिले. त्याच्या बायकोचे निधन झाल्यापासून, जोहांकाने घराची व्यवस्था ठेवली होती आणि त्याला कधीच तिच्याबद्दल अविश्वास किंवा संशय आला नव्हता. पण आता त्याच्या मनात काही अस्वस्थ विचार येऊ लागले, की तो लुबाडला जात आहे. त्याने स्वतःकडे पाहिले. त्याला कळत नव्हते की काय कमी आहे. एकाएकी त्याला आठवले की जागा रिकामी व उदास वाटते आहे. त्याने आठवायचा प्रयत्न केला की इथे अजून काही वस्तू होत्या का. खोलवर आठवून पाहिले -- अजून काहीतरी -- दुःखाने त्याने त्याच्या बायकोच्या वस्तू असलेला आठवणींचा, कपडे वगैरे असलेला, कप्पा उघडला तिथे फक्त काही ओंगळ वस्तू पडल्या होत्या. पण बाकी काहीही नव्हते. अरे देवा! त्याच्या बायकोने मागे ठेवलेल्या बऱ्याच वस्तू! त्यांचे काय झाले?

त्याने कप्पा बंद केला व दुसरा काही विचार करू लागला. उदाहरणार्थ, त्या दिवशीची मेजवानी. पण पुन्हा हट्टीपणे मागील वर्षे नजरेसमोर येऊ लागली. तो ज्या काळात रहात होता, त्या वर्षांपेक्षा रिकामपणाची, कडूपणाची व विचित्र प्रकारची भावना त्याला होऊ लागली. तरीही त्यातील काही काळ तो समाधानी व शांत होता. त्याला सुखाची झोप लागत होती. पण आता त्याला एकाकीपणाची भीती वाटून झोप उडाली. अदृष्य हात आपल्याला लुबाडत आहेत, आपल्या डोक्याखालची उशी ओढून घेत आहेत, असे भास होऊ लागले. तो एका दफनक्रियेला जाऊन आल्यापासून, दयनीय रीत्या उदास झाला व दुःखी दिसू लागला. त्याला स्वतःला म्हातारे झाल्यासारखे, थकल्यासारखे व आयुष्य क्रूर असल्यासारखे वाटू लागले.

मात्र एक गोष्ट त्याला कळेना, तिने माझ्या वस्तू का चोराव्यात? ती त्याचे काय करते? ओहो, अचानक खात्रीशीरपणे काही त्रासदायक असे त्याच्या लक्षात आले. ते असे आहे तर! तिला एक भाचा होता. त्याच्यावर ती मावशी वेड्यासारखे प्रेम करे. त्या लाडक्याबद्दल त्याने तिची खूप बडबड ऐकली नव्हती का? बरोबर. काही दिवसांपूर्वी तिने मला त्याचा फोटोही दाखवला होता. कुरळे केस, विचित्र नाक आणि विशेष प्रकारच्या मिशा! त्याच्याबद्दल ती फार भावनाशील व अभिमानी होती. तो स्वतःशी बोलला, “ओहो, तिथे माझ्या सर्व वस्तू गेल्या तर! या विचाराने तो प्रक्षुब्ध झाला. त्याने स्वयंपाकघरात जाऊन जोहांकाला हाक मारली, “अग अधम स्त्रिये,” आणि तिला मोठ्या डोळयांनी त्याच्याकडे बघत ठेऊन निघून गेला. त्या दिवशी नंतर तो तिच्याशी काही बोलला नाही. तिचा अपमान झाल्यासारखी ती सुस्कारे टाकत बसली. वस्तूंची आदळआपट करू लागली. या त्रासाचे कारण काय ते तिला कळेना. दुपारी तो त्याच्या कपाटावरून व कप्प्यांवरून जोरात आरडाओरडा करू लागला. तो भयंकर प्रकार होता. एके काळी त्याच्याकडे असलेल्या एकेक वस्तू त्याला आठवू लागल्या. आता त्याला मौल्यवान वाटू लागलेल्या, अनेक पिढ्या घरात असलेल्या वस्तू! आता त्यातील काहीच नव्हते -- एकही वस्तू शिल्लक नव्हती. जणू मोठी आग लागली होती. तो रागाने व एकटेपणाने मोडून पडला.

तो श्वास रोखून, धुळीच्या साम्राज्यात खण उघडून, बसला होता. आधीच्या जमान्यातील एकच वस्तू उरली होती, त्याच्या वडिलांचे पाकीट. मणी लावलेले व दोन्ही बाजूला भोके पडलेले. इतक्या वस्तु नाहीशा झाल्या, त्याअर्थी ती खूप वर्षे ढापूगिरी करत असली पाहिजे. तो फारच चिडला. त्यावेळी त्याला जर ते कळले असते, तर त्याने तिच्या नक्कीच थोबाडीत लगावल्या असत्या. आता मी तिचे काय करू? तो भावनिक होऊन पुटपुटला, तिला हाकलून द्यावे का? की पोलिसात द्यावे?. पण मग उद्या माझ्यासाठी जेवण कोण करेल? त्याने ठरवले खानावळीत जाऊन

जेवायचे. पण माझ्यासाठी पाणी कोण तापवेल व शेकोटी कोण तयार करेल? फार प्रयत्नांनी त्याने या काळज्या बाजूला सारल्या. त्याने स्वतःशी ठरवले की आपण उद्या हे काम करू. मी तिच्यावर अवलंबून आहे! त्याला वाटले त्यापेक्षा जास्त जोराने ही समस्या त्याच्यावर चालून आली. असे करणे बरोबर ठरेल का, अशी सद्सदविवेकबुद्धीची टोचणी त्याला लागली. आणि शिक्षा करायची गरज असल्याने त्याला धीर आला. दिवस मावळू लागला तेव्हा त्याला जोर येऊन तो स्वयंपाकघरात जाऊन जोहांकाला म्हणाला, "तू कुठेतरी बाहेर जा. नंतर त्याने तिला गुंतागुंतीचे व असंबध्द असे लांबलचक काही सुनावले. हे स्वतःला त्रास होत, त्याने केले व ते ताबडतोब अंमलात यायला हवे, असे तिला बजावले. मिसेस जोहांका काही बोलली नाही. पण तिला या प्रकरणाने मरणांतिक दुःख झाले.

शेवटी तिच्यामागे दार ढकलून तिने त्याला घरात एकटे सोडले. धडधडत्या हृदयाने तो स्वयंपाकघरात जाऊन फिरू लागला. कुलुपाला हात घालताना, तो हो नाही करू लागला. तिचे कपाट तो उघडू शकेल की नाही, या विचाराने तो हैराण झाला. त्याला तसे करणे चोरासारखे वाटू लागले. पण त्याने तसे ठरवले असल्यामुळे, शेवटी ते केले.

स्वयंपाकघर लखलखीत होते. तिथे जोहांकाचे कपाट होते. पण त्याला कुलूप होते. किल्लीचा पत्ता नव्हता. त्यामुळे त्याचा संशय पक्का झाला. त्याने सुरीने ते उघडायचा प्रयत्न केला. पण ते नुसते भोसकले गेले व उघडले नाही. त्याने किल्ली साठी इकडचे तिकडचे बरेचसे खण उघडून पाहिले. शेवटी अर्ध्या तासाच्या प्रयत्नां नंतर त्याच्या लक्षात आले की कपाटाला कुलूप नव्हते. आणि बटणाने उघडले जात होते. सर्वात वरच्या कप्प्यात नीट ठेवलेले, इस्त्री केलेले सहा शर्ट होते. आत्ताच दुकानातून आणल्यासारखे, त्याला निळी रिबीन बांधलेली होती. एका पुठ्ठ्याच्या खोक्यात त्याच्या बायकोचा किरमिजी हिऱ्याचा चाप होता. त्याच्या वडिलांचे मोत्याचे कफलींक होते. हस्तीदंतावर कोरलेले त्याच्या आईचे चित्र होते. बापरे -- हे सगळे ती वापरत होती की काय? त्याने ते सर्व कपाटाबाहेर काढले. त्याला त्याच्या कॉलर्स, मोजे, साबणाची पेटी, अनेक टूथब्रश, जुना रेशमी कोट, उशांचे आभ्रे, म्हाताऱ्या ऑफिसरचे पिस्तुल आणि जुनाट बाजा सापडला. हे सर्व त्याच्या कपाटात होते. बराचसा माल नक्की कुरळया केसांच्या भाच्याच्या घशात गेला असणार. भावनांचा क्षोभ आवरला गेला. पण नापसंतीदर्शक दुःख राहिले. म्हणजे असे आहे तर – जोहांका, जोहांका, मी तुझ्याकडून अशी अपेक्षा करत नव्हतो.

एकेक वस्तू उचलून त्याने त्याच्या खोलीत नेली. त्या सर्व टेबलावर मांडून ठेवल्या. कल्पनेमधील जवळजवळ प्रत्येक वस्तूंचे तिथे प्रदर्शन मांडल्यासारखे झाले. जे जोहांकाचे होते, ते

परत तिच्या स्वयंपाकघरातील कपाटात फेकून देण्यात आले. ते त्याला नीट रचून ठेवायचे होते. पण काही प्रयत्नानंतर त्याने तो नाद सोडून दिला. चोरीनंतर टाकावे तसे कपाट उघडे टाकून ठेवले. आता जोहांका परत यायची त्याला भीती वाटू लागली. तिच्याशी गंभीरपणे बोलावे लागले असते. -- त्या कल्पनेने त्याला नकोसे झाले. त्याने घाईघाईने कपडे केले व काय ते उद्या बघावे, असे म्हणून त्याने कागदासारखा कडक असलेला एक नवा शर्ट उचलला. मला हे सर्व सामान सापडले आहे, एवढी टोचणी तिच्यासाठी आज पुरेशी आहे. जोहांका कुठल्याही क्षणी येईल, म्हणून तो बाहेर पडला.

त्याने फाटलेला होता तरी जुना शर्ट अंगावर चढवला. एखाद्या चोरासारखा तो बाहेर पडला व पावसातून मेजवानीची वेळ होईपर्यंत भटकत राहिला. मेजवानीच्या इथे त्याला एकटे वाटले. जुन्या ओळखीच्या लोकांबरोबर गप्पांमध्ये रंगून जायचा प्रयत्न केला, पण कशी कुणास ठाऊक, मधली वर्षे त्याच्यावर चाल करून आली. कल्पना करा, आपण एकमेकांना फारसे समजून घेऊ शकतो का? पण त्याला कोणाबद्दल आकस नव्हता. तो लांब उभा राहून हसत राहिला. त्याच्यावर पडणाऱ्या प्रखर दिव्यांच्या उजेडाने, तेथील गडबडीने व गजबजाटाने त्याचे डोळे दीपल्यासारखे झाले.काही अगम्य कारणाने, तो खिळल्यासारखा झाला -- माझे कपडे कसे दिसत असतील? माझ्या शर्टामधून सुते लोंबत आहेत. कोटावर डाग पडला आहे. आणि बुटांची अवस्था तर काही बघायलाच नको. त्याला वाटले जमिनीत गुप्त व्हावे. आजूबाजूला एखादी लपायची जागा शोधावी. पण आजूबाजूला सगळीकडे छान छान शर्ट दिसत होते -- नकळत निसटून जाणे कसे काय शक्य होते? दाराकडे जायला तो घाबरत होता. सर्वांच्या नजरा जणू त्याच्याकडेच लागलेल्या आहेत, असे त्याला वाटत होते. शरमेने तो घामाघूम झाला. त्याने एका जागी उभे रहायचा प्रयत्न केला. पण सर्व वेळ तो कुणाच्या नकळत हळूहळू दाराकडे सरकायचा प्रयत्न करत होता.

दुर्दैवाने शाळेतील त्याच्या ओळखीचा एक विद्यार्थी त्याच्याशी बोलायला आला. तो अधिक लज्जित झाला. त्याने त्या विद्यार्थ्याला राग येईल अशी काही गोंधळलेली उत्तरे दिली. मग पुन्हा तो जेव्हा एकटा राहिला, तेव्हा त्याने सुटकेचा निःश्वास टाकला व त्याचे दारापासून असलेले अंतर मोजले. नंतर तो तिथून पळून घरी आला. अजून मध्यरात्र झाली नव्हती.

वाटेत पुन्हा तो जोहांकाबद्दल विचार करू लागला. जोरात चालून त्याचा मेंदू तल्लख झाला. तिच्याबरोबर काय बोलायचे, हे त्याने ठरवले. सवय नसलेल्या मोकळेपणे त्याने लांबलचक, जोरदार व प्रतिष्ठीत वाक्प्रचारांची सांगड घालून, कडक शब्दात तिची कानउघडणी

करणारे बोलणे मनाशी जुळवून ठेवले. पण शेवटी दया दाखवून तो तिला माफ करणार होता. तो तिला रस्त्यावर काढणार नव्हता. जोहांका रडली असती व तिने गयावया करून माफी मागत, पुन्हा असे होणार नाही असे म्हटले असते. त्याने शांतपणे सर्व काही ऐकून घेतले असते आणि शेवटी तिला गंभीरपणे म्हणाला असता, “जोहांका, मी तुला तुझी कृष्णकृत्ये सुधारण्यासाठी एक संधी देतो. यापुढे प्रामाणिकपणे व नेकीने काम कर. त्याहून जास्त मला काही नको. मी एक वयस्क मनुष्य आहे व मी दुष्टतेने वागू शकत नाही.”

तो इतका उद्दीपित झाला होता की घरी येऊन आपण दार उघडले आहे, हे त्याच्या लक्षातदेखील आले नाही. जोहांकाच्या खोलीत दिवा जळत होता. त्याने पडद्याआडून स्वयंपाकघरात डोकावून पाहिले. जोहांकाचा चेहरा पडलेला होता व रडूनरडून सुजला होता. ती घाईघाईने ती तिचे सामान बॅगमध्ये भरत होती. तो चमकला. ती बॅग का भरते आहे? तो गोंधळून, खच्ची होऊन, घाबरून, हलक्या पाऊलांनी त्याच्या खोलीत गेला. जोहांका निघून चालली होती का?

तिने आत्तापर्यंत चोरलेल्या सर्व वस्तू टेबलावर मांडून ठेवलेल्या होत्या. त्याने त्या पाहिल्या. पण त्या मिळाल्यामुळे त्याला थोडासुद्धा आनंद झाला नाही. तो स्वतःशी बोलला, “अस्स, जोहांकाला सर्व कळलेले दिसते आहे. मला ती गुन्हेगार असल्याचे समजले व मी तिला ताबडतोब हाकलून देणार असे तिला वाटते आहे -- म्हणून ती सामान आवरते आहे. छान. मी उद्या सकाळपर्यंत तिचा गैरसमज तसाच राहून देतो. तेवढी शिक्षा तिला पुरेशी आहे. मी तिच्याशी सकाळी बोलतो. पण कदाचित –कदाचित, ती आत्ताच येऊन मला विचारू लागेल. तिला माझ्यासमोर रडू कोसळेल, ती गुडघे टेकेल. ठीक आहे. जोहांका, मी जास्त कडकपणे वागणार नाही तू इथे राहू शकतेस.”

तो रात्रीचे कपडे घालून काही होण्याची वाट बघत बसून राहिला. घरात नीरव शांतता होती. स्वयंपाकघरातून जोहांकाचे आवाज ऐकू येत होते. बॅगेचे झाकण जोराने आपटल्याचा आवाज आला. नंतर मग शांतता! काय चालले होते? तो नवल वाटून उभा राहिला व ऐकू लागला. एखाद्या प्राण्याचे, माणसाचे नव्हे, लांबलेले भयंकर गुरगुरणे! मग ते वेड्यासारख्या हुंदक्यात बदलले. मग धाडकन फरशीवर गुडघे टेकल्याचा आवाज आला आणि दबलेले रडणे. जोहांका शोक करत होती. हे अपेक्षित नसलेले काही चालू असल्याचे पाहून, तो अवाक झाला. हृदयावर हात ठेऊन, तो स्वयंपाकघरातून येणारे आवाज ऐकत राहिला. फक्त शोक करणे! बाकी काही नाही. थोड्या वेळाने जोहांका भानावर येईल व माफी मागेल.

त्याचा कणखरपणा टिकावा, म्हणून तो खोलीत सावकाशीने फेऱ्या मारू लागला. तरीही जोहांका आली नाही. थोड्या थोड्या वेळाने थांबून तो कानोसा घेई. तिचे शोक करणे, एकसुरी लांब रडण्यात बदलले. हे ऐकून तो अस्वस्थ झाला. “मी तिच्याकडे जातो व काय ते संपवून टाकतो. जोहांका, आता रडायचे थांबव. यातून काही धडा घे. मी सर्व विसरून जायला तयार आहे पण यापुढे प्रामाणिकपणे काम कर.” असा विचार त्याने केला.

अचानक जोरदार धक्क्याने दार उघडले गेले. तिथे धापा टाकत, मुसमुसत जोहांका उभी होती. तिचा सुजलेला व भयंकर चेहरा बघवत नव्हता.

तो अवाक होऊन बोलला, “जोहांका”

जोहांकाचे तोंड उचकटले, “हीच माझी लायकी आहे का? -- मी खूप आभारी आहे. मी जणू काही चोर आहे -- हे इतके लाजिरवाणे आहे.”

तो आश्चर्याने म्हणाला, “पण तू माझ्या वस्तू घेतल्यास. या सगळया -- बघते आहेस ना? तू त्या घेतल्यास की नाही?”

जोहांकाला काही ऐकू गेले नाही. “मला कायकाय सहन करावे लागते आहे -- इतके लाजलावणे -- माझ्या कपाटात शोधाशोध? जसे काही मी जिप्सींसारखी भुरटी चोर आहे. मला लाज आणण्याइतके खरच तुम्ही करायला नको होते -- सर, तुम्हाला माझा अपमान करायचा काही अधिकार नाही. माझ्या मरायच्या दिवसापर्यंत असे काही होईल, असे मला कधीच वाटले नव्हते. मी खरच चोर आहे का? -- चोर? मी खरच चोर आहे का? माझ्या कुटुंबाचा तरी विचार करायचा. मी अशी कधीच अपेक्षा केली नव्हती. नाही. मी हे सहन करू शकणार नाही” ती पार दुःखात बुडाली.

तो थोड्या नाराजीने म्हणाला, “पण जोहांका, थोडी तरी भानावर ये. या गोष्टी तुझ्या कपाटात कशा गेल्या? या तुझ्या आहेत की माझ्या? अग माझे बाई, या तुझ्या आहेत का?”

जोहांका हुंदके देत बोलली, “मला काही ऐकून घ्यायचे नाही. अरे देवा, माझ्यावर काय ही वेळ आणलीस! जशी काही मी भटकी जिप्सी आहे. माझे कपाट तुम्ही शोधावे? या क्षणी -- या क्षणी मी निघून जाईन. मी सकाळपर्यंत इथे थांबणार नाही. ते शक्य नाही.”

त्याने निकराचा प्रयत्न करून पाहिला, “असे बघ, मला तुला हाकलून द्यायचे नाही. जोहांका, तू इथे रहा. जे झाले ते झाले. देव आपले रक्षण करो. मी अजून तुला याबद्दल अवाक्षरही बोललेलो नाही. रडायचे थांबव.”

अश्रू थोपवत जोहांका ओरडली, “तुम्ही दुसरी बाई बघा. मी इथे सकाळपर्यंतसुद्धा रहाणार नाही. एखाद्या कुत्र्यासारखे -- नाही मी असले काही सहन करणार नाही. तुम्ही मला कितीही पैसे दिलेत, तरी नाही. मी रात्र कुठेही काढेन.”

तो अगतिकतेने वाद घालत राहिला, “पण का, जोहांका? मी तुझ्या भावना दुखावल्या का? पण तरीही तू हे नाकारू शकणार नाहीस -- “

अजून जखमी झालेल्या आवाजात जोहांका बोलली, “नाही. माझ्या भावना दुखावल्या नाहीत. मी चोर असल्यासारखे माझे कपाट शोधणे -- हे काहीच नाही? मी हे का सहन करावे? माझ्याशी असे कुणीच वागलेले नाही -- इतके लाजिरवाणे. मला काही भीक लागलेली नाही.” ती जोराने रडत दार ढकलून बाहेर पडली.

तो खूपच गोंधळून गेला. या सर्व प्रकरणात पश्चात्ताप करण्यासारखे काय होते? तिने चौकस कावळयासारखे काहीही चोरावे आणि हे मला कळले म्हणून तिचा अपमान व्हावा? काही चोरल्याची लाज नाही पण ते उघडकीला आल्याबद्दल आरडाओरडा! तिला वेड लागले आहे का?

पण हळूहळू त्याला झाल्या प्रकाराबद्दल वाईट वाटू लागले. तो स्वतःशी बोलला. “हे बघ, प्रत्येकाची काही मजबुरी असते. पण तुम्ही त्याबद्दल बोलण्याशिवाय अजून काही करू शकत नाही. स्वतःच्या चुकांबद्दलही माणूस किती नैतिक भावनिकता दाखवतो! स्वतःच्या चुकांबद्दल किती हे नाटकी दुःख! नुसते गुप्त दुर्गुणांवर बोट ठेवताच, किती हा आरडाओरडा आणि किती हा रागाचा फणकारा! गुन्हेगाराकडे बोट दाखवतांना, जो लुटला गेला आहे त्याच्याकडेच हे बोट दाखवणे होत नाही का?”

स्वयंपाकघरातील पिसांच्या पलंगाखालून मुसमुसण्याचा आवाज येत होता. त्याला आत जायचे होते. पण दार आतून बंद होते. तो तिच्याबद्दल विचार करू लागला. तिला रागावला व नंतर तिला शांत करू लागला. पण आतून जास्त जोरात हुंदके आणि आदळआपट ऐकू येऊ लागली. तो काही करू शकत नसल्याने, त्याच्या खोलीत गेला. टेबलावर चोरलेल्या वस्तू पडल्या होत्या. नवे शर्ट, चांगले कापड, पदके, आणि बरेच काही. त्याने कुरवाळले. पण त्या स्पर्शात काही उदास व दयनीयपणे एकाकी असे काही भाव होते.

## The Fair Lover

## by Maarten Maartens

हॉलंड

# चांगला प्रेमिक




ॲनेक पीटर छोट्याशा घराच्या दाराशी उभी होती. तिचे दिवसभराचे काम करून झाले होते. जसे तिने काल केले तसेच ती उद्या सकाळपासून पुन्हा सगळे तेच काम, शांतपणे सुरु करेल. ॲनेक पीटर एक चांगली मुलगी होती. तिला ते माहिती होते. उत्तम पण तेच तेच काम करणाऱ्या तिच्या आयुष्यातील तीच एक चमकती जागा होती.

तिचे वडील वारल्यापासून गेली सात वर्षे ती, तिच्या विधुर काकांबरोबर, वयस्क पीटरबरोबर रहात होती. सगळे गाव त्याला चिकू म्हणून व 'बेकार पीटर' म्हणून ओळखत असे. तिची आई तिला आठवत नसे. वडील प्यायलेले आठवत असत. पीटर काकांचे घर सांभाळायला

म्हणून ती चौदा वर्षांची असताना आली. त्यापूर्वी तिने वडिलांचे घर सांभाळण्याव्यतिरिक्त, काही केले नव्हते. तिचे वडील वेळोवेळी तिला छळत व कधीकधी लाड करत. पीटरकाका यापैकी काहीच करत नसत. पण सकाळपासून रात्रीपर्यंत ते तिच्यावर तक्रारखोर स्वरात ओरडत असत. तसे ते माननीय माणूस होते. गरिबीत जन्मलेले होते. जगात मान मिळेल असे काम त्यांनी केले होते. कारखान्यातील वस्तू फिरून विकायचे काम ते खोटेपणाने करत. व्यावसायिक खोटे बोलण्यात ते निष्णात होते. त्यात त्याना पैसे मिळत. पंचक्रोशीत ते हुशार खोटारडे म्हणून प्रसिध्द होते. त्यांचा माल खपवताना, ते एखाद्यासमोर खोट्या शपथा घेत. ‘माझ्या बहिणीशपथ’ असे ते म्हणत पण त्याना बहीण नव्हती. पण बहिणीऐवजी ते ‘आईशपथ’ असे म्हणत, तेव्हा ते खरे बोलत असत. त्याच्याबरोबर नेहमी व्यवहार करणाऱ्यांना, त्याना त्यांचे टोपण नाव कसे मिळाले ते कळत असे. मध्यंतरीच्या काळात त्यांनी लग्न केले आणि थोड्याच काळात मुले न होता, त्यांची बायको वारली. त्यांनी मग त्यांचा लहानसा व्यवसाय सोडून दिला आणि त्यानंतर काहीही केले नाही. ते गरिबीत रहात. पूर्वी लाभासाठी खोटे बोलत तर आता गंभीर विषयांपासून दूर जाण्यासाठी! त्यांची दुसरी करमणूक म्हणजे ओरडणे. सकाळपासून रात्रीपर्यंत ते प्रत्येकाला, प्रत्येक गोष्टीवरून ओरडत. सरकार, हवा आणि ॲनेक हे त्यांचे विषय असत. गावभर गप्पा मारत हिंडत. गुंतागुंतीचे शोध लावत, शेजाऱ्यांशी भांडत. सतत लोकांची टिंगल टवाळी करत हिंडत. तो त्यांना उत्तम खेळ वाटे.

सर्व गोष्टी उत्तम चालाव्यात, म्हणून ॲनेक सकाळपासून रात्रीपर्यंत कष्ट करत असे. त्यामुळे तिच्या अंगावर ओरडण्याचे काही कारण नव्हते. पण तशी आशा करणे कठीण होते. तिच्याकडे फार दुर्लक्ष केले जाई. तिला जेमतेम लिहिता वाचता येत असे. पण सुंदर व आल्हाददायक गोष्टी बघून, तिला वेगळया प्रकारचा एक आनंद मिळत असे. तिने खिडकीत जेरॅनिअमची बरीच झाडे लावली होती. ‘बेकार पीटर’ तक्रार करत म्हणे, की त्यामुळे त्याला रस्त्यावरून जाणाऱ्या मुली दिसत नाहीत.

आल्हाददायक नजरेने न बघता तो स्वतःला दुरुस्त करत म्हणे, ‘येणारी जाणारी मुले’! ॲनेक, ती मुले आत बघण्यासाठी थांबणार नाहीत. खूपच कमीजण तो झाडांचा अडथळा पार करतील. चर्चच्या वार्षिक समारंभासाठी तुला घ्यायला कोणीच येणार नाही.” तो परतपरत सांगे. त्याच्याकडे थोडे विनोद होते. ते पण तो परतपरत सांगे.

या उन्हाळ्यात तो तिला ते परतपरत सांगत होता. कोणीच मनुष्य तुला मागणी घालणार नाही, अशी तक्रार करत होता. भारतात तो त्याच्यामागे काळी मुले सोडून आला आहे की काय

अशी शंका घेतली जाणाऱ्या, सर्वात देखण्या, अशा माणसाशी ट्रिडाचा साखरपुडा झाला होता. ॲनेककडे आंधळा भिकारी, जॅन सीमेन सोडून कुणी बघणारही नाही, असे तो म्हणाला.

काकांचा एका नोकराचा पगार तिने वाचवला असल्याचे, ती बोलली नाही. कधीही कुणाला काही न देणाऱ्या घराजवळ, जॅन सीमेन कधीही आला नसल्याचे, देखील ती बोलली नाही. ती फक्त उन्हाळयाच्या सुरवातीच्या संधीप्रकाशात जाऊन उभी राहिली. संध्याकाळच्या नितळ निळ्या आकाशात किती छान रंगांची उधळण होते आहे, असा विचार ती करू लागली.

हो. देखणा भारतीय आर्मी ऑफिसर, हर्मेन रेज याच्याबरोबर, ट्रिडाचे लग्न ठरले होते. ती पीटरच्या श्रीमंत बहिणीची मुलगी होती. त्यांच्या लोखंडी तिजोरीबद्दल किल्ल्या फिरवत बोलणारे खानावळमालक तिचे वडील होते. शपथेवर सांगतो, की ट्रिडा रविवारी चर्चला जातांना जसे कपडे घालत असे, तसे दुसऱ्या कुठल्याच मुलीकडे नव्हते. ती तिच्या गरीब मामाच्या गरीब पुतणीवर नेहमी तोरा मिरवत असे. तिला तसेच शिकवले गेले होते आणि ते ती अगदी कसोशीने पाळत असे. ट्रिडाची आई, ज्युफ्रो बॅटसी म्हणे, “आपण ‘बेकार पीटर’ बरोबर सभ्यपणे वागले पाहिजे. त्याचा बेकार शिवराळपणा आपल्याला त्रासदायक न होण्यासाठी, ते बरे पडेल.”

तिचे खानावळमालक वडील म्हणत, “मग तसेच होवो, अशी मी देवाजवळ प्रार्थना करतो पण ॲनेक पीटर! तिला खिजगणतीत घ्यायचे काही कारण नाही.” ट्रिडाने ॲनेक तिची बहीण आहे का, असे विचारल्याबद्दल थोबाडीत खाल्ली होती.

आता ट्रिडाचे लग्न ठरल्याने, ती पूर्वीपेक्षाही जास्तच तोरा मिरवत होती. दोन वर्षांनी लहान असूनही मोठी दिसणारी, सशक्त व लालसर चेहऱ्याची ट्रिडा लहानपणापासून, क्रोधित डोळ्यांनी सतत ॲनेकला चिमटे काढत असे, त्रास देत असे व अपमान करत असे. खूप वेळा रस्त्यात पकडून तिच्या पोटात गुद्दे मारत असे. आता तर तिने जणु विजयश्री मिळवली होती. आणि खरच मग तिने शिरजोरी का करू नये? पहिल्यापासून दोघींमध्ये ती अग्रेसर असे. नेहमी सगळे यश, आराम व आनंद तिच्याकडे असे. ती तिच्या वडिलांच्या घोडागाडीतून फिरत असे. आता लग्न होणार असल्यामुळे व ॲनेक तसले स्वप्न पाहू शकत नसल्याने, ती फार झोकात होती. पण जर गावातील इतर मुलींपेक्षा तिच्याकडे जास्त लक्ष दिले गेले असते, तर तिला जास्त आनंद झाला असता. ॲनेकला कोणी मैत्रिणी नव्हत्या. कोणीही तिला फिरायला सोबत नसे किंवा कुणी तिच्या खिडकीशी गप्पा मारत उभे रहात नसे. ती गरीब, साधी व नम्र होती. पण पीटर काकांकडून ती सतत नाकारली जात असे. ते तिला छळत असत.

हो. तिलाही डेटवर जायला आवडले असते. विशेषतः कर्मीसला जाण्यासाठीचा प्रेमिक! इतर मुलींना जसे कोणी आमंत्रण देते, तसे तिलाही कोणी ओव्हरस्टॅडच्या वार्षिक जत्रेला घेऊन गेलेले आवडले असते. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसाठी ती खास जत्रा होती. तिथे गर्दी व गोंधळ असे. प्रत्येकजण तिथे जोडीने जाई. ती जत्रा भली मोठी, कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नसलेली व त्यापासून लांब रहावे अशी होती. तिला फक्त ती बघायची होती, म्हणजे वर्षभर त्याबद्दल होणाऱ्या चर्चेत कुणाबरोबर बोलतांना ते बरे पडले असते. तिचे काका तिच्याबरोबर जायला तयार नव्हते व एकटीला पाठवायलाही तयार नव्हते. ते म्हणाले, "तुला तिथे जायचे असेल तर, इतरांसारखा कुणी प्रेमिक मिळव. हाः हाः"

या उन्हाळ्यातील संध्याकाळी, ती घराच्या दाराशी उभी असतांना ट्रिडा तिथून तिच्या घरी, दोनशे यार्डावरील खानावळीत, चालली होती. तिच्याबरोबर हर्मेन रेज होता. तो कंटाळलेला दिसत होता. कदाचित दोघे भांडत असावेत. क्षणार्धात, अ‍ॅनेकचे छोटेसे हृदय आनंदाने उसळ्या मारू लागले.

क्षणभर थांबून ट्रिडा त्रासिकपणे म्हणाली, "काय ग अ‍ॅनेक, या वर्षी तू जत्रेला जाणार आहेस का? असे म्हणतात, यावर्षी ती फार छांन असणार आहे." तिच्या जवळ असलेल्या देखण्या प्रियकरावर, ती रागावलेली दिसत होती व तिला अ‍ॅनेकला खजील करायची सुरसुरी आलेली दिसत होती.

अ‍ॅनेकने धीटपणे उत्तर दिले, "कदाचित."

"खरच? आणि कोणाबरोबर?"

"तुला माहिती करून घ्यायला आवडणार नाही का?"

"नाही. मी हर्मेनबरोबर जाते आहे. बाकी कोण कुणाबरोबर जाणार आहे, या क्षुल्लक बाबतीत मी लक्ष घालत नाही. पण तुला एक प्रेमिक पाहिजे. नाहीतर मग तुला पीटरमामाला तरी बरोबर घेतले पाहिजे."

वळून निघून जात अ‍ॅनेक म्हणाली, "ट्रिडा, शुभ रात्र."

"किंवा तू जॅन सीमेन, या भिकाऱ्याला बरोबर घे. अ‍ॅनेक, जर मी तुझ्या जागी असते, तर मी एक प्रेमिक भाड्याने घेतला असता. अजिबात जायला न मिळण्यापेक्षा ते बरे." तिच्या प्रियकराला खेटून बसत, उपहासाने हसत ती म्हणाली.

ॲनेक तिच्याकडे बघत राहिली.

त्याच्या मिशाना ताव देत हर्मेन ट्रिडाला बोलला, “तू किती रानटी आहेस!”

ट्रिडा पुन्हा हसत सुटली. “तिने डेटिंगच्या प्रियकराबरोबर का जाऊ नये? तिने हे शंभर वेळा केले असेल. ती चांगला प्रेमिक कुठून आणणार? कारण पीटरमामा तिला कधी पैसे देत नाही.”

हर्मेन अजून जास्त उद्वेगाने बोलला, “तू किती दुष्ट आहेस! तुझ्यासारख्या भांडखोर बाईबरोबर रहाण्यापेक्षा, तपकिरी डोळयांच्या, छोट्याशा शांत मुलीबरोबर रहाणे मी पसंत करेन.”

ती मुलगी रागाने बोलली, “मग तू तिच्याबरोबर का जात नाहीस? कृपया, शब्द जपून वापर. जास्त फुशारक्या मारू नकोस. गरीबातल्या गरीब भिकार माणसाबरोबर तिला जत्रेला जाऊदे.”

तो परत तेच म्हणाला, “तूच भिकार व भांडखोर आहेस.” हर्मेन हा स्वतःची काही मते व मूल्ये असलेला माणूस होता.

ती अचानक वळली व त्याच्या गालावर जोराने चपराक लगावली.

त्या अधिकाऱ्याने स्वतःला सरळ केले व म्हणाला, “मी कधीच महिलांना मारत नाही.” तो निघून गेला. मारल्यामुळे त्याच्या गोऱ्या गालावर, गुलाबीसर लाल रंग पसरला होता.

ॲनेक घरात गेली. ती सावकाशीने विचार करत चालत होती. तिने खानावळवाल्या माणसाच्या मुलीचा द्वेष केला नाही. तिचे वाईट नक्कीच चिंतिले नाही. पण मनातून तिला कुणाचा उबग येत असेल, आणि भीती वाटत असेल तर ती ट्रिडा होती.

पीटरकाका म्हणाले, “ट्रिडा? तिच्या प्रियकराबरोबर? पण तुझ्या खिडकीत लावलेली जेरॅनिअमची झाडे मध्ये आल्यामुळे माझी खात्री नव्हती.” ती काकांसाठी ब्रँडी व पाण्याचे मिश्रण करायला गेली. जून ते सप्टेंबर गार व सप्टेंबर ते जून गरम असे ते मिश्रण, ती गेली सहा वर्षे बनवत होती. नेहमी काका त्यावरून आरडाओरडा करत असत. पण एकदा ती आजारी असताना अंथरुणाला खिळून असल्याने, काकांना ते तयार करुन देऊ शकली नव्हती. तेव्हा ते म्हणाले होते, की ते तिच्या इतके चांगले कोणीच बनवत नाही.

ते म्हणाले, "तो मनुष्य दिसायला किती छान होता. भारतात त्याला नारळासारख्या मुबलक प्रेयसी मिळाल्या असतील."

ॲनेकने निरागसपणे विचारले, "तो खूप वाईट आहे का?'

"वाईट? काय मूर्खासारखा प्रश्न! तू तुझ्या छोट्याशा बागेत हिंडतेस, तेव्हा तुला वेगवेगळया फुलांचा, फालतू फुलांचाही वास येतो. तो काय वाईट असतो? ती फुले मग कशाकरता आहेत? तरीही तुझ्यासारख्या फालतू फुलाचा वास तो घेणार नाही."

तिने उत्तर दिले नाही, पण त्यांना अंथरुणापर्यंत जायला मदत केली. तो अर्वाच्य बोलणारा वयस्क माणूस होता. तिच्या रोजच्या कामातला हा भाग, तिचा नावडता होता. ती तिच्या शुभ्र खोलीत गेली. ती दर वर्षी तिची खोली स्वतः रंगवून काढे. तिने सावकाशीने कपडे काढले. रात्री व सकाळी तिच्या मनात येणारे विचार घालवण्यासाठी ती बोलली, "किती मूर्खपणा!" शेवटी मूर्खपणा शक्य होता. इतर मुलींनी ते मान्य केले होते."

दुपारी जेव्हा ती ढीगभर धुणे घेऊन गावातून वहाणाऱ्या रिडी कालव्यावर गेली, तेव्हा तिने ट्रिडाला खानावळीसमोरील चेस्टनटच्या झाडाखाली इतर काहीजणींबरोबर आरामात बसलेले पाहिले. त्या खळखळून हसत होत्या. मुलींच्या गडबडीच्या  आवाजात ट्रिडाच्या लांबच्या मूर्ख भावाचा, टोनीचा आवाज सर्वात जोरात येत होता. तिथे हर्मेनही होता. थोडी लाज वाटून ट्रिडाने त्या दिवशी सकाळी त्याला लज्जित चेहऱ्याने विचारले होते, की तो तिला माफ करेल का आणि त्याचे उत्तर होते, "नाही. आपण कुठल्या तरी दुसऱ्या विषयावर बोलूया."

झगमगत्या सूर्यप्रकाशात, ट्रिडाने तिला हाक मारली, "ॲनेक!"

ॲनेक नेहमीपेक्षा पांढरी फटक पडली. तिने विचार केला होता, की ट्रिडासारख्या मूर्ख मुलीला हे अजिबात विचारायचे धाडस करायचे नाही, की त्या गावच्या इतर मुलींनी जमीनदार मुलांना डेटिंगसाठी भाड्याने कसे काय घेतले. पण आता ट्रिडानेच सुरवात केली असेल तर -- "

ती पाण्यावरून धुण्याचा टब घेऊन आली. ती उन्हाने त्रासली होती. ती चेस्टनटच्या झाडाखाली आली. इतर सर्वजणी गार व आनंदी होत्या. त्या गटाच्या मध्यभागी चेरींनी भरलेली मोठी टोपली ठेवली होती.

ट्रिडाने विचारले, 'तुला तो आधीच मिळालेला आहे का? मी कॉरी व सुझीला सांगत होते, की तू डेटिंगसाठी प्रियकर भाड्याने घेणार आहेस."

ट्रिडाची खास मैत्रीण असलेल्या कॉरीने विचारले, ‘ती त्यासाठी जाहिरात देणार आहे का?” तिचे सध्या लाल तोंडाच्या शेतकऱ्याच्या मुलाशी, टोनीशी, प्रेम प्रकरण चालले होते.

ट्रिडा ओरडली, “काहीतरीच काय! ओव्हरस्टॅंडला विव्हर्स रस्त्यावरील नेल ट्रॉप्स हिच्याकडे जायचे. ज्यांना स्वतःचा प्रियकर स्वतःला मिळवता येत नाही, त्या मुली तिथे जाऊन त्यासाठी अर्ज करतात.” शाई विकणाऱ्याच्या मुलीने तिच्या जाड, गुलाबी हातांची घडी घातली आणि विजयाने अॅनेककडून हर्मेनकडे पाहिले. ती म्हणाली, “तू विव्हर्स रस्त्यावरील नेल ट्रॉप्सकडे जा.”

अॅनेक म्हणाली, “हे खोटे आहे. तू मला फसवते आहेस.” पण त्यातील काहीजणींनी पाहिले की ट्रिडाने पत्ता दिला, तेव्हा ती डोळ्यात हसली.

टोनी डूंडर बोलला, “हे पूर्णपणे खरे आहे. दोन वर्षांपूर्वी आमच्याकडे एक गुराखी मुलगी होती. तिला एकदा दोन शिलिंग भरल्यावर, डेटिंगसाठी प्रेमिक, मेरी - गो - राउंड, वॅफल्स, काही खेळ व बरेच काही फुकट मिळाले.”

अॅनेकने उत्सुकतेने विचारले, “आणि त्याने तिला चांगले वागवले?

“त्याने तिला फक्त साथ दिली. आणि तिला पाहिजे तेव्हा, घरी जाऊ दिले.”

उद्धटपणे हसत टोनी उत्तरला, “तिला अगदी जसे पाहिजे होते, तसाच तो तिच्याशी वागला.” कॉरी पण हसली. सुझी चेरी खात बसली होती व अॅनेकच्या धुण्याच्या टब वर दगड फेकत होती.

अॅनेक ओरडली, “माझा तुझ्या एकाही शब्दावर विश्वास नाही. हे सर्व ओंगळ आणि खोटे आहे. मुलींनी तिला चिडवून दाखवत तिच्यावर मोठमोठ्याने शेरेबाजी करायला सुरवात केली.

हर्मेन रेजने पुढे वाकून, मुठभर चेरी तिच्या धुण्याच्या टबवर फेकल्या. तो म्हणाला, “त्या छान आहेत. काही खा.”

अॅनेकचे मन भरून आले. काही उत्तर न देता ती चुपचाप तिच्या घराकडे व कामाकडे परतली.

ट्रिडाने जाहीर केले, “तुम्हाला माहिती आहे का, ती ते करणार.” व ओठ वाकडे केले.

इतर मुली म्हणाल्या, “किती भिकारपणा!”

“मी तुला सांगते, ती ते करणार. आणि हे बघा, आपल्याला काही बेत आखला पाहिजे. जेव्हा सगळा गाव तिकडे लोटला असेल, तेव्हा, अर्थात शेतकऱ्याच्या गुरुवारी ती ते करेल.

हर्मेन, तू त्या दिवशी नेल ट्रॉप्सकडे जायला पाहिजेस. तू ॲनेकसाठी तू स्वतःला तयार करायला पाहिजेस.”

हर्मेन ओरडला, “काय? नाही. नाही. आभारी आहे. मी तुझ्याबरोबर असणार आहे.”

“अरे मूर्खा, तू ते करशील. इकडे बघ. आपल्याकडे छान बेत पाहिजेच. पण पहिल्यांदा तू ॲनेकला जत्रेला आणले पाहिजेस. तू तिला सर्कसला घेऊन जा आणि एका कडेला बस. नंतर आम्ही सगळे येऊ -- आम्ही खूपजण -- सगळा गाव -- आणि आम्ही तुमच्यासमोर बसू. नंतर तू काहीतरी कारण काढून, माझ्याशेजारील रिकाम्या जागी येऊन बस. आणि डेटिंगच्या प्रियकराकरता पैसे भरलेली ॲनेक -- “

टोनी खो खो करून हसू लागला. इतर सगळयांनी टाळया पिटत, आरडाओरडा करत हसायला सुरवात केली.

ट्रिडा किंचाळली, “काय मजा येईल!”

हर्मेन म्हणाला, “असे करणे मला थिल्लरपणाचे वाटते.”

टोनी ठासून म्हणाला, “एखाद्या मूर्खासारखे बोलू नकोस.”

हर्मेन रागाने म्हणाला, “मी असले काहीही करणार नाही. मी असे काही करूच शकत नाही. तुम्हाला काय पाहिजे तो मूर्खपणा तुम्ही करा.”

ट्रिडा मध्येच बोलली, “हो. हो. आपण या बेतावर विचार करू. एकदोन दिवसात आपण सर्व काही नक्की करू.”

हर्मेन उठून त्याचे लांब हात ताणत बोलला, “हे आपण उद्यावर ढकलू. चेरीज संपल्या आहेत. मी घरी चाललो आहे. मला काही काम आहे.” सगळयांचा जोरदार हसण्याचा आवाज आला. कारण सगळयाना हे पूर्णपणे माहिती होते की हर्मेन त्याच्या उदरनिर्वाहासाठी भारतीय आर्मीच्या पेन्शनवर अवलंबून होता.

घाईघाईने वेडावाकडा पाय टाकत, टोनी ओरडला, “मी तुझ्याबरोबर येतो आहे.”

ट्रिडा रागाने बोलली, “काहीतरी करायचे म्हणजे जीन घ्यायची. तुम्ही आत जाऊन माझ्या वडिलांची जीन का घेत नाही?”

हर्मेन म्हणाला, “कारण ती फार महाग असते.”

“पण मी तुम्हाला ती दिली, तर तुम्हाला त्याची काही किंमत पडणार नाही.”

वेड्यासारखे फसवेपणाने हसत हर्मेन म्हणाला, “तू मला ती दिलीस तर छानच.”

थोडा रागाचा पारा चढलेला तो, निघून गेला.

ट्रिडा रागाने बोलली, “तो चांगला मनुष्य नाही. तो एका वाईट बाईला टिंगल करून फसवायला नकार देतो. हा बेकार मनुष्य, बाईने नाजूक व सभ्य असावे अशी अपेक्षा करतो.”

हर्मेनच्या शेजारून सैन्यातल्यासारखी पाऊले टाकत, टोनी बोलला, “ट्रिडा ही मुलगी लग्न करावे, अशी नाही.”

हर्मेन कडकपणे म्हणाला, “आणि कॉरी पण नाही.”

त्याच्या लाल जांभळट चेहऱ्यावर पांढरे शुभ्र दात चमकवत, तो गावठी माणूस म्हणाला. “कॉरीशी लग्न करायचे कोण म्हणतो आहे? लग्न ही वेगळी गोष्ट आहे आणि तिच्याबरोबर फिरणे ही वेगळी! जत्रा फक्त वर्षातून एकदा येते. पण लग्न आयुष्यात एकदाच होते.”

विचारी चेहऱ्याने व स्वप्नाळू डोळयांनी जिथे लग्नगाठी सहजपणे बांधल्या जातात त्या भारतासारख्या उन्हाळी देशाची आठवण काढत हर्मेन म्हणाला, “हो.”

“आणि तिच्याकडे पैसेही नाहीत, असे लोक म्हणतात.”

अचानक डोळयातील स्वप्नाळू भाव जाऊन जागरूकपणे, दुसरा किंचाळला, “काय?”

थोड्या त्रासिक आनंदीपणे टोनी बोलला, “नाही. तिच्याकडे पैसे नाहीत. जर प्रत्येकाला कळले की आपल्याला काय माहिती आहे तर! पण नशिबाने तसे नाही.”

“टोनी, चल आपण जाऊन पेय घेऊया.”

“जर तू पैसे भरणार असलास तर मी घेतो. तू ओव्हरस्टॅंडची गाडी घे व तेथील रजिस्टारला विचार की मागच्या गुरुवारी कोणाच्या मालमत्तेवर कर्ज घेतले गेले होते. जेव्हा बॅटसी काका

त्याच्याकडे गेले तेव्हा ते म्हणाले, 'नाही. मी नाही देऊ शकत. मी माझे पैसे नुसती तोंडी बोली करणाऱ्यांना कर्जाऊ देत नाही.'"

"फुस – " हर्मेन तोंडातल्या तोंडात म्हणाला.

"पण वयस्क पीटर आहे. टोनी म्हणाला, "त्याच्या मृत बायकोची सगळी मालमत्ता केव्हातरी ट्रिडाची होणार आहे."

"जर ती त्याने तिला दिली तर! पण तो तर नेहमी म्हणतो, की तो ती ॲनेकला देणार आहे."

"तसल्या खोटारड्या माणसाचा काही नेम नाही. तो खरच ती कुणाला देणार तरी आहे का, याबद्दल मला शंकाच आहे."

"आपण त्याला पेय प्यायला घेऊन जाऊ व त्याला शपथेवर सांगायला लाऊ. आपल्याला तो चर्चशेजारील बीचच्या झाडाखाली सापडेल."

ते त्या दिशेने निघाले.

हर्मेनने त्याला विचारले, "ट्रिडाने तुला काय केले?"

"मला काय केले? काही नाही. ती मला काय करणार? आपण बघू की ती कर्मीससाठी जास्तीत जास्त किती प्रियकर मिळवते. बुजरा माणूस बुजराच रहाणार. पण कुणीच नसण्यापेक्षा तो परवडला."

हर्मेन रागाने बोलला, "अस्स! मला वाटते ते मागील वर्षी."

नवीन तंबाखू पाईपमध्ये भरताना त्यांना वयस्क पीटर सापडला. त्याचे छोटे डोळे चमकवत तो बोलला, "ॲनेक खूप चांगली मुलगी आहे."

तो त्याच्या आरामदायी आवडत्या कोपऱ्यातील जागेवर बसत म्हणाला, "मी माझी प्रत्येक पेनी तिच्यासाठी ठेवणार. माझ्या बहिणीशपथ, मी नक्की तसे करणार." त्याला वाटले की त्याला लग्नाळू मुले बरी भेटली. त्याला अशी मुले हवी होती. पण त्यांना डच्चू द्यायलाही तो तयार होता. त्यांनी त्याला काही पेग जीन अजून दिली.

त्याचा पेला हलवत तो बोलला, "मी माझी प्रत्येक पेनी तिला देणार. हो. शपथेवर सांगतो. प्रत्येक पेनी. माझ्या आईची शपथ, मी नक्की देणार."

हर्मेन जाण्यासाठी उठत म्हणाला, “मूर्खपणाची तुझी आईची शपथ गेली उडत.”

मध्यंतरीच्या काळात धुतलेल्या कपड्यांजवळ उभे राहून, ॲनेक विचार करू लागली.

तिला वाटले, की लोक तिच्याकडे करत असलेले दुर्लक्ष, ती यापुढे सहन करू शकणार नाही. आपल्याला जत्रेला घेऊन जाईल, असा हक्काचा प्रियकर कधीच मिळणार नाही. तिला माहिती होते की तिच्यासारख्या अनेक गरीब मुली, धीटपणे कर्मीसला जायला निघाल्या आहेत व तिथे जाऊन ज्याच्याबरोबर छान संध्याकाळ घालवता येईल, अशा प्रामाणिक माणसाच्या प्रतीक्षेत उभ्या आहेत. आनंदी माणसांचे थवेच्या थवे येऊन, वाल्ट्झ नाचासाठी मुलींना विचारणा करत आहेत. पण असे काहीच्या बाही करायच्या विचाराने, तिचे हृदय धडधडू लागले. योग्य अशा साथीदारासाठी, पुरेसा आब राखून डेटिंगसाठी भाड्याने प्रेमिक घेणे फार कठीण काम होते.

तिने तिच्या मनाशी घोकले, ‘विव्हर्स रस्त्यावरील नेल ट्रॉप्स.’ ओव्हरस्टॅड इतके मोठे शहर आहे, की ते कुणालाच सापडणार नाही. कल्पनासाम्राज्यात शिरत तिने तिचा प्रस्ताव तिला छळणाऱ्यांसमोर ठेवला. जेव्हा पंचक्रोशीतील सर्वजण सुट्टी मजेत घालवण्यासाठी निघतील, तेव्हा शेतकऱ्यांच्या गुरुवारी जाणे सर्वात चांगले ठरेल. त्या दिवशी पीटरकाका नेहमीप्रमाणे रॉटरडॅमला त्यांचे पैसे आणायला जातील व मध्यरात्री पैसे घेऊन परततील. ती त्यांची कर्मीसची मजा असल्याचे, ते नेहमी सांगत. तेव्हा जावे.

हो. ती जाणार. सर्वांच्या नाकावर टिच्चून, सर्कसची दोन तिकिटे काढून तिथे ती बसेल आणि सगळयांना कळेल -- विशेषतः ट्रिडाला -- जर तिने ठरवले, तर ती तिच्या घरी असणाऱ्या माणसांपेक्षा चांगल्या माणसाबरोबर कर्मीसला येऊ शकते. विजयाचे दृष्य नजरेसमोर आणून, तिचे मन चमकून उठले. विसाव्यांदा तिने तिच्या पर्समधले पैसे मोजले. तिला विश्वास वाटला की ते पुरेसे आहेत.

दोन दिवसांनी, संस्मरणीय गुरुवारी, ॲनेक लवकर जागी झाली. तिला रात्री फारशी झोप लागलीच नाही. दिवसाची सर्व कामे तिने भराभर उरकली. तिने काकांचे रविवारचे जुने कपडे काढले. तिच्या थरथरत्या हातातून ती ब्रश करत असलेली काळी टोपी पडली.

पीटर गुरगुरला, “मूर्ख! तो हे नेहमीच बोलत असे व याहून वेगळे काहीच बोलत नसे. तिच्या वडिलांच्या नावे त्यांनी घेतलेल्या शपथांचा मारा आठवून, तिला अनेक वेळा पश्चात्ताप झालेला होता.

पीटरकाका म्हणाले, “मी मध्यरात्री परतेन.” तिला ते माहिती होते. या दर तीन महिन्यांनी बँकेत होणाऱ्या खेपा त्या म्हाताऱ्या माणसाच्या आयुष्यातील सर्वात समाधानाचे क्षण होते. तिने त्यांना जाताना बघितले. वेगळीच छत्री हातात घेतलेले, अडखळत रस्त्याने चालणारे बुजगावणे!

दुपारी काहीच करायला न उरल्याने ती कपडे शिवायला बसली. त्यात तिचा जीव रमत असे. तिचे नेहमीचे ते काम करतांना, ती उन्हाची वेळ सरता सरत नसण्याचे, तिला आश्चर्य वाटत होते. तिने काळजीपूर्वक तिचा गडद हिरवा गाऊन घातला. बर्फासारख्या शुभ्र घट्ट बसणाऱ्या टोपीत तिच्या आईची सोनेरी पिन लावली. नंतर जुलैमधील चकाकणाऱ्या खास संध्याकाळी सात वाजता, तिने घराचे दार बंद केले व ती निघाली.

खुल्या रस्त्याने स्टेशन एक मैल लांब होते. गावातील लोक तिला बघतील, या भीतीने ती काही अपराध करत असल्यासारखी, थरथरत होती. झाडाझुडुपांमधून, शेतांतून व खड्डयांमधून चालतांना, तिला तो दोन मैलांचा वाटत होता. ती स्टेशनवर पोचली, तेव्हा फलाटावर कुणीच नव्हते. सर्वजण सकाळीच तिथे गेले होते व ते त्यांचा दिवसभराचा वेळ मजेत घालवणार होते. तिने खिडकीतून त्या उत्फुल्ल घोळक्यांना जाताना पाहिले होते.

ओव्हरस्टॅंड स्टेशनवर खूप चहलपहल होती. कर्मीसला जायला निघालेली गर्दी जणू येणाऱ्या गाड्यांचे स्वागत करत होती. सर्व शहरावर उत्साहाचा थर पसरला होता. गुरांच्या बाजाराच्या इथून एकाकी चांदणीचा व सूर्यास्ताच्या शांत पिवळया रंगाचा उजेड पडला होता.

गर्दीचा भाग टाळून ॲनेक विव्हर्स रस्त्याला लागली. हॉलंडमधील रीतीला धरून ती दारावरील नावे वाचू लागली.

तो रस्ता एका बाजूला, लहानसा, शांत व गूढ होता. एका उंच घराच्या आधी एका घराच्या पायरीवर मुलगा खेळत होता. ॲनेकला आशा वाटली की ती तिथे आत शिरू शकेल.

तिच्यामागून एक मंजुळ स्वर ऐकू आला, “अरे, माझ्या लाडक्या. तू इथे काय करतो आहेस? तू तर कर्मीसला असायला पाहिजेस.” तिने चमकून वळून पाहिले. ते ऐकणारा तो एक गबाळा, उंच दाढीवाला मनुष्य होता. ती दाढी त्याला शोभत नव्हती.

“माझ्याबरोबर तिथे जायला तुला आवडेल का?” या त्याच्या प्रश्नाला तिने उत्तर दिले नाही.

अशा तऱ्हेने एखाद्या अनोळखी, कसा आहे ते माहिती नसलेल्या माणसाबरोबर जाण्याच्या कल्पनेने, तिच्या काळजात चर्र झाले. ती घाबरून म्हणाली, “नाही. नाही. कृपया येथून निघून जा. मी इथे मित्र शोधायला आले होते.” तो हसत मागे सरला.

कोपऱ्यावरील एका घराकडे निर्देश करत तो ओरडला, “कदाचित तुमचा मित्र तिथे रहात असेल. दोन्ही उंच घरांमध्ये ते घर लपले होते. त्याला बुटकेसे दार व उघडमिट होणारी खिडकी होती. तिने त्याच्याकडे बघत रस्ता ओलांडला व आता तो नक्की गेला असेल असे समजून, कोपऱ्यावर येऊन थांबली. क्षणभर तिला वाटले की परत स्टेशनवर जावे. ती गोंधळून गेली. सावध झाली. ती रस्त्यावर काही पाऊले चालली. नंतर तिच्या अंगात एकदम वीरश्री संचारली. तिने काय होईल त्याचा सामना करायचे ठरवले -- ती सरळ त्या लहानशा घराच्या दिशेने गेली व घंटी वाजवली. एका म्हाताऱ्या बाईने दार उघडले. ॲनेकने विचारले, “तुम्हाला नेल ट्रॉप्स कुठे रहाते, माहिती आहे का?”

ती म्हातारी बाई म्हणाली, “अग मुली, नेल ट्रॉप्स इथे रहाते. आत ये.”

ॲनेक तिच्या मागोमाग मागील खोलीत गेली. वेश्या पुरवणारी घरवाली, पापी घरे, निरागसतेला धोका! तिला काही माहिती नव्हते. तिने ऐकलेला दुष्टपणा तिथे भरून राहिल्यासारखे तिला वाटले.

“नेल ट्रॉप्सकडून तुला काय हवे आहे?” म्हातारीने अंग चोरलेल्या त्या मुलीकडे निरखून बघत विचारले. तिचे हावभाव बेफिकीर झाले. विशेष काही नाही.

ॲनेक पडेल चेहऱ्याने चाचरत म्हणाली, “मी –- मी -- मी, असे ऐकले होते – मला वाटले इथे ---- “

म्हातारी कडकपणे म्हणाली, “मग तू चुकीचे ऐकलेस.” तिने दार उघडेच ठेवले. त्या लहानशा, अंधारी खोलीला शिळा वास येत होता.

गरजेमुळे धीट बनलेली ॲनेक ओरडली, “पण आमच्या गावातील एक मुलगी इथे आली होती.”

चेष्टेखोर सुरात नेल ट्रॉप्स उत्तरली, “मी म्हणू शकते.” अचानक तिच्यावर उजेड पडला. लबाड कटाक्ष टाकत ती म्हणाली, “तुला जत्रेला जाण्यासाठी, डेटींगसाठी प्रियकर हवा आहे का?”

ॲनेकने मान हलवली.

ती बाई थोडक्यात म्हणाली, “एवढेच? बरोबर आहे, मुली, अगदी बरोबर आहे. हो हा पत्ता बरोबर आहे. तुला कुठल्या प्रकारचा प्रियकर आवडेल? शहरातला? खेड्यातला? गोरा की काळा? –- आणि तू त्याकरता किती पैसे भरणार?”

ॲनेक ओरडली, “ओहो, नाही.”

म्हातारी अट घालत म्हणाली, “माझे कमिशन? ते पन्नास सेंट आहे. छत्री हवी असेल ते पंच्याहत्तर.”

ॲनेक तिच्याकडे दृष्टीक्षेप टाकत कुतूहलपूर्वक विचारती झाली, “छत्री कशासाठी?”

थोबाडीत मारल्यासारखी नेल ट्रॉप्स उत्तरली, “ते नेहमी असेच असते. माझ्या आईच्या वेळी आणि आईच्या आईच्या वेळीही. छत्रीमुळे तुम्ही सभ्य, खानदानी दिसता. प्रत्येकाला ते माहिती असते. ती सर्वमान्य गोष्ट आहे. चर्चसारखी. काहीच बदलले नाही. फक्त किंमती कमी झाल्या. काळ वाईट आला आहे. आणि मुली इतक्या धीट झाल्या आहेत की मुली त्यांच्यासाठी डेटिंगसाठी प्रियकर स्वतःच निवडतात.”

ॲनेक म्हणाली, “मी छत्री घेईन”. नेल ट्रॉप्स बाहेर गेली व सवयीने तिच्यामागे दार बंद केले. मुलगी किंचाळू लागली. प्रत्येक निरागस प्राण्याला असणारी जगाच्या वाईटपणाची व असुरक्षिततेची सुप्त जाणीव तिला छळू लागली. तिचे हृदय भीतीने धडधडू लागले. ती ओरडली, “मला बाहेर जाऊदे. मला बाहेर जाऊदे.” क्षणार्धात, म्हातारी नेल ट्रॉप्स तिच्यापुढे अवतीर्ण झाली. भलत्याच रागाने ती म्हणाली, “अग वेडे, तू किती सुंदर आहेस असे तुला वाटते?” ते शब्द पुसटसे कानावर आले व मुलीच्या हृदयात एखाद्या क्षेपणात्रासारखे घुसून तिच्यावर न पुसला जाणारा डाग पाडून गेले.

जास्त मृदुपणे नेलने पुढे चालू ठेवले. कारण तिच्या पाहुणीच्या पडेल चेहऱ्याने तिला सावध केले. “तुला छानशी काळी दाढी असलेला प्रियकर आवडेल का? दाढी ही जास्त मान मिळणारी असते. तुला एक क्वार्टर त्यासाठी जास्त द्यावा लागेल.”

ॲनेकला अचानक रस्त्यातील दाढीवाला आठवला व ती म्हणाली, “नाही. दाढी नको.”

म्हातारी नरमाईने म्हणाली, "असे बघ, माझ्याकडे पेटीत ठेवलेल्या सैनिकांसारखे ते तयार नसतात. तू मला सकाळी सांगायला हवे होतेस. आता माझ्याकडे सहा आहेत त्यापैकीच तुला निवडावा लागेल. मला दाढीवाले आवडतात. मोठी दाढी व टक्कल मला चांगले वाटते.'

"हो. हो. पूर्ण टक्कल." ॲनेकला अनोळखी कुणी नको असल्याने, ती ओरडली.

यावेळेस दार न लावता, पुन्हा म्हातारी बाहेर गेली व रस्त्यावरील माणसाला घेऊन, लगेच परत आली.

ॲनेकने असे म्हणण्याचा प्रयत्न केला, "नको. हा माणूस मला नको." पण तिचा तेवढा धीर झाला नाही. तिच्या घशात शब्द घोळत असतांना -- नेल म्हणाली, "हा आलाच आहे, बघ. तुम्ही दोघे जत्रेला बरोबर जा. तुमची जोडी चांगली दिसते आहे." तिने ॲनेकला जवळजवळ पॅसेजमध्ये ढकलले. "माझे पैसे! अग मुली कृपया, मला पैसे दे. हं. हे ठीक झाले. उद्या येऊन मला सांग, की तुम्ही कशी मजा केली."

ॲनेकच्या मागे दार बंद झाले. खोली अंधारी होती आणि रस्त्यावरही फारसा उजेड नव्हता. तो अनोळखी माणूस घोगऱ्या आवाजात म्हणाला, "आता आपण घाई करून, आपला वेळ मस्त घालवू. तू मला नक्की पसंत करशील. मी सोन्यासारखा चांगला सभ्य व चलाख माणूस आहे."

काहीशी खात्री पटून, ती त्याच्याबरोबर शांतपणे बाजाराच्या गजबजाटाकडे चालू लागली. अजून ही सफर मजा येण्याजोगी वाटत नव्हती. तिने मनाशी काही वेगळेच चित्र रंगवले होते. खरे तर ती कानकोंडी झाली होती. पण गुरांचा बाजार, म्हणजे कर्मीसची मध्यवर्ती शान होती -- ती नक्कीच एक बघण्यासारखी जागा होती. हजारो दिवे सोडलेले पिवळे तळे, लांबवर चकाकत होते. वरती विजेच्या दिव्यांचा नकोसा -- झगमगीत प्रकाश पडला होता. खंडीत न होता घुमणारा आवाज – वादये, गाणे, आरोळया मांजरांचे म्याव म्याव, फेरीवाल्यांच्या व खेळ करणाऱ्यांच्या हाकाट्या, पिस्तुलांचे बार, मेरी - गो – राउंड व हार्मोनिअम यांनी तिथे रानटी गोंधळ माजला होता. छोटी छोटी दुकाने व खेळ यांच्या रांगाच्या रांगा लागल्या होत्या. त्या गर्दीमध्ये लाल तोंडांचे शेतकरी होते. त्यातील बरेचजण घाईने चालत, उद्दीपित होऊन उड्या मारत होते. मोठ्ठी टक्केवारी प्यायलेल्या लोकांची होती. विशेषतः नळकांडी लावलेल्या गॅलऱ्यांमधून, पण जिकडेतिकडेच गणवेषातील पोलीस हिंडत होते. गडद व फिके कपडे, कापडी टोप्या व सोन्याचे दागिने घातलेल्या पुरुष व बायकांच्या झुंडीच्या झुंडी हिंडत होत्या. मेरी - गो – राउंडच्या गोल

गोल फिरण्याने ते बधीर झाले होते. कॅनव्हासच्या भिंतीच्या मागे आगीच्या कड्यासमोर, सिंह त्यातून उडी मारायच्या आवेशात होता. झगमगीत कपडे घातलेले नट व कसरतपटु भपकेबाजपणे उभे होते. ते तोंडाने त्यांच्या खेळाची जाहिरात करत होते. आणि सर्वात कडी म्हणजे, फालतू दुकानांमधील धूर, ओशट केक्सचा दरवळणारा वास, मोठ्मोठ्या ड्रमचे टोले, रस्त्यावरची गाणी, कोलांट्या उड्या, कोपरखळ्या व मवालीगिरी याला उत आला होता. सगळीकडे, एकाकी शांत आकाशाखाली, शेकडो पदके व चित्रांमध्ये नेदरलँडच्या छोट्याशा राणीचा चेहरा झळकत होता.

लहान असतांना वडिलांबरोबर इथे भेट दिल्याच्या आठवणींनी ॲनेकच्या मनात पिंगा सुरु केला होता. पण तिला आठवत होते, तसे आता नव्हते. आता सगळे गोंगाटाचे व अति सामान्य झाले होते. असे शक्य होते की इतरांना त्यातच रानटी आनंद वाटत होता. कोणी तिला इथे आणायला तयार नव्हते, यात काही आश्चर्य नव्हते. ती इतर मुलींसारखी नव्हती, असे ते म्हणत, त्यात काही आश्चर्य नव्हते. चोहीकडे चविष्ट पावांची पुष्कळ दुकाने होती. तिच्या सहकाऱ्याने नम्रपणे तिला विचारले, “पहिल्यांदा तुला काय बघायला आवडेल? तिथे दोन डोकी असलेले वासरू आहे. त्यातील एक डोके डुकराचे आहे. तिथे काही मोठे मारामारीचे खेळही आहेत.”

ॲनेक म्हणाली, “आपण झटपट सर्कसकडे जाऊ.”

“ठीक आहे. तुझ्या मनासारखे होऊ दे. पण आता उशीर झाला आहे. सर्कस संपली असेल, तर आपण दुसऱ्या एखाद्या खेळाला जाऊ शकतो.”

ते आत शिरले. ॲनेकने तिकिटे काढली. आणि एका मंद उजेडाच्या अरुंद पॅसेज मधून ते त्यांच्या जागेवर पोचले. तिथे पोचल्यावर तिच्या लक्षात आलेली पहिली गोष्ट म्हणजे, ट्रिडा तिच्या कंपूसकट तिथे बसलेली होती. तिच्या शेजारची जागा रिकामी होती. ती तिथे बसायला लागताच तिला हुल्लडबाजी ऐकू आली. तिच्या सोबत्याची दाढी निघाली आणि त्याबरोबर खोट्या भुवयाही! तिच्या मागे हर्मेन रेज हसत उभा होता. तो म्हणाला, “हाः हाः ठीक आहे. हा एक विनोद होता.”

तिने यापूर्वी कुणी वेषांतर केलेले पाहिले नव्हते. दाढी चिकटवता येऊ शकते, हेदेखील तिला माहिती नव्हते. विनोदाच्या निमित्ताने तिला एक नवीन अनुभव मिळाला. त्यांना माहिती होते -- त्यांना सर्वांना माहिती होते -- की ती ओव्हरस्टॅंडला प्रियकर शोधण्यासाठी आलेली आहे. ती तिच्या जागेवर बसून मुसुमुसु रडू लागली.

तो तिच्या कानात कुजबुजला, “रडू नकोस. सगळयांना कळेल.” ती लगेच रडायची थांबली. “शिवाय तू रडतांना मला पहावत नाही. आपण आनंदी राहून, मस्त मजा करू. बघ, आता खेळ सुरु होतो आहे.” खूपसे विदुषक उडया मारत व हसत पुढे आले. त्या दृष्याने आनंदित होऊन, हर्मेन त्याच्या जागेवर नीट बसला. ॲनेकने समोरील ट्रिडाच्या कंपूकडे न बघण्याचा प्रयत्न केला. ते तिच्याबद्दल बोलत होते व तिची टर उडवत होते. तिला हर्मेन रेज फारसा माहिती नव्हता. तो तिच्या गावचा नव्हता. ती नेहमी अंतर राखून त्याची स्तुती करत होती. तो तडफदार, देखणा होता. त्याची नजर प्रेमळ होती. या कपड्यात तो वेगळा दिसत होता, अगदी सभ्य गृहस्थ दिसत होता. तिला नवल वाटले, त्याला काय हवे आहे व काय करायचे आहे.

खेळ चालू होता पलीकडील कंपू अस्वस्थ झाला होता. विशेष करुन ट्रिडा तिच्या प्रियकराला खुणा करू लागली होती. पहिल्या दहा मिनिटांच्या मध्यंतरात जेव्हा सर्कसचे अर्धे प्रेक्षक उठून गेले, तेव्हा त्या खुणा हट्टीपणात वाढल्या. टोनी येऊन हर्मेनशी काही बोलला. त्याला एवढेच उत्तर मिळाले, “तू गप्प बस.”

ॲनेक निरागस होतीच -- आणि मर्यादाशील स्त्रीच्या सर्व भावना तिच्याजवळ होत्या -- तिला एवढे समजल्यावाचून राहिले नाही, की ट्रिडा तिच्या प्रियकरावर हक्क गाजवते आहे.

ती मृदुपणे बोलली, “ट्रिडाला तू हवा आहेस.”

त्याचे उत्तर होते, “तिला हवा असू दे.”

“पण -- मला वाटते तू तिच्याकडे जायला हवेस.”

“मला जे करायचे आहे, ते मी करीन.”

“मग आता सुरवात कर.”

“तुला माहिती आहे का. मी सुरवात करतोच आहे.”

“ओहो, त्या घोड्याने काय उडी मारली!”

“त्यामुळे तुला भीती वाटली का?’

“नाही. मी फक्त दचकले. मी घोड्यांना घाबरत नाही.”

“मला वाटले की तू खूप घाबरट आहेस. ट्रिडा तसे म्हणते.”

“कदाचित असेनही. मी मला दुखावणाऱ्यांना घाबरते.’

“ट्रिडा, तू निघून जा. ताबडतोब निघून जा. छोट्याशा अॅनेक, तिला सांग निघून जा. तुला तुझा विजय साजरा करणे शक्य आहे.”

“कसला विजय?” अॅनेकने विचारले.

तो तिला हसला व म्हणाला, “तुला तर्क करता येत नाही का/”

हो. ती तर्क करू शकत होती. तिला कळत होते की या ना त्या कारणाने, तिच्या शेजारी बसलेला हर्मेन -- डॉन जुआन हर्मेन, उघडपणे तिच्या मैत्रीणींसमोर त्याच्या प्रेयसीला फसवत होता. तो अॅनेकशी अगदी लक्षात येईल इतक्या मित्रत्वाने व खूप चांगला वागत होता. त्याने तिचे पैसे घ्यायला नकार देऊन, तिला स्वतःच्या पैशांनी लेमोनेड घेऊन दिले. तो मिशा पिळत, जेव्हा तिच्यावर वाकला, तेव्हा इतर मुली त्याच्याकडे बघत होत्या. खात्रीने त्या क्षणी तिच्या यशावर शिक्कामोर्तब झाले. ती हसली. तिला तो आनंदी वाटला. खेळ संपला, तेव्हा त्याने तिच्यासाठी हात पुढे केला आणि चिडलेल्या ट्रिडाकडे दुर्लक्ष करून त्याच्या पसंतीच्या मुलीबरोबर बाहेर पडला.

अजून काही खेळ त्यांनी बरोबर बघितले. अॅनेकने जंगली प्राण्यांची त्रिमिती चित्रे बघायला पसंती दिल्याने, ते तिकडे गेले. हर्मेन जांभया देत होता पण तो तिच्या बरोबर गेला.

तो म्हणाला, “आता आपण जाऊन वॅफल्स खाल्ले पाहिजेत.” त्याने तिला सोनेरी शुभ्र अशा हॉटेलमध्ये नेले. तिथे नीटनेटक्या वेटर मंडळींची लगबग चालू होती. तो मागील निवांत जागी जायला बघत होता.

अॅनेकने सुचवले की आपण इथे पुढेच बसू, म्हणजे आपल्याला ही लोकांची गजबज पहाता येईल.”

“पण आपल्याला एकांत हवा आहे, नाही का?”

“नाही.”

त्यानंतर तिथे शांतता पसरली. गर्दीत व अनेक वास येत असलेल्या ठिकाणी त्यांनी वॅफल्स खाल्ले.

हर्मेन म्हणाला, “कर्मीससाठी तुझी साथ उत्तम नाही.” पण क्षणभराने त्याने त्याचा आवाज बदलला. तो एकदम सभ्य व सहानुभूतीपूर्ण बनला. मित्रत्वाने वागू लागला. त्याने तिला सांगितले, की त्याला कशी तिची दया येत होती व तो कशी तिची स्तुती करत होता. ट्रिडाचा बेदरकार, मुजोर स्वभाव त्याला कसा उबग आणत होता -- तो कसा खरे तर . ट्रिडाबरोबर लग्न करायला नाराज होता, कशा त्याच्या फसव्या संध्याकाळी, तो योग्य स्त्री शोधण्यात तो घालवत होता, अ‍ॅनेक सारखी एक खोडकर व अधीर, दयाळू व कोवळीक असलेली मुलगी जीवनभरासाठी योग्य मदतनीस होती. विविध कर्णे, भोंगे इत्यादींच्या गजरात, पांढऱ्या स्वच्छ गणवेषातील वेटर मंडळींच्या अदबीने बोलण्याच्या आवाजाच्या गडबडीत, हे सर्व गाऱ्हाणे त्याने तिच्या उत्सुक कानांवर घातले. त्या जोडीची डोकी खाली घातली गेली होती व कुजबुज फार हळू आवाजात होऊ लागली होती. आणि जत्रेच्या वेळी लोक, विशेषतः वेटर मंडळी समजून घेतात की या कोपऱ्याच्या महत्वाच्या चिऱ्यावर पूर्ण इमारत उभी रहाणार आहे.

शेवटी जेव्हा तिने तिचे डोळे वर केले, तेव्हा तिथे आनंद पसरला. असा आनंद की जो महिलांच्या बाबतीत दोनदा होऊ शकत नाही. तिने त्याच्यावर शुध्दपणे, अव्यक्त विश्वास ठेवला.

ती म्हणाली, “मला घरी जायचे आहे.”

“आता हे काय? आत्ता तर कुठे गमतीला सुरवात झाली आहे.”

“मला स्टेशनवर जायचे आहे -- एकटीला.” तिने त्याला अडवत म्हटले.

त्याच्या तोंडून प्रेमाची शपथ निघाली. त्यामुळे ती अगदी शंभर टक्के नाही तरी, दुखावली गेली. तिला पीटरकाकांची आठवण आली, तिचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता.

तो म्हणाला, “का? तू किती मूर्ख आहेस! माझ्याबरोबर चल व आपण -- “

तिने त्याला तोडत मध्येच म्हटले, “मी स्टेशनवर चालले, शुभ रात्र.”

सुखाशिवाय दुसरा कुठलाही विचार न करता ती अंधारात धावली. तिचा संध्याकाळचा विजय ती पूर्णपणे विसरून गेली. स्टेशनवर पोचल्यावर तिने गाडीची चौकशी केली. तेथील लोक तिला हसले व म्हणाले, ”गाडी वीस मिनिटापूर्वीच गेली. मग घरी निघाल्यापासून पहिल्यांदा, तिने घड्याळात पाहिले. आता येणारी एकच गाडी होती पण ती ती तिच्या गावाला थांबत नव्हती. तिला मध्यरात्री सहा मैल चालावे लागले असते. त्यापेक्षा वाईट म्हणजे, तिच्या खिशात घराची किल्ली होती – पीटरकाकांच्या नंतर एक तास ती गाडी तिच्या गावाला पोचली असती.

हर्मेनला वेळेचे भान होते का, याबद्दल तिला थोडे आश्चर्य वाटले. नाही. तो एक चांगला मनुष्य होता. तिला आधीच माहिती होते, की ती त्याच्या प्रेमात आहे. त्याने पीटर काकांकडे जाऊन तिच्याबद्दल बोलून, त्यांची परवानगी मिळवायला हवी. तिच्या लग्नासाठी ते उत्सुक होते. त्यांच्याकडून काही आडकाठी झाली नसती. हर्मेन किती उमदेपणे बोलला! तिने आधीच अगदी मनापासून त्याची स्तुती केली. ती दुसऱ्या स्टेशनवर उतरून, रस्त्याने चालू लागली. तिच्याभोवतालची नीरवता किती सुंदर होती! मोठ्या पिवळ्या चंद्राचा मंद उजेड शेतांवर व पॉप्लरच्या झाडांवर पडला होता. तिथे गुरे क्वचित जात असत. तिच्या आजूबाजूला कोवळीक, शांतता व माधुर्य भरून राहिले होते. संध्याकाळचा गजबजाट कोसो दूर होता. हर्मेनने तिला अगदी खरे खरे सांगितले होते, की तो तिची किती काळजी करतो! तिने विचार केला, 'आमची लहानशी ह्रदये नक्की स्वर्गाइतकीच अमाप असणार. त्याशिवाय एका तासात आमच्या ह्रदयात अख्खा स्वर्ग कसा मावला असता?'

जसजशी ती घराच्या जवळ येऊ लागली, तेव्हा तिने पाहिले की वयस्क पीटरकाका अस्वस्थतेने घरासमोर फेऱ्या मारत होते. तिला माहिती होते, की ते नक्की खूप रागावलेले असणार. पण काही का होईना, ती नेहमी त्यांना जितकी घाबरून असे, तसा विचार करायला तिला वेळच मिळाला नाही.

ती जवळ आल्यावर ते ओरडले, "आलीस का अनैतिक मुली? आणि नंतर त्यांनी अजून घाणेरडा शब्द वापरला. चंद्रप्रकाशात, त्यांची हातात गोल छत्री घेतलेली व टोपी घातलेली आकृती विनोदी व कुरूप दिसत होती.

तिने दार उघडायची घाई केली, म्हणजे त्यांचे ओरडणे कुणाला ऐकू गेले नसते. जेव्हा दोघेही सुरक्षितपणे आत आले तेव्हा ती खूष झाली. आणि मग तिच्यावर आगपाखड सुरु झाली. ती ऐकून घेत, ती आखडून गेली पण शांततेने दुर्लक्ष करू लागली. अशा शिव्या त्यांनी यापूर्वी कधी दिल्या नव्हत्या. ते नुसते केकाटत होते. पण त्यानंतर तिने कधी त्याना तसे कारणच दिले नाही. तिने त्यांना डॉन जुआन हर्मेनबद्दल सारे काही पीटरकाकांना सांगायचे ठरवले.

ते ओरडले, "साध्याभोळ्या चेहऱ्याने व सभ्य चालीरीतीने वावरणाऱ्या तुझ्यासारख्या नटमोगरीला मी ओळखून आहे. तू तुझ्या मार्गाने जा. पण नंतर तुझी रडगाणी घेऊन माझ्याकडे येऊ नकोस."

त्या जहरी शब्दांनी क्षणार्धात तिचे मन दगडाचे झाले. तिने प्रकाशमान मेणबत्ती हातात घेऊन ताठपणे, तिचे तोंड काकांकडे वळवले. ती म्हणाली, “माझी गाडी चुकली, त्याबद्दल मला माफ करा.”

पीटरकाकांनी थोड्या मवाळ स्वरात पण फसवेपणे हसून विचारले, “आणि कोणाबरोबर तेथे फिरलीस त्याने त्यानंतर तुला एकटीला जाऊ दिले?”

“मी इथून एकटी गेले. मला हर्मेन रेज भेटला. तोही एकटाच होता. म्हणून मग आम्ही दोघे सर्कसला गेलो.”

“खरे की काय? आणि एवढेच?”

तिचा आवाज व हावभाव गंभीर झाले. “नाही. तो मला म्हणाला -- काका तो मला हळूवारपणे म्हणाला -- मी त्याला आवडते. असे वाटते, त्याने नीट विचार केला आहे. तो तुम्हाला भेटायला येणार आहे.” तिची मान खाली गेली.

वयस्क पीटर खाली बसला व खो खो हसू लागला.

गालातल्या गालात हसत तो म्हणाला, “तो फार घाई करतो आहे. मी तीन दिवसापूर्वी त्याला माझ्या पैशांबद्दल सांगितले.

ॲनेकने उत्सुकतेने अचानक वर पाहिले. “काय? तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“तो खरच माझ्या पैशांबद्दल जाणून घेण्याच्या बाबतीत, फार चौकस होता. मी पैसा माझ्यानंतर कुणाला देणार आहे, याबाबत. मी त्याला सांगितले की तुला. आईशपथ सांगितले.”

ती म्हणाली, “काका!” तिचा आवाज एकीकडे झालेल्या दुःखात तर दुसरीकडे काकांबद्दलच्या वाटणाऱ्या ऋणाच्या भावनेत हिंदकाळत होता.

“आणि म्हणूनच मी हे करीन. ते खरे आहे. तू माझी कायद्याने व नैसर्गिकपणेही वारस नाहीस का? फक्त -- माझ्याकडे मागे ठेवायला फारसे पैसे नाहीत. शंभर देखील नाहीत. सगळे पैसे तुझ्या कैलासवासी काकूचे होते व ते तिने ट्रिडाला दिले. शहरातील नोटरीला ते मिळाले. मी जे वाचवले ते -- जरी फार नसले तरी, ते ट्रिडाला जाणार होते. तसे तिने माझ्याकडून कबूल करून घेतले होते व नोटरीकडून त्यावर माझी स्वाक्षरी देखील करून घेतली होती. ती म्हणाली, “मी साठवलेले पैसे, हे माझे आहेत व ते मी ॲनेकच्या भिकारड्या कुटुंबाला देणार नाही.” पण ॲनेक, माझे

साठवलेले पैसे काही फार नाहीत. मी गरीब माणूस आहे. गरीब माणूस! शिवाय मी काही इतक्यात मरत नाही.” तो त्याच्या मोठ्या आरामखुर्चीत बसून उदासीनतेने मेणबत्तीकडे बघत राहीला.

पुन्हा भानावर येत म्हणाला, “तो रेज -- तो शांत मुलगा आहे. एखाद्या बुलबुलसारखा आहे. तुला हे मेल्याशिवाय सांगणार नव्हतो. पण ते तुला आत्ता सांगण्यात जास्त मजा आहे. आणि मला दोन तास अंधारात उभे केल्याबद्दल ते तुला ऐकवायची तुझी लायकी आहे. मी इतका दमलो!”

ती कटूपणे म्हणाली, “माझा विश्वास बसत नाही.” ती त्यांच्याशी असे कधी बोलली नव्हती. “कोणीच कधी तुमच्यावर विश्वास ठेवणार नाही. उदाहरणार्थ, तुम्ही तासाभरापेक्षा जास्त थांबू शकला नसतात. तुम्ही नेहमी खोटे बोलता.”

त्यांचा पुटकुळयावाला चेहरा काळा पडला. त्यांची उंच काळी टोपी त्यांनी मागे ढकलली. आणि छत्री पुढे ओढली. ते सावकाशीने बोलले, “मला पाहिजे असेल तेव्हा, मी कुणालाही खरे सांगू शकतो. अग भवाने, तुला माझ्याकडून अर्धी पेनीसुद्धा मिळणार नाही. सर्व काही ट्रिडाला मिळणार.”

तिने निराशेने स्वतःला अचानक पुढे केले. तिच्या गालावर मेणबत्तीचा प्रकाश पडला. बसलेल्या आवाजात तो ओरडली, “शपथ घ्या. तुमच्या आईच्या नावाने शपथ घ्या.”

ते उत्तरले. “ओहो, तू ते शोधून काढलेस का? प्रत्येकात काही दोष असतात. तू म्हणत असशील तर मी, माझ्या आईच्या व बहिणीच्या नावाने शपथ घेतो.”

तिने त्यांच्याकडे पाठ फिरवली. शुभ रात्र म्हणून ती मेणबत्ती घेऊन वर गेली.

अंधारात राहिलेला म्हातारा माणूस तिच्या नावाने फुकटच ओरडला. मग स्वतःसाठी उजेड पाडत वर जाऊन तिचे दार वाजवले. त्याना काही उत्तर मिळाले नाही. कंटाळून ते अंथरुणावर तळमळत राहिले व लगेच झोपून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीच्या वेळी ॲनेक लाल डोळे व ओढलेला चेहरा घेऊन खाली उतरली व कामाला लागली. काकांशी गरजेपुरते बोलली. सतत ती खिडकीतून बाहेर बघत होती. तिची जेरॅनिअमची झाडे बाहेर मोडून पडली होती -- काल रात्री वयस्क पीटरने ती बंद दारापुढे मोडून टाकली होती. तिने तो राडा आवरला व परत घाईने आत गेली. जोपर्यंत ती व तिचा काल रात्रीचा प्रियकर यांच्यातील बाबी स्पष्ट होत नव्हत्या, तोपर्यंत तिला दाराबाहेर तिचा चेहरा

दाखवायला, लाज वाटत होती. ती नेहमीच एक चांगली मुलगी होती -- तोपर्यंत ते तिचे दुःखांनंतरचे एक समाधान होते.

दुपार होऊ लागल्यावर कालव्यावरून रमतगमत, खानावळ व छोट्या घरांच्या वस्तीमधील मोकळया जागेत, हर्मेन आला. अॅनेकने तिच्या हातातील ती घासत असलेले भांडे खाली ठेवले आणि तडक त्याच्याकडे भर उन्हात चालत गेली.

त्याच्या मधुर हास्याकडे दुर्लक्ष करत, तिने सुरवात केली, “हर्मेन रेज, आधी मला तुला हे सांगायचे आहे, की माझ्या काकांनी तुला जे सांगितले, ते खोटे होते. जेव्हा ते मरायला टेकतील, तेव्हा त्यांचे सर्व पैसे ट्रिडाला जातील. मला एक पेनीदेखील मिळणार नाही. त्यांचे सर्व पैसे त्यांच्या बायकोचे होते.”

हर्मेन रेजचा उजळ चेहरा रागाने चमकला. “ओहो, काय वेडेपणा आहे! हे खरे नसेल. अॅनेक, हे त्या म्हाताऱ्याचे बोलणे खोटे आहे.”

ट्रिडा खानावळीतून निघून त्यांच्यामागे आली होती. ती अवाक् होऊन उभी राहिली. तिचे डोळे रागाने लाल झाले होते.

“नाही हर्मेन, हे खरे आहे. त्याच्याकडे जे काही आहे ते, ते माझ्यासाठी ठेवणार आहेत. पण त्याच्याकडे मला देण्यासाठी काही नाही आहे. मला वाटले की तुला हे माहिती हवे.” तिचा चेहरा कठोर असला, तरी तिचा स्वर पश्चात्तापाचा होता. “मला माहिती आहे की ते खरे आहे. माझी खात्री आहे. पण हर्मेन -- “ तिने स्वतःला सावरले.

देखण्या हर्मेनने सावकाशीने त्याची टोपी उचलली, त्याचे डोके थोडेसे झुकवले व तो अॅनेकला तसेच उभे ठेऊन ट्रिडाकडे सरळ चालत गेला व त्याचा हात वर करून म्हणाला, “हे बघ, मी अॅनेकशी लग्न करणार आहे. तू असे समजू शकतेस, की तू मला थोबाडीत मारल्याबद्दल तुला मिळालेले हे बक्षीस (?) आहे, ”

Torture by Hope

by Count Villiers L'isle Adam

France

# आशेमुळे छळ



shutterstock.com • 52892224

रोमन धर्मगुरूंच्या धार्मिक परंपरेतील स्पेनचा तिसरा कडक धर्मगुरू, वयातीत पेद्रो अर्ब्युएज़ डिस्पिला, संध्याकाळ होऊन गेल्यावर लांबवर सारागोसाच्या तळघरात पायऱ्या उतरून आला. त्याच्या पाठोपाठ कैद्याचा छळ करण्यात अग्रेसर असलेला मनुष्य आला. त्यांच्याआधी दोन पवित्र कुटुंबे हातात कंदील घेऊन जमिनीखालील छुप्या तुरुंगात आले.

भक्कम दाराचे कुलूप करकर वाजून उघडले गेले आणि ते सावकाश चालत बसायच्या जागी आले. तिथे अगदी थोड्याशा फटीतून येणाऱ्या उजेडात, ताटली व पाण्याची दगडी डोणी दिसत होती. कुजलेल्या गवतावर लोखंडी रींग गळयात अडकवून साखळबंद केलेली, वय लक्षात येत नसलेली, गुडघ्यात डोके खुपसून बसलेली एक आकृती दिसत होती. त्या आकृतीने चिंध्या पांघरल्या होत्या आणि तिचा चेहरा अशक्त व फिकुटलेला दिसत होता. ॲरेगॉनचा ज्यू रब्बी अशर अबरबॅनेल, हा तो कैदी होता. अत्यंत चढ्या दरांनी कर्जाऊ पैसे दिल्याबद्दल व गरीबांना मदत न करता, त्यांच्याशी अरेरावीने वागल्याबद्दल, त्याचा एक वर्षाहून अधिक काळ, प्रत्येक दिवशी छळ

केला जात होता. परंतु त्याचा हट्टीपणा, त्याच्या दुर्लक्ष करण्याप्रमाणेच कणखर होता. तो त्याच्या निरपराधपणाच्या विश्वासाला तडा जाऊ द्यायला तयार नव्हता.

त्याच्या हजारो नातेसंबंधाबद्दल व गौरवपूर्ण भूतकाळातील त्याला पाठींबा देणाऱ्या लोकांबद्दल तो अभिमान बाळगून होता -- प्रत्येक स्वाभिमानी ज्यूसाठी त्याचे रक्त हे उच्च प्रकारचे असते. ऑथनीएल येथील तालमडच्या मताप्रमाणे व इस्त्राईलचा शेवटच्या जज्जची बायको असलेल्या इप्सिबो हिच्या प्रभावाने त्याच्या भयंकर छळातूनदेखील तो त्याचे मनोधैर्य टिकवून होता.

इतक्या निष्ठावान मित्राच्या होणाऱ्या छळामुळे वाईट वाटत असलेला तो थोर पेद्रो अर्ब्युएज़ डिस्पिला डोळयात पाणी घेऊन, थरकाप होणाऱ्या कैद्याकडे आल्यावर, असे बोलला,

“बाळा, आनंद साजरा कर. कारण तुझ्यावरील आरोपांच्या फेऱ्या संपत आल्या आहेत. मी इतके प्रयत्न केल्यावरही, जोर लावल्यावरही व भावासारखे तुझ्या पाठीशी उभे राहील्यावरही, नाईलाजाने मला म्हणावे लागेल की मलाही मर्यादा आहेत. तू एक उजाड अंजिराचे झाड आहेस. त्याला बहुधा फळे येत नाहीत. ते मुळापासून उपटले जायचा धोका आहे -- पण देवच तुला यातून वाचवू शकतो. त्याची अपरंपार दया तुला भरभरून लाभो. तू आशा सोडू नको. तुझे काही चांगले पूर्वसंचित असेल -- ते तसेच असो. आज रात्री तू सुखाने झोप. उद्या तू ऑटो-द-फे, ( जाळून मरण देणे ) ला सामोरा जाशील. माझ्या बाळा, अविनाशी ज्योतीचे प्राथमिक चिन्ह तुला माहिती आहे. त्याच्या दूर असणाऱ्या धगीने मरण दोन किंवा तीन तासात येते. आम्ही मरणाऱ्याचे कपाळ व छाती बर्फासारख्या गार, ओल्या कपड्यांनी गुंडाळतो. तुझ्यासारखा शेवट होणारे त्रेचाळीसजण आहेत. लक्षात ठेव की तू शेवटी असशील आणि त्यामुळे तुला देवाची आळवणी करून खास ज्यू पारंपारिक विधीने त्याला पवित्र आत्मिक शक्तीची ज्योत अर्पण करायला, वेळ मिळेल. त्यामुळे त्या ज्योतीवर श्रद्धा ठेऊन झोप.”

या भाषणाच्या शेवटी दुःखी माणसाला साखळदंडातून मुक्त करण्यासाठी नेमलेला माणूस, डॉम अर्ब्युझ, याने त्याला भावनामयतेने मिठी मारली. मग फ्रा रिडेमप्टरची पाळी होती. त्याने रब्बी अशरला त्याच्या सर्व चुकांची, पापाची हळू आवाजात कबुली देण्याची विनंती केली. नंतर दोन ओळखीचे लोक आले. त्यांनी रब्बी अशरचे चुंबन घेतले. पण त्यांच्या झाकलेल्या डोक्यामुळे ते ऐकू आले नाही. हा समारंभ पूर्ण झाला. मग कमनशिबी रब्बी अशरला अंधारात एकट्याला ठेवण्यात आले.

कुलुपबंद दाराच्या आत रब्बी अशरचे तोंड कोरडे पडले होते व शरीराच्या अवयवांची वाट लागली होती. रब्बी अशर विचार करू लागला. पहिल्यांदा तो फार गंभीरपणे विचार करत नव्हता. "कुलुपबंद? -- " या शब्दाने त्याच्या गुप्त अंतर्मनात विचारशृंखला जागी झाली. क्षणार्धात त्याला कंदिलाच्या उजेडात दाराला एक फट असल्याचा संशय आला. कमकुवत होत जाणाऱ्या त्याच्या मेंदूत वेड्या आशेचा किरण डोकावला. आणि हळूवारपणे काळजीपूर्वक फटीत बोट घालून त्याने दार त्याच्याकडे ओढले. नवल घडले. दार लावणाऱ्याने ते कुलुपबंद करण्यापूर्वी जेव्हा किल्ली फिरवली तेव्हा काही असामान्य कारणाने ते बंद झालेच नाही. किल्ली भोकात नीट फिरवली न गेल्याने दार कोठडीच्या आतील बाजूस झुलत राहिले.

रब्बीने बाहेर एक धोकादायक कटाक्ष टाकला.

फिकट अंधारात तो नाहीसा होऊ शकत होता. प्रथम तो अर्धवर्तुळाच्या दगडी भिंतीवरून जाऊन गोल जिना चढला, तेव्हा त्याला त्याच्यासमोर सरळ सहा सात दगडी पायऱ्या दिसल्या. तेथून पॅसेजमधून तो गेला. पलीकडे त्याला वरील काही कमानी पुसटपणे दिसू लागल्या. भिंतीच्या मागे अंग चोरुन तो सरकत सरकत मुख्य दाराच्या खालील भागाकडे जाऊ लागला. हो. ती बाहेर पडायची वाट होती पण खूपच लांबसडक होती. तिथे स्वप्नातल्यासारखा -- मंद उजेड होता. थोड्या थोड्या अंतरावर छताला दिवे टांगलेले होते. कोंदट हवेत त्यांचा फिकट निळा उजेड पडत होता. लांबवर गडद सावल्या दिसत होत्या. फक्त डावीकडे भिंतीला लागून गटाराच्या भोकांना जाळया बसवलेल्या होत्या. तिथे संध्याकाळचा संधीप्रकाश रेंगाळत होता. आणि काय भयानक शांतता होती! -- तरी सावल्यांच्या तळाशी बहुधा स्वातंत्र्याचा रस्ता असावा. त्या ज्यूच्या शेवटच्या आशा पल्लवित होऊन पुन्हा विझत होत्या.

भिंतीच्या सावलीच्या भागातून झेंड्याच्या चौथऱ्यावरून व खिडक्यांमधून दिसणार नाही अशा तऱ्हेने वाकत, पुढील मागील विचार न करता तो चालू पडला. तो पाय ओढत हळूहळू चालला होता. नुकत्याच झालेल्या उघड्या जखमेतून जेव्हा वेदना होऊ लागली, तेव्हा त्याच्या तोंडून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली.

अचानक दगडी पॅसेजमधून चपलांचा आवाज येऊ लागला. तो थरथर कापू लागला. दुःखाने त्याचा घसा दाटून आला. डोळे भरून आल्याने, त्याची नजर पुसट झाली. आता हा आपला शेवटच आला. त्याने स्वतःला आखडून घेतले व थांबला. भीतीने तो अर्धमेला झाला.

तिथे नेहमीच्या स्वरूपाची काही घाई चालली होती. त्या माणसाच्या हातात ओरबाडून काढायचा लोखंडी पंजा होता. त्याने त्याच्या जॅकेटची टोपी मागे टाकलेली होती. तो झटपट जवळून गेला व दिसेनासा झाला. रब्बीला इतका धक्का बसला की त्याची हालचाल गोठल्यासारखी झाली. सुमारे तासभर तो काही हालचाल करू शकला नाही. जर तो पकडला गेला तर त्याच्या हालाला पारावार रहाणार नाही, या विचारामुळे त्याला वाटले की तुरुंगात परतावे. परंतु त्याच्या आत्म्याची आशा कुजबुजली. अत्यंत वाईट अशा दुःखी अवस्थेत त्याची समजूत घालणारी ती -- कदाचित ती देवाची करणी असावी. चमत्कार घडला. संशय घ्यायला काही जागा उरली नाही. तो परत शक्य असलेल्या सुटकेच्या दिशेने सरकू लागला. भुकेमुळे व त्रासामुळे दमून गेलेला तो, दुःखाने थरथर कापत होता. तो पुढे चालू लागला. अंधारी पॅसेज गूढ भासत होता व संपता संपत नव्हता. पुढे नक्की सुटकेचा रस्ता असणार अशा आशेने, तो न थांबता अंधारातून चालत राहिला.

ओहो, परत पदरव ऐकू येऊ लागला. यावेळेस तो पदरव सावकाश व जास्त प्रतिष्ठीत वाटत होता. काळया पांढऱ्या आकाराच्या त्या दोन अनोळखी व्यक्ती त्यांची जाकीटाला जोडलेली टोपी घालून अंधुक प्रकाशात, लांब असलेल्या टोकाकडून येऊ लागल्या. ते हातवारे करत हळू आवाजात काहीतरी महत्वाचे बोलत होते.

त्यांना बघून रब्बी अशर अबरबॅनेलने डोळे मिटून घेतले. त्याचे हृदय मरणांतिक धडधडू लागले. त्याने पांघरलेल्या चिंध्या भिती वाटून, बर्फाळ घामाने भिजून गेल्या.

धापा टाकत भिंतीच्या आडोशाला तो गपगुमान पडून राहिला. एका दिव्यातून येणाऱ्या उजेडाच्या तिरीपित डेव्हिड देवाची प्रार्थना करत राहिला. जेव्हा ते दोघे चर्चा करत सहजपणे तिथे पोचले तेव्हा दिव्याच्या उजेडात ते थांबले. एकजण दुसऱ्याचे बोलणे ऐकताना सरळ रब्बीकडे बघू लागला. पण त्या बघण्यात न बघितल्याचाच भाव होता. रब्बीला पहिल्यांदा काही कळलेच नाही. त्याच्या शरीरात गरम सुया टोचल्या जात असल्यासारखे त्याला बिचाऱ्याला वाटत होते. परत एकदा तो जखमांचे गाठोडे -- जिवंत दुःख बनला. त्याच्या पापण्या फडफडून, श्वास कोंडून, तो चक्कर येऊन पडला. पायघोळ अंगरख्यासारखे काही त्याला लागल्यासारखे वाटून, त्याच्या अंगावर काटा आला. पण एकाच वेळी विचित्र व नैसर्गिक -- त्या अनोळखी माणसाचे डोळे, तो जे उत्तर देणार होता व जे काही ऐकत होता. त्यात गर्क होते. ते त्या ज्यूवर खिळलेले असले, तरी त्याला बघत नव्हते.

आणि खरे तर काही मिनिटांनी ते दोघे बोलत बोलत, कैदी जिथून आला त्या दिशेला दूर निघून गेले. अजूनही ते आपापसात बोलत होते. कसे कुणास ठाऊक, पण त्यांनी रब्बीला बघूनही बघितले नाही. क्षणभर रब्बीच्या जाणीवा भयंकर गोंधळून गेल्या, पण त्याच्या डोक्यात एक कल्पना आलीः

“कदाचित मी आधीच मेलेला असेन व त्यामुळे कोणाला दिसत नसेन.” एका अतिशय कुरूप अशा भासाने त्याला हलवून, त्याचा गलथानपणा पळवून लावला. त्याच्या चेहऱ्यासमोरील भिंतीकडे टक लाऊन बघत असतांना त्याला वाटले, की दोन भयंकर डोळे त्याच्याकडे रोखून बघत आहेत. आंधळ्या, अतर्क्य भीतीने त्याने त्याचे डोके बाजूला वळवले -- पण नाही! त्याच्या हाताला पुढचे दगड लागले. त्याला काय दिसले होते, तर अजूनही त्या अनोळखी व्यक्तीचे भिंतीवर उर्फ त्याच्यावर रोखलेले डोळे!

चल पुढे. त्याला रस्त्याच्या शेवटापर्यंत जायला घाई करायला हवी होती. तिथे त्याच्या कल्पनेप्रमाणे, ( अगदी नक्की वेडेपणाने ) त्याच्यापासून सुमारे तीस पाऊलांवर असणाऱ्या त्या सावल्या म्हणजे सुटका! पण ही एक मिथ्या गोष्ट असणार. त्याने हात, गुडघे व पोटावरुन त्याची कष्टप्रद यात्रा परत सुरु केली आणि लवकरच तो, त्या रस्त्याच्या भीतीदायक अंधारी भागात पोचला.

अचानक त्या बिचाऱ्याला झेंड्याच्या चौथऱ्यावरील दगडांचा गार स्पर्श जाणवला. बहुधा पॅसेजच्या शेवटी असणाऱ्या दारामधून आलेली गार झुळूकदेखील त्याला जाणवली. अरे देवा! जर हे दार बाहेरील जगात उघडत असेल तर! अंधुक आशेच्या आंधळेपणात त्या फरफटत जाणाऱ्या कैद्याचे अवघे आस्तित्व गरगरू लागले. त्याच्याभोवती असलेल्या अंधारातून पूर्णपणे न दिसणाऱ्या दाराचा ठाव घेण्याचा त्याने प्रयत्न केला. तो त्यावर जाऊन धडकला. कडी, कुलूप काही नाही. कुलुप! –-

तो उठला. त्याच्या बोटांना न लावलेली कडी जाणवली. त्याच्यासमोर आवाज न होता दार उघडले! दारातून बाहेर पडतांना त्याच्यावर झालेल्या दयेच्या वर्षावाने खोलवर उसासा टाकून रब्बी बोलला. “अरे देवा, सुटलो बाबा!”

चांदण्या रात्री दार बागेत उघडले –- बहराकडे, स्वातंत्र्याकडे, आयुष्याकडे नेणारी बाग! ती शेजारच्या डोगररांगा असलेल्या, स्पॅनिश बोलणाऱ्या सिएरा देशाकडे जात होती. त्या देशाच्या वळणदार निळ्या कडा क्षितिजावर उठून दिसत होत्या. तिथे स्वातंत्र्य होते. ओहो,

सुटका झाली तर! तो रात्रभर सुगंध घेत लिंबाच्या झाडांखाली फिरत राहिला. एकदा तो डोंगरात पोचला, की तो सुरक्षित होता. त्याने छान आशीर्वादपर हवा हुंगली. वाऱ्याच्या झुळुकीने तो ताजातवाना झाला. त्याची फुफ्फुसे नव्याने श्वासोच्छ्वास करू लागली. त्याचे हृदय विशाल झाले. त्याने असे ऐकले, “देवाची कृपा झालेल्या माणसा, ये.” त्याच्यावर दया दाखवणाऱ्या देवाचे आभार मानण्यासाठी त्याने उतू जाणाऱ्या आनंदाने आकाशाकडे त्याचे हात पसरले.

आणि मग त्याच्या हाताच्या सावल्या त्याच्यावर परतताना त्याला दिसल्या. त्या त्याच्या भोवती पसरून त्याला वेढून घेत आहेत, त्याला नाजूकपणे कोणी छातीशी आवळते आहे, असे त्याला वाटले. त्याच्यासमोर एक उंच आकृती उभी होती. आत्मविश्वासाने त्याने त्याची एकटक नजर तिच्या पायांशी वळवली. व आश्चर्याने तोंड उघडे टाकून, धापा टाकत उभा राहिला. तो भीतीने कापत होता.

भयानक! तो त्या अनोळखी माणसाच्या पकडीत होता. त्याच्याकडे भरल्या डोळयांनी टक लाऊन बघणारा तो माननीय पेद्रो अर्ब्युएज़ डिस्पिला होता. चुकलेले वासरू भेटलेल्या चांगल्या गुराख्यासारखा!

त्या पायघोळ झगा घातलेल्या प्रतिष्ठीत धर्मगुरूने त्याला इतक्या कनवाळूपणे ह्रदयाशी कवटाळले, की रब्बीच्या शर्टातून हातावरील केसांची टोके उभी राहून, धर्मगुरूच्या छातीवर दाबली गेली. जेव्हा रब्बी अशर अबरबॅनेलने पापण्यांच्या आडून त्याचे डोळे वर वळवले, तेव्हा पूर्वी झालेल्या छळाच्या आठवणीमुळे तो थरथर कापत होता. कडक डॉम अर्ब्युएज़च्या मिठीत त्याला साक्षात्कार झाला की त्या भयानक संध्याकाळची प्रत्येक अवस्था हा जाणूनबुजून केलेला छळ होता. आशेमुळे झालेला छळ! तो दुःखी दिसत असलेला अनोळखी मनुष्य, दुःखातून उद्भवलेली निराशा हावभावातून व्यक्त करत, त्याच्या कानात जळणाऱ्या श्वासांनी पुटपुटलाः

“काय रे माझ्या बाळा, बहुधा –- मोक्षप्राप्तीच्या संध्याकाळी –- तू आम्हाला सोडून जायचा विचार करत होतास का?”

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. वृषाली जोशी यांचे हे अकरावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. डॉ. वृषालींसारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (तेरा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१९ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १० पुस्तके), विनीता देशपांडे (५ पुस्तके) उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (७) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।